म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १८५४
IRBK-0101854
IRBK-0101854
IRBK-0101854

# मराठ्यांचा आत्मयज्ञ

( ऐतिहासिक नाटक )

ना. ५८८

लेखक

नाथ माधव

म. के. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्र. क्र. ९८५८ . नों. दि ..............
वि. नाटक ... क्र. ..................

किंमत दीड रुपया

IRBK-0101854
IRBK-0101854

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, ४.

: प्रकाशक :

रघुनाथ दिपाजी देसाई,

नवभारत प्रकाशनसंस्था,

६, केळेवाडी, मुंबई नं. ४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

द्वितियावृत्ति, नोव्हेंबर १९४३

: मुद्रक :

रघुनाथ दिपाजी देसाई,

न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,

६, केळेवाडी, मुंबई ४

०७५६१.०

# प्रस्तावना

न यत्र स्थेमानं दधुरतिभयभ्रान्तनयना ।
गलद्दानोद्रेकभ्रमदलिकदंबाः करटिनः ।
लुठन् मुक्ताहारे भवति परलोकं गतवतो ।
हरेरद्य द्वारे शिव ! शिव ! शिवानां कलकलः ॥
—भामिनीविलास.

श्रीशिवाजी महाराजांनीं दीर्घ प्रयत्नांनीं स्थापन केलेल्या राज्यावर त्यांचे वडील पुत्र संभाजी महाराज बसले. त्यांनीं अवघीं नऊ वर्षें राज्य केलें. ह्या नऊ वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं काय केलें, असा सर्वसाधारण प्रश्न केला असतां ‘ संभाजी हा दुर्गुणांचा पुतळा होता; त्यानें राज्य बुडविलें !’ हें एक ठराविक उत्तर मिळतें. आणि हा आमचा ग्रह कायम राहण्याचें कारण, प्रथम शाळांतून चालू असलेल्या शालोपयुक्त पुस्तकांतून आम्हीं तेंच शिकलों, नंतर कादंबऱ्या व नाटकें वाचून व पाहून आमचा हाच ग्रह कायम झाला. ज्या परम श्रेष्ठ पुरुषानें–श्रीशिवाजी महाराजांनीं गोब्राह्मणांच्या मानेवर पडलेल्या क्रूर यवनांच्या सुऱ्या हिसकावून घेतल्या, व त्यांच्या पायांशीं मरत पडलेला स्वधर्म गजमस्तकारूढ करून स्वराज्यस्थापना केली, त्यांच्या पुत्राविषयीं आम्हां तज्जातीयांस अनादरबुद्धि उत्पन्न होईल, अशी माहिती असावी, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

श्री छत्रपति संभाजी महाराजांच्या चरित्राचा समारोप **श्रीयुत गोविंदराव सखाराम सरदेसाई**, बी. ए. यांनीं हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास भाग दुसरा, यांत फारच मार्मिक रीतीनें केलेला आहे. त्यांतील मुख्य भाग प्रस्तुत नाटकाच्या समर्थनार्थ पुढें दिला आहे.

‘ संभाजीच्या एकंदर चरित्रक्रमावरून एक गोष्ट उघड होते. ती हीं कीं, संभाजी गादीवर आल्यापासून सन १६८५ च्या अखेरपर्यंत व्यसनांमध्यें रममाण होण्यास त्यास फारसा अवधि मिळालेला नाहीं. सन १६८६ च्या सालांत तो कोठें व काय करीत होता, तें समजत नाहीं; तरी त्यावेळीं शत्रू छातीवर पाय देऊन उभे असतां, वारयोषिता व मद्यपात्रें बरोबर घेऊन तो

सर्व वर्षभर संगमेश्वरासारख्या एखाद्या अप्रसिद्ध ठिकाणीं दडी मारून बसला असेल, हें संभवत नाहीं. तसेंच १६८९ च्या त्याच्या हालचाली कळलेल्या नाहींत. १६८७ व ८८ सालांत तो मोहिमा करीत होता. यावरून कार्यव्यापृतत्वामुळें तरी व्यसनाभिलाष सिद्धीस नेण्यास त्यास मनमुराद अवसर मिळाला नाहीं, हें खचित. म्हणून विशिष्ट उदाहरणें पुढें येईपर्यंत महाराष्ट्र राज्यसंस्थापकाच्या ह्या पूज्य पुत्रावर कादंबरीकाराप्रमाणें यथेच्छ तोंडसुख घेणें निदान इतिहासकारास तरी प्रशस्त नाहीं, लहानपणीं संभाजी व्रात्यपणा करी. परंतु राज्याधिपति झाल्यानें अंगावर पडलेल्या जबाबदारीमुळें, त्याच्या व्यसनांतील व्रात्यपणा थोडा बहुत तरी कमी झाला असेलच. कदाचित् शेवटीं शेवटीं निराशा व उद्वेग यांचा जाच विसरण्याकरितां मदिरेची भक्ति त्यानें विशेष चालविली असेल, असाहि संभव आहे. तथापि संभाजीची योग्यता ठरवितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. दुसरी एक गोष्ट संभाजीला बाधक झाली आहे. तो शिवाजीचाच मुलगा पडल्यामुळें शिवाजीच्या कर्तृत्वाशीं संभाजीची तुलना केली जाते. दोघेहि पुरुष संनिकट आल्यामुळें, एक अतिशय उच्च, तर त्याचे विरोधानें दुसरा अतिशय नीच समजला जातो. शिवाजी लोकोत्तर पुरुष होऊन गेला, त्याचे हातून राज्य संपादन झालें, तेव्हां अर्थात् त्यास देवाप्रमाणें मान मिळूं लागला. ह्या प्रकाराशीं संभाजीच्या आचरणाचा विरोध स्पष्ट होऊन व्यसनामध्यें, पराक्रमशून्यतेमध्यें व इतर हरएक दुर्गुणांमध्यें संभाजी जितका आपणास लोकोत्तर दिसतो. तितका हीन तो खचित नाहीं. त्याचीं व्यसनें त्याच्या जबाबदारीच्या मानानें कितीहि निंद्य दिसलीं, तरी तत्कालीन परिस्थितीच्या मानानें तीं असामान्य नव्हतीं. म्हणून शिवाजी त्या टोंकास तर संभाजी त्याच्या विरुद्ध टोंकांस उभे करणें वाजवी नाहीं. केवळ त्याच्या अंगच्या व्यसनांमुळें अगर दुर्गुणांमुळें एवढें मोठें अरिष्ट राष्ट्रावर आलें नाहीं. दुसरें एक जबरदस्त कारण आहे. तिकडे कोणाचें सहसा लक्ष जात नाहीं. प्रतापी मोंगल बादशाहीच्या अखिल व प्रचंड शक्तीशीं संभाजीला निःसहाय झगडावें लागलें, तसें शिवाजीस लागलें नाहीं. संभाजीच्या सारखीं संकटें शिवाजीवर येतीं, तर त्याचीहि त्रेधा उडाल्याशिवाय राहती ना. मात्र कांहीं तरी युक्ति योजून तशीं संकटें शिवाजी स्वतःवर एकदम येऊं देत नसे; व संभाजीस तर असा कावा मुळींच माहित नव्हता. शिवाजी विजापूरकरांशीं लढला, तर संभाजीनें प्रत्यक्ष औरंगजेबाशीं मोठ्या जोरानें टक्कर मारिली, व अनेक वार त्या बलवान् बाद-

शाहास त्यानें सतावून अगदीं हताश केलें. यावरून विचार करतां मरणाचे पूर्वी मोंगलांच्या भीतीनें तो संगमेश्वरीं जाऊन लपला असेल हें संभवत नाहीं. सारांश आज राजापुरास तर उद्यां भडोचेस; आज हबसणांत, तर उद्यां फोंड्यावर; असा तो एकसारखा विजेसारखा चमकत होता. ज्यानें अनेक मुलुख मारून मोंगल बादशाहास जर्जर केलें, ज्यानें गंगेच्या तीरीं सहा हजार विश्वासघातकी लोकांचा मोठ्या शिताफीनें समाचार घेतला, ज्यानें वाघाप्रमाणें शत्रूवर उडी घालण्यास कधींहि जिवाची पर्वा केली नाहीं, त्यास औरंगजेबासारख्या बलिष्ठ बादशाहानें व्यसनाधीनतेच्या वन्यावस्थेंत भागुबाईप्रमाणें विश्वासघातानें पकडिलें व त्याच्या शतपट नीचतेनें त्याचा शिरच्छेद केला, म्हणून आम्हीं तज्जातीयांनींहि त्याचा तिरस्कारच केला पाहिजे असें नाहीं. वर सांगितलेल्या कर्तबगारीबद्दल थोडा-बहुत सन्मानाचा अंश त्यास आपणाकडून मिळणें रास्त आहे. निदान संभाजी-विषयींची नालस्ती पुराव्याशिवाय आपण खरी मानली नाहीं, म्हणजे पुष्कळ झालें. कारण संशयाचा फायदा आरोपितास देणें, हें निःपक्षपाताचें मर्म आहे.

यावरून संभाजी म्हणजे चांगुलपणाचा पुतळा होता, असें म्हणण्याचा उद्देश नाहीं. परंतु नाटकांतून, कादंबऱ्यांतून आणि शालोपयुक्त पुस्तकांतून संभाजीची नालस्ती इतकी करण्यांत येते, कीं, त्याजबद्दल कींव आल्याशिवाय रहात नाहीं. औरंगजेबानें संभाजीचा क्रूरपणें वध केला, ह्या अनिष्ट परिणामावरून संभाजीची खरी कर्तबगारी आपण विसरून जातों, व त्याची सर्वत्र इतकी निंदा करतों, कीं, ती आम्हां हिंदु म्हणविणारांस शोभणारच नाहीं. शाळांत जाणाऱ्या अल्पवयस्क मुलांस सुद्धां संभाजीविषयीं अनादरबुद्धि शिकविण्यांत येते. इतक्या अनादरास संभाजी खचित पात्र नाहीं. परिणामावरून निकाल देणें हें अन्यायाचें आहे. संभाजीच्या अडचणी असामान्य होत्या, त्याची परिस्थिति फार भयंकर होती, व त्यास कोणाचेंहि साह्य नव्हतें; तरी शत्रूशीं टक्कर देण्यांत त्यानें आपली शिकस्त केली. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून, व स्वराज्याचे कामीं त्यानें यथाशक्ती आपली कामगिरी बजाविली हें जाणून आम्हीं त्याच्या वंशजांनीं त्यास मान देणें उचित आहे.

संभाजीच्या कारकीर्दीविषयीं एक दोन गोष्टी आपण नेहमीं ध्यानांत ठेवण्या-जोग्या आहेत. त्या दहा वर्षांत सर्व लहान मोठ्या घराण्यांचा, सरदार कामगा-रांचा, व त्याबरोबरच रयतेचाहि विलक्षण छळ झाला; व नाना प्रकारचीं दुःखें लोकांवर कोसळलीं. तथापि त्यावेळच्या सर्व लोकांची सहनशीलता व धाष्टर्य हीं

त्या अडचणींत जितकीं कसास लागलीं, तितकीं पूर्वी कधीं लागलीं नव्हतीं. ते संभाजीवर उठले नाहींत, त्याला त्यांनीं कैदेंत टाकिलें नाहीं, किंवा आपल्या हातून होईल तितकी त्यास मदत करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. ते त्यास अखेरपर्यंत एकनिष्ठपणें भजत होते. अशी आपल्या राजाविषयीं अतोनात भक्ति इतरत्र क्वचित् दिसून येते. यापासून दोन प्रकारचीं अनुमानें काढतां येतील. एक आम्हीं संभाजीच्या जुलुमाविषयीं कुरकूर केली नाहीं, म्हणजे तशी कुरकूर करण्याची आमच्यांत शक्ति नव्हती; व अत्यंत निःसत्व झाल्यामुळें वाटेल ते अपमान सहन करणें आमच्या अंगवळणीं पडलें होतें, आणि दुसरें, दुसऱ्याच्या चुकीची चिकित्सा करीत बसण्यापेक्षां, निमूटपणें आपलें कर्तव्य बजाविणें हेंच त्यावेळच्या लोकांस जास्त श्रेयस्कर वाटलें.

कसेंहि धरलें तरी एवढें खरें कीं, संभाजीनें तुरुंगांत टाकलें तरी हरकत नाहीं, पण तुरुंगांतूनहि आपण राज्याच्या हिताचा शक्य तो प्रयत्न करावयाचा, अशा प्रकारचा त्यावेळच्या प्रमुख मंडळींत व सामान्य लोकांत जो निग्रह दिसून आला, त्याची तारीफ केल्यावांचून रहावत नाहीं. अशा प्रकारें स्वार्थनिर-पेक्षतेनें स्वकर्तव्य करण्याची बुद्धि राष्ट्राच्या अंगीं असणें हें त्याच्या ऊर्जितावस्थेचें लक्षण होय. अशी स्वकर्तव्यबुद्धि आपणांत आज वसत नाहीं हें त्यावेळच्या इतिहासावरून आपण ध्यानांत धरलें पाहिजे. मग तें कर्तव्य कोणतेंहि असलें तरी हरकत नाहीं. सांप्रत आमच्या **दयाळु इंग्रज सरकारास** श्री छत्रपति संभाजीकालीन कर्तव्यनिष्ठ लोकांसारख्या लोकांची फार जरूरी आहे. हल्लींच्या युद्धप्रसंगीं जितका ‘ मराठा ’ मिळेल तितका सरकारास हवा आहे. आमच्यांत आमचें पूर्वतेज जागृत व्हावें म्हणून सरकारनेंहि आमच्या समर्थांचा **‘परवल’** वापरला आहे. ‘ **मराठा तितुका मिळवावा**— ’ हा आतां इंग्रज सरकारनें वापरलेला ‘ परवल ’ व असेच दुसरे समर्थांचे चेतना उत्पन्न करणारे परवल ज्या कालीं सारखे वापरले जात होते, त्याकालचेंच प्रस्तुत नाटक हें चित्र आहे. हें नाटक पाहून व वाचून आमच्या लोकांत पुनः कर्तव्यजागृति होईल आणि सांप्रत चालू असलेल्या युद्धांत आम्ही आमच्या दयाळु सरकारास कोणती मदत केली पाहिजे याची जाणीव प्रत्येकाच्या अंतःकरणांत जागी होईल अशी मी आशा बाळगतों.

प्रस्तुत नाटकांत जगदेवराव, तारा, मानाजी आणि मल्हारी हीं पात्रें काल्पनिक घातलीं आहेत; तथापि इतिहासाला धरून त्यांना रंगविण्याचा शक्य तितका

प्रयत्न केला आहे. हीं पात्रें निस्सीम राजनिष्ठा व्यक्त करणारीं आहेत. संभाजीच्या हातून वेळोवेळीं घडलेल्या गोष्टी व त्याच्या तोंडून प्रसंगविशेषीं निघालेले उद्गार त्याचा स्वभावपरिपोष करील अशी खात्री आहे. राजानें तुरुंगांत टाकिलें तरी राज्याच्याच हिताचा विचार करणारे मोरोपंतांसारखे मुत्सद्दी स्वसंतोषानें आत्मयज्ञ करतात हें पाहून त्या कालच्या मुत्सद्दीमंडळांतील राजनिष्ठेची तेवत असलेली दिव्य ज्योत किती उज्ज्वल होती, हें सहज लक्षांत येईल. कलुषासारख्या नीच वृत्तीच्या माणसानें संभाजीच्या अविवेकी आणि हूड स्वभावाचा फायदा घेऊन राज्यांत जो भयंकर नरमेधाचा वणवा पेटविला, त्यावरून संभाजीच्या कारकीर्दीचा बराच उलगडा होतो. तुळशी हें पात्र संभाजींच्या चरित्रांत चिकटलेलें आहे. इतिहासांत ह्या पात्राचा कुठेंच उल्लेख केलेला अवलोकनांत येत नाहीं. तथापि संभाजीच्या, नादीं लागून बनलेल्या व्यसनी पण करारी आणि हूड स्वभावाचें चित्र रंगविण्यास तुळशीरूपी हा काल्पनिक 'ब्रश' योजिला आहे. गणोजी शिर्के आणि राजकुंवर हीं दोन पात्रें माझे मित्र कै. श्री. **सहकारी कृष्ण** यांच्या 'शापित महाराष्ट्र' यांतून घेतलीं असून तीं रंगवितांना येसूबाईला राज्ञीच्या स्वरूपांत दाखविण्यास व नाटकांतील खऱ्या ऐतिहासिक प्रसंगांचा मला यथायोग्य परिपोष करण्यास पुष्कळ मदत झाली. हें नाटक पाहून व वाचून संभाजीसंबंधानें प्रचलित असलेलें सर्वसाधारण मत कांहीं अंशानें तरी बदलावें, निदान अप्रतिम शौर्य, निरुपम धाडस व मरण आलें तरी शत्रूस हार न जाण्याचा अलौकिक बाणा इत्यादि गुणांनीं तो महापुरुष श्री शिवाजी महाराजांचा पुत्र म्हणवून घेण्यास लायक होता इतका जरी जनतेचा ग्रह झाला, तरी माझ्या ह्या अल्पशा कृतीचा योग्य मोबदला मला मिळाला असें मानून मला आनंद होईल.

हें नाटक लिहीत असतां माझे मित्र श्रीयुत **धों० र० तेंडुलकर** यांनीं मला वेळोवेळीं जी मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें हें ऐतिहासिक नाटक इतक्या आस्थेनें व्यक्ति, प्रसंग, आणि स्थळें यांचें महत्त्व कायम ठेवून रंगभूमीवर आणिलें त्याबद्दल मी '**लोकमान्य नाटक मंडळी**'चे उत्साही मालक श्रीयुत **नानवा गोखले** यांचा अत्यंत आभारी आहें.

पितळे यांचा बंगला,
कावसजी पटेल तलाव,
मुंबई. १ जुलै १९१७.

**नाथमाधव.**

# नाटकांतील पात्रें

| | | |
|---|---|---|
| **संभाजी** | ... ... | श्रीछत्रपति महाराज. |
| **मोरोपंत पिंगळे** | ... | मुख्य प्रधान |
| **दादजी देशपांडे** | ... | सरदार. |
| **कलुषा** | ... ... | कविराज. |
| **रघुनाथपंत हणमंते** | ... | कर्नाटकचा सुभा. |
| **खंडोजी फर्जंद** | ... | गुप्त हेर |
| **मंत्री** | ... ... | अष्टप्रधानांपैकीं एक. |
| **समर्थशिष्य** | ... ... | श्रीरामदास स्वामींचा चेला. |
| **गणोजी शिर्के** | ... ... | मोंगलांना मिळालेला एक सरदार. राजभगिनी राजकुंवरचा पति. |
| **जगदेवराव सरनाईक** | ... | राजनिष्ठ वृद्ध सरदार. |
| **मल्हारी** | ... ... | प्रथम राजद्रोही, नंतर राजनिष्ठ बनलेला एक तरुण. तारेचा भावी पति. |
| **मानाजी, तारा** | ... ... | जगदेवरावांचीं नातवंडें. |
| **येसूबाई** | ... ... | राजपत्नी. |
| **राजकुंवर** | ... ... | राजभगिनी, गणोजी शिर्क्यांची पत्नी. |
| **शिलेदार** | ... ... | जगदेवरावाचा इमानी नोकर. |
| **नेमाजी** | ... ... | कलुषाचा गुप्त हेर. |
| **राजसबाई** | ... ... | चिटणीसाची पत्नी. |
| **खंडोजी** आणि **निळोजी** | ... | ,, मुलें. |

(तुळशी, दास, दासी, स्तुतिपाठक, मोंगल सरदार, शिपाई, मराठे गडी इत्यादि)

**काळः**—सन १६८० ते १६८९.

**स्थळः**—रायगड, पन्हाळा गडाच्या आसमंतांतील प्रदेश, व संगमेश्वर येथील सरदेसाई यांचा वाडा.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

**स्थळ:**—विंझईच्या डोंगरावरील देवीचें देवालय.

( जगदेवराव प्रवेश करतो. )

**जगदेवराव:**—( उद्विग्न मनानें ) गेला !—मराठ्यांच्या सुदैवाचा काळ गेला ! दिगंत फडकत असलेला मराठ्यांच्या कीर्तीचा भगवा झेंडा राजनिष्ठ जीवांच्या रक्तानं लालभडक झाला ! सद्गुणांच्या भरभक्कम पायावर उभारलेलं विजयश्रीचं भव्य मंदीर जमीनदोस्त झालं ! मराठ्यांचा प्रतापरवि मावळला ! जिकडे तिकडे काळाकुट्ट अंधार पडल्यामुळं अधोगतीला नेणारे निशाचर हवा तसा हायदोस घालूं लागले. राजनिष्ठ मुत्सद्यांच्या हालचालींना अपशकून करणारीं दिवाभीतं 'घूं–घूं' असा मूकध्वनि मनसोक्त करूं लागलीं !—आहारे दुर्दैवी महाराष्ट्रा ! थोरल्या महाराजांच्या उच्चतम ध्येयाचा तुला इतक्या लौकर विसर पडावा काय ? त्या परमश्रेष्ठ नरवीरानं प्रत्येक मराठ्याच्या अंतःकरणांत पेटविलेला राजस महत्वाकांक्षेचा वडवानल, त्या नरपुंगवाच्या अस्ताबरोबरच विझून जावा काय ?—पण महाराष्ट्र तरी काय करणार ? त्या उच्च ध्येयाची—त्या राजस महत्वाकांक्षेची दिव्य ज्योत सारखी तेवत राहण्याकरितां आवश्यक असलेला स्नेह आज कुठं आहे ! शिवप्रभूनीं ज्या अलौकिक गुणांवर महाराष्ट्राचं एकिकरण केलं होतं, त्या गुणांच्या अभावीं—त्या सगुण प्रोत्साहन—साभिमान गौरव–सस्नेह निःपक्षपात इत्यादि अलौकिक गुणांच्या अभावीं आज सगळा महाराष्ट्र हवालदिल झालेला आहे.—कलुशाकबजीनं आपल्या राक्षसी-महत्वाकांक्षेचं आणि कपटी कृष्णकारस्थानांचं आवरण आमच्या शौर्यसागर छत्रपति संभाजी महाराजांवर घातल्यामुळं त्या निधड्या छातीच्या वीराचा एकहि शौर्य-किरण चमकेनासा झाला आहे. आज चोहींकडून स्वामिभक्तीला प्राणांतिक लाथा मिळत असल्यामुळं निमकहरामीला तेजी चढत चालली आहे. त्या नीच—कपटी—दुर्व्यसनी— ( मोरोपंत प्रवेश करतो. )

**मोरोपंत:**—( आश्चर्यानें ) कोणाच्या तोंडचे शब्द हे ? जगदेवराव

सरनाईकांच्या— स्वामिभक्त—नेकजात महाराष्ट्र वीराच्या, शिवप्रभूंनीं मोठ्या अभिमानानं, गौरवानं, नांवाजलेल्या वृद्ध मुत्सद्याच्या तोंडचेका शब्द हे ? मी तर आश्चर्यानं स्तंभितच झालों !—ज्याच्या एकुलत्या एक पुत्रानं आपला देह आपल्या राजाकरतां बळी देऊन आपल्या कुलाच्या राजनिष्ठेची पताका अक्षय फडकत ठेवली, त्या मुरारीच्या पित्यानं वृद्धपणीं आपल्या राजासंबंधानं असे उद्गार काढावे हा कालमहिमाच म्हणावा काय ?

**जगदेव०**—पंत, माझा तसा हेतु नव्हता.

**मोरोपंतः**—तुमचा हेतु कसाहि असो, पण ही कल्पनाच स्वतःचा प्राण घेऊन सर्वांना अधोगतीला—नव्हे सर्वांचा सर्वस्वी घात करणारी आहे. आपल्या मनाला या कल्पनेचा गंधहि नसेल अशी माझी ठाम समजूत होती, म्हणूनच मी आपणाला चिठी पाठवून इथं येण्याची व्यर्थ तसदी मात्र दिली. परंतु जग दिसतं तसं नसतं हेंच खरं !

**जगदेव०**—पंत, माझ्यासंबंधानं असला भलताच ग्रह करून घेऊं नका. माझ्या बोलण्याचा अर्थ निराळा होता.

**मोरोपंतः**—निराळा असेल कदाचित् ! पण या असल्या अर्थानंच या मराठ्यांच्या राज्यावर अनर्थाची गदा हाणली आहे. तुमच्या सारख्या हुषार मुत्सद्यांनीं व शूर वीरांनीं या खोल अर्थाच्या भानगडींत पडून पक्षभेदाची आग पेटविली आहे. आपले छत्रपति संभाजीमहाराज मुळापासून तामसी वृत्तीचे ! त्यांच्या अंगीं विवेक कमी असून हट्ट–दुराग्रह आणि हूडपणा यांचं प्राबल्य ज्यास्त आहे, तेव्हां थोरल्या महाराजांच्या परमपूज्य सिंहासनावर बसण्याला ते लायक नाहींत अशी मनाची घातुक भावना करून घेऊन धाकट्या बाईसाहेबांच्या कोत्या विचारांना पुष्टि देऊन ही पक्षभेदाची आग ज्यास्त भडकविली. त्यामुळं महाराजांनीं चिडून जाऊन त्या धडाडलेल्या होमकुंडांत राजनिष्ठ व धैर्यशाली वीरांची एकसारखी आहुति देण्याचा सारखा सपाटा चालविला आहे. या पक्षभेदाच्या अग्नींत एकीची मजबूत सांखळी तुटली—कीर्तीच्या विमल ध्वजावर काजळी धरली—चोरांना फावलं ! इतकं प्रत्यक्ष पाहून सुद्धां स्वामिभक्तींत काळ्याचे पांढरे झालेल्या—राजनिष्ठेच्या साम्राज्यांत राजपद पावलेल्या—जगांतील इतिकर्तव्यता झालेल्या जगदेवराव सरनाईकांच्या मनालासुद्धां या पक्षभेदाच्या ज्वालांनीं भडकावून टाकावं या परतं महाराष्ट्राचं दुर्दैव तें कोणतं ?

**जगदेव०**—पंत, हा माझ्यावर वृथा आरोप आहे! प्रत्यक्ष संभाजी महाराजासंबंधानं माझं मत कसंहि असलं तरी ते आपले प्रभु आहेत, हें अद्यापि मी विसरलों नाहीं. स्वामिभक्तीकरितां ज्यानं आपल्या देहाची–पोरां-बाळांची–घरादाराची क्षिति बाळगली नाहीं, त्याच्या मनांत स्वामिद्रोही विचार कधीं तरी येतील काय? पंत, या जगांत माझं असं आतां काय राहिलं आहे? राहिलेल्या थोड्या दिवसांत 'राजद्रोही' म्हणवून घेऊन मिळविलेल्या पुण्य-राशीवर पापाची ठिणगी टाकून ती भस्मसात् करूं काय? पंत, असा आत्म-घातकी विचार माझ्या मनाला कधींहि शिवलेला नाहीं; आणि पुढं कधींहि शिवणार पण नाहीं. पक्षाभिमानाचं वारं काय करणार नाहीं, हें मी जाणत नाहीं अशी आपली कल्पना आहे काय? सचीव, अमात्य आणि न्यायाधीश या मुत्सद्दी म्हणविणारांच्या अंगांत ह्या पक्षभेदाचा संचार झाल्यामुळंच थोरल्या महाराजांच्या वेळच्या प्रत्येक विश्वासू आणि राजनिष्ठ सेवकासंबंधानं छत्रपति संभाजी महाराजांच्या मनांत संशयाचं वीष भरलं. हा पक्षभेद म्हणजे उन्नतीच्या गळ्याशीं लावलेला फांस आहे. दोन पक्षांच्या ओढाताणीनं उन्न-तीचं शीर धडापासून वेगळं झालं, म्हणजे मग दोन्ही पक्ष एकमेकांवर आद-ळून मरायचे, दुसरं काय? पण पंत, आज इतक्या दिवसांचा तुमचा माझा परिचय असतां—परस्परांच्या विचारांची एकतानता झाली असतां, इतकंच काय—पण देह दोन–जीव एक–इतकं सख्य असतां आपल्या मनांत माझ्या-विषयीं काळंबेरं कसं आलं याचचं मला आश्चर्य वाटतं!

**मोरोपंतः**—जगदेवराव, घर फिरलं म्हणजे घराचे वासे देखील फिरतात! सध्यांच्या परिस्थितींत कोणाचं मन कसं वाहील हें सांगतां यावयाचं नाहीं. पण मघां रागाच्या भरांत मी आपणाला बोललों त्याची क्षमा करा.

**जगदेव०**—भलतंच कांहीं तरी! पंत, क्षमा कुणी कुणाला करायची हा एक प्रश्नच आहे. मराठ्यांच्या अब्रूचं रक्षण करणाऱ्या एकाद्या राजकारणपटु मुत्सद्यानं इतकी सावधगिरी ठेवली तर ती त्याची चूक नसून उलट भूषणास्पदच आहे. आपण मघां माझ्या तोंडून जे उद्गार ऐकलेत ते त्या नीच कलुषासंबंधानं होते. त्या स्वार्थसाधु दुर्व्यसनी कलुषानं महाराजांवर मोहिनी घातली आहे. त्याच्या तंत्राशिवाय महाराज एक पाऊलहि टाकीत नाहींत असं ऐकतों—

**मोरोपंतः**—आणि तेवढ्याकरतांच मी आपणाला बोलाविलं आहे.

**जगदेव०**—पण असल्या क्षुद्र मनुष्याकडून महाराष्ट्राचं काय नुकसान होणार आहे ?

**मोरोपंतः**—नुकसान काय होणार आहे ? जगदेवराव, ते पूर्वीचे दिवस गेले. गुणी मनुष्यांचा काळ आतां राहिला नाहीं. तुम्हांला भ्रम आहे. चोर, जार आणि व्यसनी लोक आपल्या मोहिनी मंत्रानं मी मी म्हणविणारांच्या डोळ्यांत धूळ फेंकून त्याला आंधळा करतात आणि आपल्या फायद्याकरतां त्याला हवा तसा नाचवितात. हा कलुषा क्षुद्र खरा पण आज त्यानं महाराष्ट्राचं केवढं नुकसान केलं आहे ? त्याच्या नीच वासनेला राजनिष्ठ सेवकांचे किती बळी पडणार परमेश्वर जाणे ! जगदेवराव, आजच्या दरबारांत या अधमाधमाच्या सल्ल्यानं महाराजांनीं अण्णाजी दत्तो यांच्या घराचा झाडा घेण्याचा आणि अमात्य व प्रतिनिधी यांना हत्तींच्या पायीं तुडविण्याचा हुकूम केला.

**जगदेव०**—अरेरे ! पंत, शिवप्रभूंच्या ज्या न्यायासनासमोर अपराध्यांना शिक्षा होत असत, त्याच न्यायासनासमोर गादीच्या इमानी सेवकांना शिक्षा व्हाव्या हें लांछनास्पद आहे ! पण पंत, या गोष्टींचा शेवट तरी काय होणार ?

**मोरोपंतः**—जगदेवराव, खरं विचाराल तर मी अगदीं गोंधळून गेलों आहें. राजसभेंत रोज घडणारी एक एक अमानुष गोष्ट पाहून हृदयांत सारखी कालवाकालव होते. मराठी राज्याची इमारत सुरक्षित राखण्याकरितां तुम्हांआम्हांसारख्या प्रत्येक राजनिष्ठ सेवकानं स्वतःच्या रक्ताचं पाणी केलं, तिची स्थिति पुढं काय होणार ही चिंता रात्रंदिवस हृदयाला पोखरूं लागली आहे. राजनिष्ठ माणसांचा असाच वध होत राहिला तर निमकहराम लोक आपल्या महाराजांना—आपल्या राजाला—आपल्या प्रभूला—शत्रूच्या स्वाधीन केव्हां करतील किंवा त्यांच्या प्राणाला केव्हां कांहीं अपाय करतील, हे विचार मनांत आले म्हणजे वीराला न शोभणारे अश्रू माझ्या डोळ्यांतून न कळत वाहूं लागतात. पण अशावेळीं महाराजांना एखादी हितोपदेशाची गोष्ट सांगण्याची सोय आहे काय ? आज अमात्य आणि न्यायाधीश हत्तीच्या पायांशीं गेले, उद्यां तुमच्या आमच्यावरसुद्धां त्या काळाची वक्रगति फिरल्याशिवाय राहावयाची नाहीं ! जगदेवराव, या काळाच्या नांग्या मोडण्याची कांहीं तोड तुम्हाला सुचते का ?

**जगदेव०**—( विचार करून ) या प्रश्नाचा शांतपणेंच विचार करायला पाहिजे. आज आपण कलुषाचं उच्चाटण करण्याचा जर प्रयत्न केला तर संभाजी

महाराज जास्त खवळतील. सध्यां आपणाला करावयाचं इतकंच कीं, आपला एखादा मनुष्य त्याच्या गोटांत ठेऊन त्याच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवावयाची.

**मोरोपंतः**—माझ्याहि मनांत असाच विचार घोळत आहे. त्याचप्रमाणें आपला एखादा विश्वासु मनुष्य परळीला पाठवून स्वामींच्या कानांवर ह्या सर्व गोष्टी घालाव्या म्हणजे स्वामि अधिकारानं कांहीं हितोपदेशाच्या गोष्टी महाराजांना सांगतील.

**जगदेव०**—हा तर सर्वोत्कृष्ट विचार झाला.

**मोरोपंतः**—पण इतका विश्वासु माणूस कोणी आहे का आपणांजवळ ? नाहीं तर भलत्याच एखाद्या मनुष्यावर विश्वास टाकून आपला गळा मात्र आवळला जायचा !

**जगदेव०**—मी करतों ती व्यवस्था ! आमचा मल्हारी आहे.

**मोरोपंतः**—हा एक विचार झाला. आतां सरनाईक, तुम्हाला एक विनंति करावयाची आहे. तुम्ही खऱ्या दिलाचे, अनुभवी आणि पोक्त आहांत. छत्र-पति आबासाहेबांनीं धरलेली महत्त्वाकांक्षा तुम्हाला पूर्णपणें ठाऊक आहे—म्हणून तुमच्याजवळ मी बोलतों. आज दरबारांत चालू असलेल्या गोष्टींवरून भावी स्थितीविषयीं कांहींच कल्पना करवत नाहीं. परंतु ह्या गोष्टी जर अशाच चालू रहातील, तर शत्रूंची मात्र पोळी पिकणार आहे. तथापि इतकं मात्र मी प्रतिज्ञेनं सांगतों कीं, ह्या चालू वावटळींतून मी जगलों तर थोरल्या महारा-जांनीं घातलेल्या ह्या मजबूत पायावर त्यांच्या इच्छेप्रमाणं टोलेजंग इमारत उभी करण्याला मजकडून मदत जरी झाली नाहीं, तरी ह्या शुद्ध पायाला मी ह्या माझ्या देहांत प्राण आहे तोंवर धक्का मात्र बसूं देणार नाहीं.

**जगदेव०**—पण पंत, आपण असे अगदीं हताश कां होतां ? थोरल्या-महाराजांची पुण्याई फार थोर आहे.

**मोरोपंतः**—होय, गोष्ट खरी ! पण ह्या रोज चाललेल्या नरमेधानें ती पुण्याई किती दिवस पुरी पडणार ! आज अमात्य—प्रतिनिधी गेले, उद्यां तुम्हां आम्हांवर प्रसंग येईल. काय नेम सांगावा ?

**जगदेव०**—आलाच तसा प्रसंग तर मागं थोडंच घ्यायचं आहे ? शत्रूच्या पाठीवर आपल्या नग्न तलवारीनं थाप मारणारा मराठा गडी मरणासारख्या क्षुल्लक गोष्टीला भिऊन माघार घेईल असं का तुम्हाला वाटतं ? नाहीं, नाहीं.

पंत, त्या गोष्टीविषयीं तुम्ही अगदीं बेफिकिर असा. मरण हें कुणाला—केव्हां तरी टाळतां का येणार आहे! तें केव्हां तरी यायचंच! मर्द वीराला मरणाची केव्हांहि भीति वाटणार नाहीं. पण पंत, तुम्ही एक विनंति करणार आहांत ती कशाबद्दल?

**मोरोपंतः**—विनंति म्हणून इतकीच कीं, यदाकदाचित् तसा प्रसंग जर उद्यां माझ्यावर आला; तर थोरल्या महाराजांचं ध्येय तुम्ही सदोदित डोळ्यांपुढं ठेऊन आपल्या मुलाबाळांच्या मनावर चांगलं बिंबवा. बस्स! इतकं जरी आज प्रत्येक मराठ्यानं केलं तरी पुढल्या पिढीकडून तें खात्रीनं यशस्वी होईल.

**जगदेव०**—पंत, ह्या आद्यकर्तव्याच्या गोष्टी तुम्ही आम्हाला सांगायला का पाहिजेत? माझ्या बाजीनं आपल्या पूज्य स्वामींच्या पवित्र कार्याकरितां रणकुंडांत मोठ्या आनंदानं देहाची आहुति दिली हें ढळढळीत उदाहरण त्याच्या मुलांच्या नजरेपुढं नाहीं काय?

**मोरोपंतः**—( पुढें होऊन त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ) जगदेवराव, तुमच्या स्वामिभक्तीबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. हं—चला आतां एकदां देवीचं दर्शन घेऊन आपापल्या योजिलेल्या कार्याला लागूं या. ( पुढें होऊन देवीपुढें हात जोडून ) हे संकटहारिणी माते! आमच्या महाराजांना सद्बुद्धि देऊन, सध्यां चाललेला हा नरमेध बंद कर. थोरल्या महाराजांवर तुझी कृपादृष्टि होती, तशीच संभाजी महाराजांवर असूं दे. थोरल्या महाराजांचा यशोदुंदुभि जसा सर्व हिंदुस्थानभर दुमदुमत आहे, तसाच संभाजी महाराजांचा यशोदुंदुभीही दुमदुमू दे. आम्ही महाराजांची एकनिष्ठ सेवक मंडळी संकटपरंपरेला भितों असं नाहीं, आमच्यावर जर एखादं प्राणसंकट येऊन महाराज सुधारत असतील, तर—( एकाएकीं देवीच्या मस्तकावरील मुकूट खालीं पडतो, दोघे दचकतात. )

**जगदेव०**—पंत, हा काय अकल्पित-अद्भुत प्रकार? देवीचा कोप झाला काय?

**मोरोपंतः**—हा कोप तर खराच! पण त्याबरोबर आपल्या भावी संकटाची देवीनं ही अगाऊ सूचना केली आहे, असं मला वाटतं.

**जगदेव०**—आणि मलाहि आतां येतांना वाटेंत एक दोन अपशकुन झाले. परंतु इथं येण्याकडे माझं सर्व चित्त वेधल्यामुळं मी तिकडे दुर्लक्ष केलं.

**मोरोपंतः**—जगदेवराव! भवितव्यतेपुढं कुणाचं कांहींच चालावयाचं

नाहीं. आतां पुढं येणाऱ्या संकटाला तोंड द्यायला आपणाला तयार असलं पाहिजे. ( पुनः देवीपुढें हात जोडून ) माते ! आमच्या देहार्पणानं जर हा महाराजांच्या राज्याचा रोपा जोरानं वाढणार असेल—तर आम्ही गादीचे एकजात एकनिष्ठ सेवक मोठ्या आनंदानं आणि एकदिलानं त्या गोष्टीला तयार आहोंत. आमच्या—स्वामिभक्त सेवकांच्या–रक्तसिंचनाशिवाय राज्याच्या पायाला बळकटी येत नसेल तर वाटेल त्यावेळीं—वाटेल त्या स्थळीं आम्ही आमच्या रक्ताचा सडा घालायला तयार आहोंत. पण देवी ! तुझ्या पवित्र चरणांजवळ ह्या नम्र दासांची एवढीच विनंति आहे कीं, थोरल्या महाराजां-प्रमाणं संभाजी महाराजांवर तुझी पूर्ण कृपादृष्टि असूं दे. आणि त्यांच्याकडून राज्याचा विस्तार होऊं दे. ( नमन करतात. ) सरनाईक, बांधा कंबर आणि व्हा पुढं ! भावी संकटांचा विचार मनांत आणून आपणाला कर्तव्यशून्य होतां उपयोगी नाहीं. आपण एकदां कर्तव्याची रूपरेखा आंखली त्याप्रमाणं आतां उद्योगाला लागूं या.

**जगदेव०**—माझी तयारी आहे.

**मोरोपंतः**—चला तर.

[ जातात. देवालयांतून नेमाजी हळूच पुढें येतो. ]

**नेमाजीः**—या नेमाजीचा नेम थोडक्यांत चुकला ! शिकार बरोबर टेहळून मी इथं बरोबर आलों. स्थळ बरोबर मिळालं पण वेळ मात्र चुकली ! इथं यायला थोडा उशीर झाल्यामुळं पंत आणि जगदेवराव सरनाईक यांचा झालेला गुप्त बेत या कानाआड राहिला. तितका त्यांचा गुप्त बेत जर कळला असता तर किती बहार झाली असती ! पण आतां हळहळून काय उपयोग ! पाहिली तेवढी गोष्ट कबजीला सांगावी तर तो भट कसला खाष्ट ! तेवढ्यानं का त्याचं समाधान होणार आहे ?—पण हें इकडे कोण येत आहे ? पंडितराव वाटतं !—होय तेच ! बहुत करून स्वारी गडावरच जात असेल. आणि त्यांच्याबरोबर हें दुसरं कोण आहे ?—दादजी प्रभू ! बेटा, चिटणीशी-साठीं सारखा धडपडतो आहे.—अरे, हे तर बोलत बोलत अगदीं जवळ येत चालले. आतां थोडा वेळ आपण जरा बाजूला होऊन प्रसंग पाहून पुढं व्हावं !

( कलुषा व दादजी येतात. )

**कलुषाः**—होय. त्या सर्व गोष्टी खऱ्या, पण तूं म्हणतोस त्याप्रमाणं करा-यला सध्यां माझ्या हातांत असा काय अधिकार आहे ? आज महाराज

माझ्या तंत्रानं वागतात असं जरी तुला वाटतं, तरी माझ्या मार्गात अडचणी पुष्कळ आहेत. हे पंत आहेत, बाळाजी चिटणीस आहेत, तसंच येसूबाई—महाराज आहेत. ह्या सर्वांच्या नांग्या मोडल्याशिवाय माझं तेज पडणं केव्हां तरी शक्य आहे का ? ह्या पंतांना आपल्या मार्गांतून दूर करण्यासाठीं काय करावं म्हणून इतके दिवस मी सारखं डोकं खाजवीत आहें; पण एकहि बिन-तोड युक्ति सुचत नाहीं. तसंच हा चिटणीस मुंबई बेटाहून इथं परतच येणार नाहीं अशी मी मार्गांत व्यवस्था करून ठेविली होती. पण कुठं चुकलं तें कांहीं कळत नाहीं. कारण मघां मला हेराकडून कळलं कीं, सिद्द्याची खडान्‌खडा माहिती काढून चिटणीस नुकतेच परत आले.

**दादजी:**—पण पंडितराव, मी आतां जी एक युक्ति सुचविली, तिचा उपयोग कराल, तर खात्रीनं आपला सर्व कार्यभाग यशस्वी होईल.

**कलुषा:**—छे ! तूं म्हणतोस त्याप्रमाणं मला बिलकुल करतां येत नाहीं. महाराज मदिरासक्त होऊन आपणाला अनुकूल होतील, असं जें तुला वाटतं, तो तुझा निव्वळ भ्रम आहे. स्वतः आरमारावर जाऊन सिद्दी कासमचा सूड उगवावा हा विचार आज दोन दिवस महाराजांच्या मनांत सारखा घोळत आहे.

**दादजी:**—पण महाराजांना स्वतःच कशाला जायला पाहिजे ? महाराज जर अशा लहानसहान मोहीमांवर स्वतः जाऊं लागले तर मग आमच्या-सारख्या मंडळींचा काय उपयोग ? मला हुकूम द्यावा, मी त्या सिद्द्याची पुरी खोडकी मोडून येतों.

**कलुषा:**—हीच सूचना आज मी महाराजांना करणार आहे.

**दादजी:**—( विचार करून ) बरं—मग मी मघांशीं सुचविलेल्या दोन्ही गोष्टी जर आपणाला असाध्य दिसत असतील तर पंडितराव, मी एक तीसरी गोष्ट आपणाला सुचवितों. आपणाला माहित आहेच कीं, दिल्लीपतिविरुद्ध बंड करून शहाजादा अकबर आपल्या आश्रयाला आला आहे. त्याचा ह्या कामांत आपण उपयोग करून घ्यावा. महाराजांचा त्याच्या सांगण्यावर खात्रीनं विश्वास बसेल.

**कलुषा:**—ही योजना बरी दिसते. कदाचित् साध्य होईल असं वाटतं. पण ह्या गोष्टीचा देखील नीट विचार केला पाहिजे. ( नेमाजी मुकाट्यानें पुढें होऊन मुजरा करतो. ) कोण नेमाजी ! काय आणली आहेस खबर ?

**नेमाजी:**—सरकार, चिटणीस मुंबई बेटाहून परत आले—

**कलुषाः**—ही तर जुनी खबर झाली !

**नेमाजीः**—तर नवी खबर सरकार, आज अस्तमानच्या सुमारास विंझईच्या देवळांत पंत आणि सरनाईक यांचं गुप्त खलबत चाललं होतं.

**कलुषाः**—पंत आणि सरनाईक यांचं गुप्त गलबत ? दादजी, काय बरं हा प्रकार असावा ?

**दादजीः**—दुसरा काय असणार ? कांहीं तरी गुप्त कट असेल झालं ! आणि तसं जरी नसलं तरी महाराजांना तसं भासवायला काय हरकत आहे ? उलट ही आपल्या फायद्याचीच गोष्ट आहे.

**कलुषाः**—बरं मग पुढं ? नेमाजी, त्यांचं कशाबद्दल गुप्त खलबत चाललं होतं ?

**नेमाजीः**—तें नाहीं सरकार मला कळलं. फक्त त्यांची भेट झाली ही गोष्ट सरकारच्या कानावर घालण्याकरतां हा मी पळत आलों आहें.

**कलुषाः**—निमकहराम—पाजी ! शरम नाहीं वाटत तुला असं सांगायला ? कशाला मराठ्याच्या जन्माला आलास ? पंतांच्या क्षुल्लक भेटीचा तुला भेद लागूं नये ? हाच का तुझा नेकजातपणा ? नीघ—चालता हो माझ्या समोरून ? (ढकलून देतो. तो जातो.) दादजी, तूं म्हणतोस त्याप्रमाणं ह्या गोष्टीचा आपण फायदा घेतलाच पाहिजे. आतां मी असाच गडावर जातों आणि महाराजांची मर्जी पाहून ह्या दोघांची पहा कशी क्षणांत तळी उचलतों ती ! (जातो.)

**दादजीः**—( विचार करीत ) पंतांचीं गुप्त कारस्थानं तीं काय असणार ? कब्जीसारख्या कारस्थानी पुरुषाला राजनिष्ठ पंतांच्या कृतींत कारस्थानीपणा दिसावा यांत बिलकुल आश्चर्य नाहीं. कारण कोणी झाला तरी तो स्वार्थच पाहील. मी तरी काय करतों ? माझी ही सारी धडपड कशासाठीं चालली आहे ?—स्वार्थासाठीं ना !—पण पंत तरी चुकत नाहींत का ? इतका मोठा अधिकार आणि अनुकूल परिस्थिति, अशा वेळीं राजनिष्ठेची कांस त्यांच्या कितीशीं उपयोगी पडणार आहे ? मी यावेळीं अष्टप्रधानांत एखाद्या जागीं असतों—तर काय बरं केलं असतं ?—कां ? पुष्कळ केलं असतं. आणि तें पुष्कळ मला करतां यावं म्हणूनच तर माझी ही सारी धडपड चालू आहे !—आजकाल राजनिष्ठ म्हणविणाऱ्या मुत्सद्यांच्या तंत्रानं वागण्यापेक्षां कलुषासारख्या पाताळयंत्री आणि राजाच्या बहाल मर्जीतल्या स्वार्थसाधु माणसाच्या कच्छपीं लागून स्वतःच्या पोळीवर तूप ओढल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. कारण आजच्या

परिस्थितींत खऱ्या राजनिष्ठेनं वागणं म्हणजे स्वतःच्या जिवावर प्राणांतिक आपत्ति ओढून घेण्यासारखं आहे. ही राजनिष्ठा—ही स्वामिभक्ति हे दिसण्यांत दिसायला भव्य आणि कानांत गुंजारवासारखे मधूर नाद करणारे शब्द आमच्या महाराष्ट्राची गळेचेपी करीत आहेत. आणि या गोष्टीची सत्यता पटविणारीं उदाहरणं आज डोळ्यांपुढं ढळढळीत उभीं नाहींत काय ?—छे ! तें कांहीं नाहीं ! शिवकालीन अनुभवी मुत्सद्यांच्या आणि कलुषा—संभाजीच्या भांडणांत मीं आपला हेतु—पण तो हेतु कसला ? अष्टप्रधानांपैकीं एखाद्या जागीं वंशपरंपरेनं अधिष्ठित होण्याची ती माझी उत्कट महत्वाकांक्षा—जर मी आतां पुरी करून घेतली नाहीं, तर माझ्यासारखा मूर्ख मीच ! ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा

**स्थळ**—विंझईच्या आसमंतांतील प्रदेश.

( वैराग्याचा वेष घेतलेला गणोजी शिर्के आणि नेमाजी प्रवेश करतात. )

**गणोजीः**—काय म्हणतोस नेमाजी, बादशहाच्या म्हणण्याला कलुषा कबूल होत नाहीं ?

**नेमाजीः**—होय सरदारसाहेब. बादशहाच्या वचनावर कलुषाचा काडी इतका देखील विश्वास नाहीं. हे राजेलोक आपल्या इष्टसिद्धी करितां वाटेल त्याला डोकीवर बसवून केव्हां वाटेल तसा नाचवितील, आणि आपलें काम झालं कीं त्याला केव्हां पायाखालीं तुडवितील याचा नियम लागणार नाहीं. आपण जर हमी घेत असाल—

**गणोजीः**—तर कलुषा संभाजीला बेहोष करून आमच्या स्वाधीन करणार असंच ना तुझं म्हणणं ? मग त्यांत कोणती हरकत आहे ? त्या संबंधाची सर्व जबाबदारी मी आपल्या शिरावर घेतों, मग तर झालं ना ?

**नेमाजीः**—मग तर कोणतीच हरकत नाहीं. अलीकडे संभाजी म्हणजे कलुषाच्या हातांतील एक बाहुलं बनला आहे. कलुषानं त्याला आपल्या पाशांत कायमचा अडकविल्यामुळं गादीचं हित साधण्याकरितां सदा तत्पर असणाऱ्या माणसांशीं तो धड बोलत सुद्धां नाहीं. मग त्यांच्या उपदेशाचं चऱ्हाट त्याच्या

कानांत शिरणार तरी कुठून ? शिवाय त्याच्या शौर्याचं खोबरं करून कलुषानं आपल्या वीर मंत्रानं त्याच्या सभोंवार घिरट्या घालणाऱ्या राजनिष्ठ समर्थांना तर जिवंत गाडून टाकलंच ! आतां राहिलेल्या स्वामिभक्त समंधांची उचलबांगडी करण्याच्या विचारांत सध्यां आमचे कलुषाकब्जी ऊर्फ छत्रपति संभाजी महाराजांचे पंडितराव आहेत. त्यांच्या मोहिनीजालांतून संभाजी सुटेल असं नाहीं मला वाटत !

**गणोजीः**—एकूण माझी प्रतिज्ञा पूर्ण होण्याची वेळ जवळ येत चालली तर !

**नेमाजीः**—अहो, तुमचीचशी काय ? पण कितीजणांनीं संभाजीच्या वधाच्या प्रतिज्ञा केलेल्या आहेत. या सर्वांतून संभाजीचा बळी कोणत्या कावळ्याला मिळतो हें मात्र पहाणं आहे. त्या तुळशीनं आपल्या पित्याच्या खुनाच्या सूड घेण्याकरितां संभाजीच्या वधाची प्रतिज्ञा केलेली आहे. शिर्के कुळांतील प्रत्येक पठ्यानं तर शिरकाणाचा मोबदला घेण्याकरितां भोसल्यांचा नायनाट करण्याचा विडा उचलला आहे. औरंगजेब तर अनेक फांस टाकून संभाजीच्या रक्तावर एखाद्या बुभुक्षित व्याघ्राप्रमाणें सारखा टपून बसला आहे. कलुषानं तर संभाजीला—त्याच्या हाता बोटावर नाचणाऱ्या त्या चालत्या बोलत्या बाहुल्याला भर बाजारांत विकून आपली तुंबडी गच्च भरण्याची प्रतिज्ञा केलेली आहे. आणि मी—मी सुद्धां एक प्रतिज्ञा केलेली आहे.

**गणोजीः**—नेमाजी, आपल्या सर्वांच्या प्रतिज्ञांचें अंतिम ध्येय जरी एक असलं तरी त्यांचं कारण आणि मार्ग हीं मात्र अगदीं भिन्न आहेत. तथापि त्या ध्येयाच्या पूर्ततेसाठीं आपलं सर्वांचं एकीकरण झालंच पाहिजे. एरव्हीं संभाजीच्या सभोंवतीं असलेला राजनिष्ठ जीवांचा प्रचंड तट केव्हांही कोसळून पडणार नाहीं. या राजनिष्ठ जीवांच्या अभेद्य व अपारदर्शक तटाच्या आंत संभाजीचं वास्तव्य हल्लीं कुठं आहे, हें कळणं देखील कठीण झालं आहे असं मला वाटतं.

**नेमाजीः**—असं जरी खरं आहे, तरी सरदारसाहेब, आपण त्याची मुळींच काळजी करूं नये. आणि एवढ्याच करितां कलुषा संभाजीला एक क्षणभरहि विसंबत नाहीं—हो नियम काय ? संभाजी जात्या कांहीं दुर्गुणी नाहीं. हें सगळं कलुषाचं कारस्थान आहे. महाराणी येसूबाई, पेशवे मोरोपंत पिंगळे, एखादा समर्थशिष्य किंवा सरनाईकासारखा अगर जोत्याजी सारखा एखादा स्वामिभक्त

ही मंडळी आपल्या सदिच्छेच्या झणझणीत अंजनानं संभाजीचे डोळे केव्हां उघडतील हें आपणांला कळायचं सुद्धां नाहीं.

**गणोजी:**—म्हणूनच म्हणतों, कलुषाला त्याच्यावर नीट नजर ठेवायला सांग—जा आतां तूं; कारण इतक्यांत इथं कोणीतरी आपल्या आयुष्याचा पाढा वाचून घ्यायला येईल—म्हणून जा, आणि कलुशाला सांग कीं, गणोजी शिर्क्यांच्या सूडाच्या प्रतिज्ञेची सफलता व्हावयाला जर तूं मदत केलीस तर हा गणोजी तुला जन्मभर विसरणार नाहीं. इतकंच नव्हे तर शिर्के कुळांतील ज्या पुण्य पुरुषांचे हकनाहक खून झाले, त्यांच्या धन्यवादानं तूं सदैव राजविलासांत लोळत राहशील.

**नेमाजी:**—( हात जोडून ) पण सरदारसाहेब, त्या कलुषाकबजीच्या खालोखाल माझीहि आपणांला मदत होत आहे, तेव्हां आपल्या आठवणींतून आपण मला जाऊं देऊं नये, इतकंच माझं मागणं आहे. आपण एकदां माझी आठवण ठेवली म्हणजे औरंगजेब बादशहाकडूनहि आठवणीनं आपण माझी पाठवण करालच अशी मला—

**गणोजी:**—जा—नेमाजी, तुलाहि मी विसरणार नाहीं. जा आतां लवकर. तो पहा एक तरुण मराठा या ठाकुरजीच्या दर्शनाकरितां येत आहे. तूं इथं असतांना कोणाहि मराठ्याच्या दृष्टीला तुला पडतां कामा नये. जा—नाहीं तर मला तोंडघशीं पाडशील. जा—जा—जा—तो पहा आलाच ! या वाटेनं पळ. ( नेमाजी जातो. ) आतां आपण घेतलेल्या वेषाप्रमाणं पेशाहि घेतला पाहिजे.

( गणोजी ध्यानस्थ बसतो. पुरुषवेषांत राजकुंवर प्रवेश करते. )

**राजकुंवर:**—( स्वगत ) दादाच्या हालचालीवर नजर ठेऊन त्याची शिकार साधण्याच्या उद्देशानं तिकडची स्वारी कंबर कसूर पुन: दक्षिणेंत आली आहे, अशी बातमी कळल्याबरोबर तिकडचं मन वळलं तर पहावं अशा हेतूनं या पुरुषवेषानं मी सर्वांच्या नकळत गडावरून निघाल्यें खरी, पण माझे मनोरथ पूर्ण होतील का ?—मराठी राज्याकरितां तळमळणाऱ्या जिवांच्या आशा-आकांक्षा, परमेश्वरा ! कधीं तरी सफल करशील का ?—आपल्याच व्रताचं हातांत कंकण बांधून आत्मयज्ञ करायला तयार होणाऱ्या राजनिष्ठ मराठ्यांच्या मस्तकावर आबासाहेब ? आपल्या पवित्र इच्छेचा वरदहस्त कायम राहील ना ?—असो. काय होईल तें होवो. प्रयत्न तर करून पहावा ! ( पुढें जाऊन ) हें इथं कोण ? ठाकुरजी बसले आहेत वाटतं !—भूतभविष्य-

कालाचा काळा पडदा दूर करून त्याच्या पाठीमागील अदृश्य अदृष्टाचे ठोकताळे पटवून देण्याचं सामर्थ्य यांच्या अंगीं आहे, याबद्दल यांची ख्याति आहे—( न्याहाळून पाहून ) पण मला मात्र यांच्या सोंगाच्या पाठीमागचं अदृश्य स्पष्ट दिसत आहे. पाहूं तर खरं !—माझा संशय खरा होईल का ?

**गणोजीः**—( ध्यान विसर्जन करून ) कोण बेटा तूं ? इकडे कोणीकडे ? तुझा हात पहायचा आहे वाटतं ! ये—असा बैस जवळ—मी तुझ्या जन्माची सगळी हकीकत सांगतों. ठाकूरजीच्या कृपेनं मला भावी व भूत आयुष्याची गुरुकिल्ली मिळालेली आहे. असा बैस पाहूं. सांग, तूं कोणीकडून आलास ?

**राजकुंवरः**—( खोंचून ) मी छत्रपति संभाजी महाराजांच्या दरबारांतून आलों आहें.

**गणोजीः**—( दचकून एकदम उठतो ) काय संभाजीच्या दरबारांतून ? मला वाटतं, मग तुझ्यावर संभाजीची गैरमर्जी झालेली असावी—साहजिक आहे ! तसं होणं अगदीं साहजिक आहे !

**राजकुंवरः**—तसं होणं जरी साहजिक असलं, तरी त्याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं. कारण, ठाकुरजो, तुम्हांला मी सांगावं असं कांहीं नाहीं, आपण जाणतच आहांत कीं, ह्या राजे लोकांच्या मर्जीचं छत्र खुशामती लोकांच्या डोक्यावर आणि गैरमर्जीचं शस्त्र राजनिष्ठ लोकांच्या डोक्यावर नेहमीचंच असायचं! म्हणून या राजे लोकांच्या मर्जी संबंधानं किंवा त्यांची थुंकी झेलणाऱ्या खुषमस्कऱ्या संबंधानं मला आपणांस कांहींच विचारायचं नाहीं.

**गणोजीः**—मग—तूं येथें आलास तरी कशाला ?

**राजकुंवरः**—( विसर पडल्यासारखें भासवून ) मी येथें कशाला आलों ?

**गणोजीः**—पाहूं तुझा हात ? तुझें नशीब मी सांगून टाकतों. एवढ्याच-करितां तूं आलास ना ?

**राजकुंवरः**—या हातांत जर नशीब सांठविलेलं असतं तर हाताच्या सामर्थ्यापुढें नशीब लंगडंच पडलं असतं ! पण ठाकुरजी, आजचा काळ असा आहे कीं, स्वतःच्या भावी आयुष्यांतील वैभवालंकृत उच्च मनोरे सगळ्या जगाला दिपवून टाकतील किंवा नाहीं, हें समजावून घेण्यापेक्षां आपल्या राजावर झडप घालूं पाहणारं संकट टळेल किंवा नाहीं हें समजावून घेण्याकरितां कर्तृत्ववान् राजनिष्ठ माणूस देवभोळा बनून तुमच्या पायापाशीं लोटांगणं घालीत येईल.

**गणोजी**:—मग एकूण संभाजीमहाराजासंबंधानं विचारण्याकरितां आलास वाटतं?—त्याचा आणि तुझा जवळचा लागाबांधा आहे काय?

**राजकुंवर**:—होय ठाकुरजी. माझा एकट्याचाच नव्हे तर प्रत्येक भाणसाचा आणि त्याचा राजाचा लागाबांधा हा असायचाच! ठाकुरजी, या मायावी जगाचा त्याग करून या गुहेंत तुम्ही निर्भय चित्तानं इष्टचिंतन करीत रहातां, तें आमचा राजा आहे म्हणूनच ना? नाहीं तर औरंगजेबानं तुम्हाला केव्हांच मुसलमान व्हायला लाविलं असतं. ( टोंचून ) बाकी घरफोडी करण्याचा तुम्ही विडा उचलला असता तर मात्र औरंगजेबानं तुम्हाला तळहाताच्या फोडाप्रमाणं वागविलं असतं. खरं कीं नाहीं? तुम्हाला हा अनुभव—नव्हे हें अंतर्ज्ञान आहेच!—मग अशा आकाशाप्रमाणें आपले मस्तकावर आपल्या राजाचं छत्र असतांना त्या छत्राचे जर एखादा डोमकावळा फाडून फाडून चिंधड्या उडविण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्याचा प्रतिकार करण्याच्या प्रबल इच्छेनं वेडावून गेल्यामुळं प्रत्येक राजनिष्ठ माणूस राजाचा प्रत्येक घटकावयव तुमच्या पायापाशीं खेटे घालून घालून आपले जोडे फाडून टाकील असं नाहीं का वाटत तुम्हाला ठाकुरजी?

**गणोजी**:—अरेरे! तुम्हा सर्वांची मला दया येते—

**राजकुंवर**:—पण काहो! ठाकुरजी, बगळ्याप्रमाणें मराठी राज्यरूपी माशाचा गोळा गिळंकृत करूं पाहणाऱ्या निमकहराम मराठ्यांची सुद्धां तुम्हाला दया येते काय?

**गणोजी**:—हो. हो. आमचा सर्वांभूतीं सारखा भाव! शत्रुमित्र आम्हाला सारखेच! बाकी खरोखरीच संभाजीचे ग्रह वाईट आहेत यांत मुळींच शंका नाहीं. आणि याच त्याच्या ग्रहामुळें मराठी राज्यावर परचक्र ओढवणार हें माझ्या दूरदर्शी दृष्टीला अगदीं स्पष्ट दिसत आहे.—आहे—यालाहि एक उपाय आहे. पण मी पडलों गरीब गोसावी! मला त्या छत्रपतीजवळ कसं जातां येणार!

**राजकुंवर**:—( भेदक दृष्टीनें पहात ) याला अगदीं सोपी युक्ति आहे ठाकुरजी! संभाजीचा खून करण्याची इच्छा अंतस्थ ठेवून जर प्रयत्न कराल तर तेव्हांच तुम्हाला जातां येईल.

**गणोजी**:—शिव! शिव! अशी इच्छा माझ्या मनांत केव्हांच येणार नाहीं. मी आपला त्याच्या हिताचं सांगतों. तो नुसता माझ्या दृष्टीस पडेल—पण इतकं सुद्धां नको तो सध्यां कुठं आहे इतकं जरी मला कळलं तरी मी माझ्या

मंत्रसामर्थ्यानं तेथील ग्रामदेवतांना जागं करून त्याच्या भुईकोट किल्ल्यांत त्याला सुरक्षित ठेवलं असतं. पण काय करणार ? भविष्यकाळीं ठरलेल्या गोष्टी व्हायच्याच व्हायच्या ! उपाय जरी असले तरी त्यांचा निरुपाय व्हावयाचा ! पण त्याचा ठावठिकाणा सांगतोस का मला ? मग पहा माझी कर्तबगारी ! सांग पाहूं सध्यां संभाजी महाराज कुठं आहेत ?

**राजकुंवरः**—राजनिष्ठ जीवांच्या अभेद्य अंतरंगांत आणि राजद्रोही जीवांच्या दृष्टीला अगम्य अशा स्थानीं ! ठाकुरजी, संभाजीचा पत्ता जर मला माहित असता तर आपल्या पायापाशीं धांव घेण्यापेक्षां त्याच्याच पायापाशीं धांव घेऊन साधुचं ढोंग घेऊन त्याचा गळा कापणाऱ्या निमकहराम मराठ्याशीं लढतां लढतां त्याच्याकरितां मी आपले प्राण खर्ची घालून खऱ्या मराठ्याचं कर्तव्यकर्म बजाविण्यास कधींहि चुकलों नसतों.

**गणोजीः**—संभाजीसंबंधानं तुला इतकी कळकळ वाटते, यावरून मला वाटतं, तुझं स्वतःचं सुखदुःख त्याच्यावर विशेष अवलंबून आहे !

**राजकुंवरः**—माझं एकट्याचंच काय ? पण मराठी राज्यांतर्गत प्रत्येक प्राण्याचं सुखदुःख—हिताहित संभाजी महाराजांच्या बऱ्यावाईटावर अवलंबून आहे ! ( टक लावून पहात )—स्वार्थी इच्छेच्या अनिवार मोहाला बळी पडून स्वजात, स्वदेश, स्वबांधव, यांच्या शिरावर; धडाडत असलेला गुलामगिरीचा प्रचंड वडवानल ठेवायला जेव्हां महाराष्ट्र शूराग्रणी तयार होतात, त्यावेळीं राजनिष्ठ माणसांनीं स्वार्थाकडे लोभी नजर न लावतां राज्याच्या परमार्थाकडे निर्विकार दृष्टि लाविलीच पाहिजे. ' आमचा राजा ' या भावनेनं मिळणाऱ्या दिव्य सुखाकरितां तत्कालीन तख्तनशीन व्यक्तीनं केलेल्या सर्व अघोर कृत्यांचा सूड उगविण्याचे जळजळीत आठवणीची निर्मल रक्षाच केली पाहिजे ! ( स्वगत ) यांच्या चेहऱ्यावर उत्पन्न होणाऱ्या विकाररंगांत अंतस्थ हलाहलाची कशी स्पष्ट झांक दिसत आहे. माझा तर्क खास खरा होणार ( उघड ) कां ठाकूरजी, मी काय म्हणतों तें समजलं का आपल्याला ?

**गणोजीः**—( स्वगत ) आत्मसंयमन करण्याचा माझा प्रयत्न आतां खात्रीनं निष्फळ होणार. ( उघड ) या राजकारणाच्या उठाठेवी आम्हा गरीबांना काय करायच्या ? बरं पण तुझं नांव तरी सांगतोस का ?

**राजकुंवरः**—माझ्या नांवाशीं तुम्हाला काय करावयाचं आहे ? संभाजीचं

नांव तुम्हांला माहित आहे ना ? तेवढंच बस्स ! पण इतकं मात्र मी तुम्हाला सांगतों कीं, मी शिर्केकुळांत पडलेला आहें.

**गणोजीः**—काय ? शिरक्यांच्या कुळासंबंधानं तुला इतका अनादर ! पण तूं जिवंत कसा राहिलास ! संभाजीनं शिर्क्यांचा शिरकाण केला, त्यांतून तूं कसा वाचलास ?

**राजकुंवरः**—शिर्क्यांचा निर्वंश होऊं नये—शिर्क्यांच्या विमल यशाला काळीमा लागूं नये असा परमेश्वरी संकल्प असल्यामुळं संभाजीनं मला पाठीशीं घातलं आहे.

**गणोजीः**—( रागानें ) शिर्क्यांच्या बच्चाला—सिंहाच्या छाव्याला, संभाजीच्या पाठीची जरूर भासावी—त्या मदोन्मत्त गजाच्या गंडस्थलाचा आश्रय घ्यावा लागावा इतका नामर्दपणा अस्सल शिर्क्यांच्या अंगीं असणं असंभाव्य आहे.

**राजकुंवरः** - मी भीतीनं भागुबाईप्रमाणं त्याच्या पाठीशीं बिलगलों आहे, हा आपला समज अगदीं चुकीचा आहे. संभाजी हा लोकनायक आहे, त्याच्या इतर दुर्गुणाकडे डोळेझांक करून आपल्या ध्येयाच्या पूर्ततेकरतां त्याच्या पाठीशीं मी उभा आहें, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होता. त्या लोकनायकाच्या तोंडून शब्द निघण्याचा अवकाश कीं, वंदनीय छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्या स्वराज्यसंस्थापनेच्या असिधाराव्रताचं उद्यापन करण्याकरितां तळहातावर शीर घेऊन आम्ही आपल्या सर्वस्वाची होळी करण्यास केव्हांहि मागं पुढं पहाणार नाहीं.

**गणोजीः**—( त्वेषानं ) इतका नामर्द षंढ पुरुष शिर्क्यांच्या कुळांत जन्मास येणं शक्य नाहीं. तूं मला फसवीत आहेस.

**राजकुंवरः**—स्वतःला फसविण्यापेक्षां दुसऱ्याला फसविणं जरी सोपं असलं तरी असली फसवेगिरी नेकजात मराठ्याला केव्हांहि माहीत नसते. मी संभाजीचा जवळचा नातेवाईक आहें, शिवाय शिर्केकुळांत पडलेला आहें, इतकंच नव्हे, तर गणोजीराव शिर्क्यांचं आणि माझं जवळचं नातं आहे.

**गणोजीः**—( रागातिशयानें ) आग लाव त्या नात्याला ! गणोजी—गणोजी शिर्के—भोसल्यांचा हाडवैरी—त्या संभाजीच्या रक्ताकरितां हपापलेल्या नरव्याघ्राशीं जवळचं नातं असतां इतका नेभळट तूं कसा झालास ? तुझ्या अंगांत शिर्के कुलाच्या अभिमानानं संतप्त झालेलं रक्त कसं खेळत नाहीं ?

( स्वगत ) नाहीं, असं एकदम बेफाम होऊन उपयोगी नाहीं. ( उघड ) शिर्केकुलाविषयीं तुला इतका अनादर वाटावा याचं कारण तरी काय ?

**राजकुंवरः**—याला कारण एकच—संभाजीचा आप्तपणा.

**गणोजीः**—पोरा, संभाजीच्या आप्तपणाकरितां तूं स्वतःच्या कुळावर आग पाखडायला तयार झालास ?

**राजकुंवरः**—नाहीं—संभाजी या व्यक्तीकरितां नाहीं, तर 'आमचा राजा' या त्याच्या अंगीभूत असणाऱ्या भावनेकरतां.

**गणोजीः**—अरेरे ! संभाजीच्या आप्तपणाची जाणीव तुझ्या हृदयांतून काढून टाकली असती—

**राजकुंवरः**—मग उशीर कां ? ( म्यानांतून तरवार काढून पुढें करते. ) ही माझी तलवार घ्या. आणि या अंतःकरणांतून संभाजीची ममता कायमची नाहींशी करा.

**गणोजीः**—पण जिवावर उदार होण्याइतके संभाजीनें तुझ्यावर कोणते उपकार केले आहेत ? ही तुझी नेभळाई पाहून तुझ्या भाऊबंद गणोजीला काय वाटेल याची कल्पना कर. बोल लवकर, मला तुझी सर्व हकीकत ऐकूं दे म्हणजे—

**राजकुंवरः**—नाहीं, गणोजीराव शिर्के समक्ष भेटल्याशिवाय मी एक अक्षरहि बोलणार नाहीं !

**गणोजीः**—पण पोरा ! तुझ्या मनाचा हा नेभळटपणा प्रत्यक्ष गणोजी शिर्क्यांच्या दृष्टीस पडला तर तो तुला कंठस्नान घातल्यावांचून रहाणार नाहीं. मग आपला जीव बचावण्याकरितां आपलं अंतःकरण त्याला तूं कसं दाखविशील ?

**राजकुंवरः**—या सगळ्या गोष्टी समक्ष भेटी नंतरच्या—लांबच्या आहेत.

**गणोजीः**—लांबच्या नाहींत—जवळच्याच आहेत. वनराजाला एकदां चिडविल्यानंतर त्याच्या गुहेंतून मानवी प्राण्याला परत जातां येत नाहीं, हें तूं विसरलास वाटतं ? पहा—आपल्या सभोंवार पहा ! तुला पळून जाण्याला एकहि मार्ग मोकळा नाहीं. ज्या गणोजी शिर्क्याला व्याजोक्तीनं तूं निमकहराम, ढोंगी, हांजीखोर ठरविलंस तोच हा गणोजी शिरका पहा—उघड आपले डोळे—( वेष टाकून देतो. )

**राजकुंवरः**—( चरण धरते. ) पतिदेवा !—नाथा !

**गणोजीः**—कोण तूं?—राजकुंवर!

**राजकुंवरः**—( वेष टाकून गुडघे टेकून हात जोडते ) होय—तीच अभागिनी—स्वराज्यसंस्थापक श्री छत्रपति शिवाजी महाराजांची लाडकी कन्या—शिर्केकुलभूषण गणोजीरावांची सहधर्मचारिणी राजकुंवर आपल्या चरणापाशीं भिक्षा मागत आहे!

**गणोजीः**—अशक्य!

**राजकुंवरः**—महाराज, मन इतकें कठोर करूं नका! स्वामि, युद्धप्रसंगीं कठीण मन जरी शोभा देत असलं, तरी स्वजनांशीं वागतांना सदयता भूषणास्पदच आहे. महाराज, संभाजीच्या—माझ्या दादाच्या—आपल्या बहिणींच्या जीवितसर्वस्वाची मी आपणाजवळ भिक्षा मागत आहें, ती घालण्यास आपण अनमान करूं नका.

**गणोजीः**—संभाजीनं केलेला अपकार विसरून त्याच्यावर उपकार करण्याइतका मठ्ठ अद्याप गणोजी झाला नाहीं, हें तूं विसरलीस वाटतं?

**राजकुंवरः**—संभाजीनं अपराध केला असेल, पण मराठी राज्यानं तर आपला अपराध केला नाहींना?

**गणोजीः**—संभाजी ह्या व्यक्तीनं शिर्केकुळाचा जो भयंकर अपराध केला तो मराठी राज्याचा अधिपति होता म्हणूनच! तो राजा म्हणून त्याच्या तरवारीखालीं शिर्केकुळांतील कच्याबच्यांना माना द्याव्या लागल्या.

**राजकुंवरः**—महाराज, संभाजीचं हें घोर कृत्य क्षमेला पात्र आहे. आपल्या विरुद्ध—व्यक्तीविरुद्ध एखाद्यानं जर व्यूह रचला तर त्याचा समूळ उच्छेद करण्याची इच्छा होणं मानवी स्वभावाला अनुसरून आहे.

**गणोजीः**—राजकुंवर, पतीच्या कुलाचं निर्मूलन होण्याचा प्रसंग आला असतां भावाची तरफदारी करतेस? राजकुंवर, सहधर्मचारिणीच्या कर्तव्याचा नीट विचार कर.

**राजकुंवरः**—महाराज, आबासाहेबांनीं शिर्केकुळांत आपली मुलगी देऊन त्यांची आपल्या कुळाला जोड करून जो लागाबांधा बांधला तो त्यांच्या स्वतःच्या हिताकरितां नव्हे, तर मराठी राज्याच्या हिताकरितांच; हें मी आपणाला सांगावं असं नाहीं. मग त्या आबासाहेबांच्या हेतुसिध्यर्थ तरी आपण मोंगलांची गुलामगिरीची बिडी ताडकन् तोडून मराठ्यांकडे या.

**गणोजीः**—मला मराठी राज्याशीं काय करावयाचं आहे? माझ्या

अंतःकरणांत सुडाशिवाय दुसरा विकारच उत्पन्न झालेला नाहीं आणि होत नाहीं. ज्या दिवशीं संभाजीला मी या हातानं कंठस्नान घालीन ( राजकुंवर कानावर हात ठेवते ) त्याचवेळीं माझ्या जीवाला शांतता वाटेल.

**राजकुंवरः**—नका—महाराज नका—इतके कठोर होऊं नका ! नाथ, आपण आपली प्रतिज्ञा सिद्धीस नेण्याचा प्रयत्न कराल तर किती भयंकर प्रसंग ओढवतील हें लक्षांत घ्या. आपल्या आवडत्या बहिणीची जीवनकला वैधव्यानं कशी होरपळून जाईल त्याचं चित्र डोळ्यापुढं मांडा—मराठी राज्याचा स्वामि नाहींसा झाल्यामुळं विस्कलित झालेल्या प्रजेच्या हालअपेष्टांचं मूर्त स्वरूप डोळ्यांपुढं आणा आणि आपली प्रतिज्ञा मागं घ्या. मी आपणापुढं पदर पसरून ही भिक्षा मागत आहें.

**गणोजीः**—मला बहिणीची जरूर नाहीं, मराठी राज्याची जरूर नाहीं, आणि राजकुंवर तुझीहि जरूर नाहीं. ( तिला लाथ मारतो ) माझी प्रतिज्ञा पूर्ण झालीच पाहिजे ! ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा

**स्थळः**—जगदेवरावाच्या घराची देवडी.

( नेमाजी आणि चार राजदूत प्रवेश करतात. )

**नेमाजीः**—कोण आहे देवडीवर ? ( येसबा शिलेदार दरवाजा उघडून येतो ) जगदेवराव सरनाईक कुठं आहेत ? जा—मी राजाज्ञा घेऊन आलों आहें म्हणून सांग.

**शिलेदारः**—सरनाईकांना झोंप लागली आहे.

**नेमाजीः**—सरनाईकांना झोंप लागली आहे ? त्या अमंगल सूचक घुबडाला—शांततेचा भंग करणाऱ्या त्या रातकिड्याला झोंप लागली आहे हें आश्चर्यच म्हणायचं ! पण त्यांना झोंप लागली असली तरी संभाजीमहाराजासंबंधानं गुप्त खलबतं आणि फंदफितुरीचीं स्वप्नं पडून त्यांची झोंपमोड होत असेल—

**शिलेदारः**—तोंड आटप ! महाराजांकडून राजाज्ञा घेऊन आला आहेस म्हणूनच तुला एक वेळ गय करतों. नाहीं तर सर्पासारखी उपकारकर्त्यावर

अपकार करावयास मागेंपुढें न पाहणारी बिनहाडाची तुझी जबान झटक्याला छाटून टाकिली असती! दुष्टा, राजनिष्ठ सरनाईकांच्या विरुद्ध असे शब्द उच्चारायला तुला धाडस तरी कसं झालं?

( जगदेवराव प्रवेश करतो. )

**जगदेव०:**—काय शिलेदार, काय गडबड आहे?

**शिलेदार:**—हा हरामजादा—राजदेवडीवरील कुत्ता—

**नेमाजी:**—मी राजाज्ञा घेऊन आलों आहें. ( पत्र देतो. जगदेवराव वंदन करून वाचतो. ) अहो बुड्ढे शेळपटराव, फारशी वटवट लावली आहे? ( जगदेवरावास ) जगदेवराव, आपल्यासारख्या राजनिष्ठ माणसाला कैद करून आत्तांच्या आत्तां गडावर नेण्याचा दुर्धर प्रसंग या अभाग्यावर ओढवला आहे—काय करणार? छत्रपति संभाजीमहाराजांचा सक्त हुकूम आहे म्हणून माझ्या मनाच्या विरुद्ध तुम्हाला कैद करावं लागत आहे.

**जगदेव०**—महाराजांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. हा मी तुमच्या स्वाधीन झालों. चला, मला जिकडे घेऊन जावयाचं असेल तिकडे घेऊन चला.

**शिलेदार:**—काय जगदेवरावसरनाईकांना कैद? धनीसाहेब, ती राजाज्ञाच आहे ना?

**नेमाजी:**—सरनाईक, वाटेल तर त्या तुमच्या शिलेदाराला तो हुकूम दाखवा. त्यावरचा शिक्कामोर्तब त्याला पाहूं द्या—राजदूताबरोबर कसं आदबीनं वागावं हें त्याला शिकविलं असतंत तर बरं झालं असतं!

**जगदेव०**—जाऊं द्या. त्याच्या बोलण्याकडे काय लक्ष देतां! शिलेदार, ही खास राजाज्ञा आहे, आणि ती मला मान्यहि आहे. चला, तुमच्या बरोबर येण्याची माझी तयारी आहे.

**शिलेदार:**—पण धनीसाहेब, जरा दमानं घ्या. मी आंतून आपली तरवार आणून देतों. रात्रीं अपरात्रीं हत्याराशिवाय बाहेर जाणं जरा धोक्याचं असतं.

**जगदेव०**—थांबा शिलेदार थांबा—त्या हत्याराची मला काय जरूर आहे? रात्रीं अपरात्रीं आपण आपल्या घरांत बिनदिक्कत वावरतों ना? मग आपल्या घराप्रमाणें आपल्या राजाच्या कृपाकक्षेंतील राज्यांत निर्भयमनानं वावरण्यास कसली भीति आहे? लहान बालकापासून तों तहत निर्बल वयोवृद्धापर्यंत सगळ्या माणसांचं रक्षण करण्यास आपल्या राजाची—आपल्या

प्रभूची तरवार समर्थ आहे. मला कशाचीहि भीति नाहीं. तुम्ही स्वस्थ असा. फक्त आंतून माझे कपडे घेऊन या जा. ( शिलेदार जातो. ) ( स्वगत ) झालेल्या अपशकुनांनीं आपलं अमंगल स्वरूप प्रगट करण्यास सुरुवात केली ! पंतांच्या मुलाखतीचे वेळीं देवीनं दिलेली ' डावी ' नं आपला डाव साधला ! हे राजदूत नसून माझा प्राण हिरावून नेणारे यमदूत आहेत, हें माझ्या दृष्टीला साफ दिसत आहे. रात्रींच्या या भयाण वेळीं या सर्व परिचित वस्तूंवर अंधाराचें काळें वस्त्र पडलें असतां, जर मी इथून गेलों, तर—तर हा सभोंवतालचा रम्य प्रदेश, हीं आल्हादजनक खिंडारें, आम्हां सरनाईकांच्या सुखदुःखाची समतेनं वाटेकरीण होणारी ही झोंपडी हीं सर्व पुनः केव्हां तरी माझ्या दृष्टीस पडतील काय ?—पण माझं मन इतकं भीरू कां बरं बनावं ? रणसंग्रामाच्या वेळीं मृत्यूचं भीषण स्वरूप डोळ्यांपुढं दिसत असतां—क्षणाचाहि भरंवसा नसतां आम्ही आमच्या राजाकरितां, आनंदानं—उत्साहानं—निर्भय चित्तानं प्राण खर्चीं घालण्यास पुढं पुढं सरसावीत असतों, मग आजच्या प्रसंगीं मी इतका भ्याड कां बरं बनलों ? माझं मन इतकं दुर्बल कां बरं व्हावं ?—आजचं मरण म्हणजे भागूबाईचं मरण आणि रणमैदानावरील मरण म्हणजे वीरोचित मरण ! एकानं अक्षय नरकवास तर दुसऱ्यानं अक्षय स्वर्गवास ! एकानं कुळाची, पुढील पिढीची आणि स्वतःची बदनामी आणि दुसऱ्यानं दिगंत किर्तीची वंशपरंपरेनें वतनवारी ! इतका ह्या दोन मरणांत फरक असतां मी यांच्याबरोबर जायला कां तयार व्हावं ?—यांचा प्रतिकार करण्याचं माझ्या अंगांत सामर्थ्य असतां हे नेतील तिकडं एखाद्या मुक्या निर्बल जनावराप्रमाणं त्यांच्या मागून जाण्यास मी कां तयार व्हावं ?—पण ही राजाज्ञा ! अरेरे ! या क्षणभंगुर देहाच्या आशेनं प्रत्यक्ष आमच्या प्रभूला—त्याच्या आज्ञेला वाटेल तसें दूषण द्यायला मी तयार झालों आं ! धिक्कार असो मला ! ह्या जिवाच्या आशेनं ही राजाज्ञा अमान्य केली तर सगळ्या जगाच्या दृष्टीनं मी ' राजद्रोही ' ठरेन !—छे ! छे ! आतांपर्यंत पावलेल्या राजनिष्ठेच्या व्रताचं उद्यापन होण्याच्या ऐन प्रसंगीं हा असला घाणेरडा आरोप मी कसा सहन करूं ? नाहीं—नाहीं—मला यांच्या बरोबर गेलंच पाहिजे. माझ्यासारख्या राजनिष्ठ शिला चिखलांत नाहींशा होऊन जर स्वराज्यमंदिराचा पाया भरभक्कम होणार असेल तर मी आपली मान यांच्या स्वाधीन करण्यास काय हरकत आहे ?

( शिलेदार येतो. )

**शिलेदारः**—( कपडे पुढें करून ) धनीसाहेब, अजूनपर्यंत निर्विकार दिसणारी आपली चर्या अशी एकाएकीं कालवंडलेली कां दिसूं लागली ?

**जगदेव०**—( कपडे चढवीत ) शिलेदार, कोणत्याहि भीतीच्या विचारांनीं माझ्या चर्येंत फरक पडेल कीं नाहीं, याची तुम्हाला खात्री आहेच ! मी आतां जातों—पण शिलेदार, माझी सारी भिस्त, माझ्या साऱ्या आशा–आकांक्षेचं ओझं, माझ्या कृपणाच्या जीवितसर्वस्वाचं रक्षण करण्याची जबाबदारी तुमच्यावर शिलेदार, सरनाईकांच्या अन्नावर पोसलेल्या, सरनाईकांच्या सेवेंत आयुष्य घालविलेल्या विश्वासू मित्रावर आहे. माझा पंचप्राण, सरनाईकांच्या घराण्याचा आशातंतु—माझा लाडका मानाजी आणि माझी लाडकी तारा मी तुमच्या पदरांत घालीत आहें. त्यांच्या पित्याच्या पाठीमागं त्यांच्या सर्व जबाबदारीचं काम मी आपल्या शिरावर घेऊन आजपर्यंत केलं, परंतु आतां त्या दोघां अज्ञान, अनुभवशून्य, जगाचे आघात न सोसलेल्या अर्भकांच्या पित्याच्या स्थानावर मी तुम्हाला बसवीत आहें. त्यांच्या शिक्षणाची काळजी घेऊन त्यांना आपल्या राजाच्या अल्पस्वल्प का होईना उपयोगीं पडतां येईल इतकी शक्ति त्यांना दिलीत म्हणजे माझ्या आत्म्याला आनंद होईल. सर-नाईकांच्या राजनिष्ठेच्या ब्रीदाची साक्ष त्यांच्या हृत्पटलावर कायमची खोदून ठेवा !—मी आतां ज्यास्त काय सांगूं ? इतर कोणत्याहि कर्तव्यापेक्षां आपल्या मुलाबाळांना आपल्या राजाच्या कामीं येण्याइतकं शिक्षण देणं हेंच प्रत्येक पित्याचं श्रेष्ठतर कर्तव्य आहे हें लक्षांत ठेवा. माझ्या समक्ष तारा आणि मल्हारी यांचं लग्न झालं असतं म्हणजे माझा जीव घुटमळत राहिला नसता पण असो. परमेश्वराची इच्छा ! जातों आतां. मुलं उठलीं म्हणजे त्यांची समजूत करा आणि त्यांना माझा शेवटचा आशीर्वाद सांगा—( जाऊं लागतो पण अडखळतो. ) पण—पण—हा मायापाश तोडून पुढें जायला एक पाऊलहि उचलत नाहीं. तीं पहा—मी दृष्टीला न पडल्यामुळं दीन मुद्रा करून अश्रुभरित नेत्रांनीं मायेच्या एका शब्दाची अपेक्षा करीत असलेलीं माझीं पाडसं माझ्या अंतःचक्षूंसमोर दिसूं लागलीं. मी केव्हांहि दृष्टीस पडणार नाहीं अशी खात्री झाल्यावर “ बाबा—बाबा—” म्हणून माझ्या बाळांनीं फोडलेला हंबरडा माझ्या कानांत सारखा नाद करीत आहे. ( पडद्यांत मानाजी ‘बाबा—बाबा—’ म्हणून हांक मारतो ) ये, माझ्या वासरा—माझ्या पंचप्राणा—माझ्या जीवना—ये, मला एकदां तुला डोळे भरून पाहूं दे तरी—( मानाजी

'बाबा' म्हणून धांवत येतो. मागून तारा येते. जगदेवराव त्याला एकदम उचलून घेतो व तारेला पोटाशीं धरतो. ) देवा ! हा सुखाच्या उत्तुंग शिखरावर बसविणारा क्षण माझ्या आयुष्यांतील शेवटचाच क्षण ठरणार ना ?

**मानाजीः**—बाबा, तुम्ही चाललांत कुठं ?

**ताराः**—आणि तुमची चर्या अशी दुःखी कां दिसते ?

**मानाजीः**—काळोख किती—किती पडला आहे !

**ताराः**—हे शिपाई येथें कशाकरितां आले आहेत ? ( मानाजीला खालीं ठेवतो. )

**मानाजीः**—बाबा, बोला—बोला—बोलाना ?—मी नाहीं जा !—मी तुमचा ना ?

**जगदेव०**—( स्वगत ) 'मी तुमचा ना ?" या या अर्भकाच्या तोंडच्या शब्दांत अशी काय मोहिनी भरली आहे ? या शब्दानें निर्विकार पाषाण सुद्धां विकारवश होईल, पण माझ्या मनांत अनुकूल विकारांचा कल्लोळ न माजतां विषण्णतेला—निराशेला—गहिंवराला मात्र भरती येत आहे.

**मानाजीः**—बाबा, तुम्ही बोलत कां नाहीं ? माझ्यावर कां रागावलांत ?

**ताराः**—बाबा, आम्ही अज्ञ लेंकरं ! तुमच्या या मूकवृत्तीनं आम्ही समजावं तरी काय ? बाबा, हा प्रकार आहे तरी काय ? सांगा बाबा, सांगा—

**जगदेव०**—तारे, मी काय सांगू ?—मी अधिक काय सांगू ? मला संभाजी महाराजांचं बोलावणं आलं आहे. मी तिकडे—गडावर जात आहें.—जा, बाळा मानाजी, जा—झोंप जा—

**मानाजीः**—पण मला बाबा तुमच्याशिवाय झोंपच यावयाची नाहीं—मी नाहीं जा—तुम्ही चला झोंपायला—

**ताराः**—पण बाबा, महाराजांकडे तुम्हीं नेहमीं जातां, त्यावेळीं तुमची अशी नजर—ती तोंडावरची कळा मी कधींच पाहिली नाहीं.

**जगदेव०**—तारे, तुझ्या मनाचं समाधान मी कसं करूं ? जा—तारे, परमेश्वरावर विश्वास ठेवून जगाच्या आघाताशीं तोंड द्यायला आतां तयार हो. तारे, वडिलांच्या छत्राखालीं निर्घोर झोंप घेणाऱ्या तुझ्या निष्काळजी कोमल मनाला चिंतेचं आणि दुःखाचं ओझं सहन करण्यास आतां तयार कर. आतां तारे, तुझ्यावर येऊन पडलेला प्रसंग ओळखून जगाच्या दुष्टपणाशीं धैर्यानं टक्कर देण्यास कचरूं नकोस आणि परमेश्वराला प्रिय होशील अशी वाग. तुझं

कर्तव्य—तारे, पुत्रापेक्षांहि श्रेष्ठतर पवित्र कर्तव्य बजावणारी कन्या तीन कुळांचा उद्धार करण्यास कशी कारणीभूत होते हें जगाच्या निदर्शनास आणून दे.

**तारा**:—बाबा, तुम्ही तर ही शेवटची निरवानिरवच करीत आहांत.

**जगदेव०**—होय बाळे. मी येथून गेल्यावर त्या काळाच्या अजस्र जबड्यांत केव्हां अदृश्य होईन याचा नियम मला कांहींच सांगतां येत नाहीं. तारे, अशी गोंधळून जाऊं नकोस. तुझ्या शिरावर येऊन पडणारी जबाबदारी आतां तुला ओळखली पाहिजे. माझ्या मानाजीला—या कच्च्या मडक्याला मायेच्या शब्दांनीं शिकवून सरनाईकांचं 'स्वामिभक्ति' हें ब्रीदवाक्य त्याच्या हृत्पटलावर ठसाव आणि त्याला आपल्या राष्ट्राचा राजनिष्ठ घटकावयव कर. जा— तुम्हाला परमेश्वर दीर्घायुषी करो. तारे, मी जातों. बाळा मानाजी, जा—ताई गाणीं म्हणेल, तूं झोंप जा. मी सकाळीं येईन. जा—

**मानाजी**:—नाहीं. मी नाहीं जा—मी रडत बसेन. ( बसतो. ) तुम्ही जाऊं नका.

**जगदेव०**—बाळा, मला महाराजांनीं कामाकरितां बोलाविलं आहे, न जाऊन कसं चालेल ?

**तारा**:—मानाजी, चल बाळ, मी गाणीं म्हणतें. बाबा सकाळीं येतील. ये मजजवळ.

**मानाजी**:—मी नाहीं जा—मी नाहीं येणार ! मी जातों बाबांच्या बरोबर.

**तारा**:—असं काय बरें करावं बाळ ! चल ये मजजवळ—( ओढून घेते. तो रडूं लागतो. )

**जगदेव०**—( स्वगत ) या रत्नाला असा रडत ठेवून पुढं पाऊल टाकायला माझ्या पायांत सामर्थ्यच उरलं नाहीं. पण मी यांची समजूत कशी करूं ? ( जाऊं लागतो. मानाजी 'बाबा बाबा' म्हणून ओरडतो. तारा अश्रुयुक्त नजरेनें पहाते ) माया माझ्या कर्तव्याला आड येते. हाय ! हाय ! ! मानाजी— बाळा—लाडक्या ! असा रडत राहून माझ्या कर्तव्याला बाध आणण्याचा प्रयत्न करूं नकोस. तारे ! बाळे तारे, नको—माझ्याकडे केविलवाण्या मुद्रेनें पाहूं नको. तुझी ती अश्रुभरित नजर माझ्या कर्तव्याच्या आड येते. जा— ( एकदम जातो. शिपाई जातात. मानाजी 'बाबा' म्हणत मागें धांवत जातो. ताराहि त्याला पकडण्यास जाते. )

नो.न. ११३२८

## प्रवेश चौथा

**स्थळ**:—राजमहाल.

( संभाजी कोचावर बसलेला आहे. )

**संभाजी**:—राजनिष्ठ म्हणविणाऱ्या अष्टप्रधानांनीं संगनमत करून आरंभापासून मला पडद्याआड ठेवण्याचा कट केला होता काय? पण हा संभाजी असा हार जाणारा नव्हे!—कलुषा आपल्या मंत्रसामर्थ्यामुळं ह्या मुत्सद्दी चोरांचीं एक एक गुप्त कारस्थानं चव्हाट्यावर आणीत आहे. आतां हळुहळु या सर्वांचा मला नायनाट केलाच पाहिजे. मला गादीवर बसवूं नये असं आबासाहेब बोलले, तेंच खरं मानून त्या राज्यलोभी चांडाळीण सोयराबाईनं राजारामाला गादीवर बसविलं.—मला कवडीमोल नादान ठरविण्याचा तिनं घाट घातला काय? आणि या कामीं तिला हरामखोर शिर्क्यांची मदत!—मी क्रूरकर्मा बनलों, शिरक्यांचा शिरकाण केला, माझ्या शत्रूंचा मी समूळ उच्छेद केला याचा दोष मला कीं त्या कपटपटूंना? मी असा क्रूर कां बनलों? मुळांत मी असाच आहें काय?—मनुष्यस्वभाव परिस्थिती-प्रमाणं बनतो, कीं मनुष्यस्वभावाप्रमाणं परिस्थिति उत्पन्न होते! नाहीं. परिस्थिति-प्रमाणंच मनुष्यस्वभाव बनतो. हा संभाजी हाडाचा तसा नाहीं. ह्या कपटी—स्वार्थसाधु मंत्रीमंडळानं उत्पन्न केलेल्या परिस्थितीमुळं मी क्रूरकर्मा बनलों, हेंच खरं! अद्यापि शिल्लक राहिलेल्या मंडळींनीं मला शिकविण्याचा आव घालावा इतका मी दूधखुळा आहें, अशी यांची समजूत आहे काय? ठीक आहे, चालूं द्या. आतां वाटेल त्यानं हवेतसे कपटप्रयोग करावे, हा संभाजी तिळभरहि फसणार नाहीं—त्या पहा, आमच्या शहाण्या राणीसाहेब आपल्या बहकलेल्या पतीला उपदेश करण्याकरितां इकडेच येत आहेत.

( येसूबाई प्रवेश करते. )

**येसूबाई**:—( हात जोडून ) महाराज, माझी एक विनंति आहे.

**संभाजी**:—पतीच्या इभ्रतीला लांछन आणणारी अशी विनंति माझ्याकडून मान्य होणार नाहीं हें लक्षांत ठेवा!

**येसूबाई**:—महाराज, पतीच्या इभ्रतीचा सादर अभिमान पत्नीच्या अंत:करणांत वसत असेल हें असंभवनीय आहे. पण महाराज, राज्यरक्षणाची जबाबदारी अंगावर पडलेली असतां लोककल्याणाकरितां स्वत:च्या इभ्रतीचा अभिमान बाजूला ठेवून राज्याची इभ्रत कायम ठेवावी लागते.

**संभाजीः**—या आपल्या युक्तिवादाप्रमाणं जर आजपर्यंत मी वागत आलों असतों तर पन्हाळगडच्या कोणत्या कोनाकोपऱ्यांत धूळ खात पडलों असतों, हें एकाऱ्याहि कानीं गेलं नसतं. या संभाजीला—प्रत्यक्ष आपल्या पतीला—कैदेंत खितपत ठेवून राज्याचा उपभोग दुसऱ्यांना घेऊं देणाऱ्या राणीसाहेबांनीं युक्तीवादाच्या गोष्टी सांगण्यांत कांहीं अर्थ व्हायचा नाहीं.—ह्या संभाजीला गडावर कोंडून ठेविला होता काय ? सिंहाच्या जबड्यांत हात घालून त्याला खिंडारांतून भर पटांगणांत खेंचून आणणाऱ्या संभाजीला त्या गडाची कोंडी फोडतां येणार नाहीं अशी या मूर्खांची—आबासाहेबांच्या विश्वासु मंत्रिमंडळाची—राणीसाहेब आपली आणि आपले बंधु शिर्के यांची समजूत होतीना ? पण अजून सांगतों—जा—माझ्या विरुद्ध कट करा—फितुरी माजवा—खलबतें करा—वाटेल तें करा. तुम्हां सर्वांना पुरून उरण्यास मी समर्थ आहें.

**येसूबाईः**—पण महाराज, स्वतःच्या अभिमानानं राज्य धुळीस मिळविणं चांगलं का ? त्या मेल्या चांडाळ कलुषानं आपल्या पवित्र मनाला कलुषित केलं आहे. आपण मनाची अशी निष्कारण समजूत करून घेऊन आपल्या परमपूज्य कैलासवासी आबासाहेबांच्या जिवाला जीव देणाऱ्या विश्वासू राजनिष्ठ मुत्सद्यांचा हा यज्ञ चालविला आहे. याचा परिणाम काय होईल याचा विचार करा. त्या दुष्ट कलुषानं आपणास पुरी भुरळ घातली आहे. महाराज, राज्यांत चोहोंकडून उडालेला हाहाःकार आपल्या कानीं येत नाहीं काय ? हवालदील झालेली प्रजा न्यायाकरितां द्वाराबाहेर कंठशोष करीत असलेली आपणांस ऐकूं येत नाहीं काय ? सुरतकर, गोवेंकर, जंजिरेकर, यांचीं स्वराज्याविरुद्ध चाललेलीं कारस्थानं आपल्या लक्षांत येत नाहींत काय ? महाराज—ऐका—

**संभाजीः**—राणीनं राजकारणांत बोलण्याची जरूरी नाहीं.

( तोंड फिरवितो. )

**येसूबाईः**—महाराज, ह्या दीन दासीवर आपला इतका राग कां ? त्या मथुरेच्या दुष्ट चोब्यानं माझ्या सौभाग्यरवीला राहूसारखं ग्रासून टाकिलं आहे. महाराज, कैलासवासी आबासाहेबांच्या प्रत्येक मुत्सद्दी वीराबद्दल त्या चांडाळ राज्यनाशक भटानं आपल्या पवित्र मनांत वीष भरविलं आहे. त्या दुष्टाची सर्व कृति स्वार्थी आहे. स्वतःचा नीच स्वार्थ साधण्यासाठीं राजकारणपटु समरवीरांचा नायनाट करून आपणांत—प्रत्यक्ष पतिपत्नींत बिघाड घालण्याचं

त्याचं कारस्थान आपल्या कसं लक्षांत येत नाहीं ? महाराज, त्या चांडाळाला— त्या दुष्ट कबजीला—

**संभाजीः**—बस्स ! राणीचं ज्यास्त भाषण ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. ह्या संभाजीला राजकारण चांगलं कळतं. कलुषाविरुद्ध राणीनं कितीहि कंठशोष केला तरी त्याचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. राणीनं राजकारणाच्या भानगडींत न पडतां दैवयोगानं लाभलेल्या राजैश्वर्याचा राजमहालीं बसून सुखानं उपभोग घ्यावा. नाहीं तर आपल्या फुटक्या नशी-बानं दैवाला बोल लावीत गडाच्या एखाद्या कोपऱ्यांत तिला आयुष्याचे दिवस कंठावे लागतील याचा विचार करावा.

**येसूबाईः**—महाराज—स्वामि, मी आपणापुढं पदर पसरतें. माझ्या बोलण्याचा आपण असा अव्हेर करूं नये. आपल्या हातून न कळत होणाऱ्या अन्यायामुळं हळहळणाऱ्या प्रजेनं शापित केलेलं हें राजैश्वर्य उपभोगणं मला विषतुल्य वाटत आहे. त्यापेक्षां—

**संभाजीः**—राणीनें आतां माझ्या सहनशीलतेचा अंत पाहूं नये ! ( ओरडून ) जा—माझ्या दृष्टि समोरून जा. नाहीं तर व्यर्थ माझ्या रागाला बळी पडाल. ( डोळ्याला पदर लावून राणी जाते. मोरोपंत प्रवेश करितो. ) कोण मोरोपंत, तुम्ही आलांत काय ?

**मोरोपंतः**—[ मुजरा करून ] सरकारच्या सेवेला हा सेवक चरणां-जवळ हजर आहे. आतां राणीसाहेबांवर इतका राग होण्याचं काय कारण झालं ?

**संभाजीः**—पंत, मला ह्या तुमच्या दुटप्पी वर्तनाची मोठी चीड आहे. त्या राक्षसी सोयराबाईच्या कृष्ण कारस्थानांत तुमची बाजू उलटली म्हणून तुम्ही हा प्रत्यक्ष माझ्या घरांत फंदफितुरीचा आणि गुप्त कटाचा डाव मांडला आहे काय ? पण लक्षांत ठेवा, हा संभाजी तुमच्यासारख्या स्वामिभक्त म्हण-विणाऱ्या पण बेइमान मनुष्यावर केव्हांहि विश्वास ठेवणार नाहीं. जा, तुम्हीहि आपलीं कारस्थानं अशींच चालवा, मला त्याची पर्वा नाहीं. वाटेल तितकीं गुप्त खलबतं करून ह्या संभाजीला पदच्युत करण्याचे हवे तितके प्रयत्न करा. ह्या संभाजीला अशा कृत्यांनीं केव्हांहि शह लागणार नाहीं. पंत, तुमची मति पालटली आहे—तुमच्या चित्ताला भ्रम झाला आहे—आबासाहेबांनीं तुमच्यावर ठेविलेल्या विश्वासाची तुम्ही कवडीमोल किंमत करून टाकिली

आहे. तुमच्यासारख्या निमकहराम मनुष्याची मला माझ्या राज्यांत बिलकुल जरूरी उरली नाहीं. तुमचीं गुप्त कारस्थानं मला कळत नाहींत असं तुम्ही समजतां काय ? तुमचे गुप्त बेत मला दिसत नाहींत असं तुम्हाला वाटतं काय ? तुमचीं गुप्त खलबतं मला ऐकूं येत नाहींत, असा तुम्हाला भ्रम झाला आहे काय ? हरामखोर—बेइमान—

**मोरोपंतः**— महाराज, गादीच्या ह्या एकनिष्ठ सेवकाबद्दल आपणास असा संशय आला असेल तर हें शीर स्वामिकार्याकरितां वाहिलेलंच आहे.

**संभाजीः**—( हिणावीत ) स्वामिकार्य ! पंत, तुम्ही मला कोण समजलांत ? राजनिष्ठेची घमेंड तुम्ही कशाला मारतां ? तुमची राजनिष्ठा आतां लालचावली आहे. हा संभाजी म्हणजे एखादं पोर, त्याला केव्हांच बगलेंत मारूं असा तुम्हाला अभिमान झाला आहे. ठीक आहे. तुम्हां—सर्व शक्तीची घमेंड मारणाऱ्या—अकलेचा तोरा मिरविणाऱ्या बेइमान राजनिष्ठांना मी पुरा ओळखून आहें.

**मोरोपंतः**—शिव ! शिव ! महाराज, आपण हें काय बोलतां ?

**संभाजीः**—काय बोलतों तें आतांच कळेल.

**हुजऱ्याः**—( प्रवेश करून ) सरकार, कैद्याला घेऊन कविराज आले आहेत.

**संभाजीः**—जा, त्यांना पाठवून दे आंत. मला ह्या सर्व गोष्टींचा आत्तांच निकाल लाविला पाहिजे. ( कबजी, शृंखलाबद्ध जगदेवराव, नेमाजी आणि शिपाई प्रवेश करितात. मुजरे होतात. ) कबजी, कैद्यानें कोणत्या गोष्टी कबूल केल्या ? सांगा—

**कलुषाः**—सरनाईक एकहि गोष्ट कबूल करीत नाहींत; आणि ते कोणतीहि गोष्ट कबूल करतील असं मला वाटतहि नाहीं.

**संभाजीः**—सरनाईक, तुम्ही कोणापुढं उभे आहांत हें लक्षांत ठेवा आणि सर्व गोष्टी कबूल करा. मी तुमचा कडेलोट करण्याचा दिलेला हुकूम पुनः मागें घेतों. करा—अजून विचार करा आणि राज्यलोभानं आबासाहेबांना विषप्रयोग करणाऱ्या त्या भर्तृघातकी चांडाळणीला कोण कोण सामील होते, त्यांचीं पटापट नांवं सांगा. बोला—ह्या विषप्रयोगाच्या कटांत कोण कोण होते ?

**जगदेव०**—महाराज विचारतात त्यांपैकीं एकहि गोष्ट मला माहित नाहीं. मी महाराजांच्या पवित्र चरणांपुढं उभा आहें, तेव्हां सत्याला स्मरून सांगतों,

कीं ह्या नेकजात सेवकानं ह्या पवित्र गादीविरुद्ध स्वप्नांतहि आचार-विचार आणि कृति केली नाहीं. आणि ह्या कुडींत प्राण आहे तोंवर करणारहि नाहीं.

**संभाजीः**—मला पक्का संशय आला आहे. आतां कां उगीच खोटं बोलतां?

**जगदेव०**—महाराज, खोटं बोलणं—खोटं कर्म करणं हें सरनाईकांचं ब्रीद नाहीं.

**संभाजीः**—मग खरी गोष्ट कबूल करून प्राण वांचवावे अशी तुमची इच्छा नाहीं तर! पहा—अजून विचार करा. असे निमकहराम होऊं नका.

**जगदेव०**—महाराज, दुःखावर कां डाग देतां? सरकार, ह्या जगदेवरावाच्या शरीरांत असणाऱ्या प्रत्येक रंध्रारंध्रांतील जागा निमकहलालीनं भरली आहे.

**संभाजीः**—बस्स मला सगळ्या गोष्टी कळल्याच पाहिजेत. सरनाईक मी तुमचा कडेलोट करून स्वस्थ बसणार नाहीं हें लक्षांत ठेवा. मी त्या हरामजाद्या शिर्क्यांचा शिरकाण केला, पण तुमच्या घरादारावरून नांगर फिरवून तुमच्या कुळाचा समूळ उच्छेद करीन.

**कलुषाः**—पहा नाईक, कां उगाच हट्टाला पेटतां? सांगून टाका झालं! तुम्ही मराल ते मराल, पण घरीं तीं कच्चींबच्चीं आहेत तीं कां उगाच मारतां?

**जगदेव०**—मी स्वतः मारीत नाहीं. महाराजांच्या हुकूमानं जर तीं मरत आहेत तर तिथं कुरकुर करण्याचा मला अधिकार नाहीं. महाराजांच्या अन्नाचे ते पिंड बनलेले आहेत, त्यावर महाराजांचा पूर्ण अधिकार आहे.

**कलुषाः**—मग तुमचीं मुलंबाळं मरणार त्याबद्दलहि तुम्हाला वाईट वाटत नाहीं तर?

**जगदेव०**—वाईट! होय—थोडं वाईट वाटतं. आजपर्यंत हा देह मी स्वामिकार्याकरितां झिजविला. त्याप्रमाणं माझ्या मुलानं—माझ्या बाजीनं—त्या खोपटांत असलेल्या अज्ञान पोरांच्या बापानं हातावर शीर घेऊन थोरल्या महाराजांच्या पवित्र कार्याकरितां आपला देह रणभूमीवर ठेविला—आहाहा—! धन्य माझा बाजी! माझ्या बाजीप्रमाणं त्याचीं तीं पोरं स्वामिकार्याला उपयोगी न येतां मरणार म्हणूनच मला वाईट वाटत आहे.

**संभाजीः**—बस्स! जगदेवराव, तुमच्या स्वामिभक्तीचं हें गुऱ्हाळ आतां बंद करा. मला ज्यास्त गोष्टी ऐकण्याची बिलकुल जरूरी नाहीं. कबजी!

**कलुषाः**—( हात जोडून ) सरकार—

**संभाजीः**—ह्या वृद्ध कपीचा एकदम कडेलोट करा !

**जगदेव०**—( क्षणभर थांबून ) खुद्द महाराजांच्या हातून मला आज मृत्यु येत आहे. आणि माझ्या मृत्यूमुळं महाराजांना समाधान होणार आहे, हें पाहून माझ्या देहाची सार्थकता झाली असं मी समजतों. मजसारख्या क्षुद्र मनुष्याच्या मृत्यूबद्दल महाराजांना पश्चात्ताप करण्याची वेळ कधींहि न येवो आणि थोरल्या महाराजांप्रमाणं प्रत्येक कार्यांत महाराजांना यशःप्राप्ति होऊन महाराज सदैव सुखी असोत इतकीच माझी परमेश्वरा ! तुझ्याजवळ प्रार्थना आहे.

**मोरोपंतः**—( हात जोडून हळूच ) महाराज, सरनाईकांच्या बाबतींत हा अन्याय होत आहे.

**संभाजीः**—अन्याय ! पंत, तुम्ही मला न्याय शिकवूं पहातां काय ? ह्या वृद्ध कपीबद्दल तुम्ही रदबदली करतां काय ? रात्रीं अपरात्रीं तुमचीं ह्या वृद्ध कपीबरोबर चाललेलीं न्यायाचीं गुप्त कारस्थानं हीं पहा आत्तांच मी हाणून पाडतों; आणि हा संभाजी न्यायाची साक्ष पटविण्याकरितांच, न्यायाच्या कामांत कोणाचीहि भीडमुर्वत न धरतां तुम्हाला कारागृहाची शिक्षा देत आहे. जा—भोगा आपल्या कृष्णकर्मांचीं फळं ! कबजी—

**कलुषाः**—( हात जोडून ) सरकार—

**संभाजीः**—माझ्या हुकुमांची आत्तांचे आत्तां अंमलबजावणी करा— जा—( उठून एकदम जाऊं लागतो. )

**जगदेव०**—महाराज, ह्या गरीब नम्र सेवकाचा हा शेवटचा रामराम !

( मुजरा करतो. ) ( पडदा पडतो. )

---

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

**स्थळ:**—जगदेवराव सरनाईकांच्या घराची पुढील बाजू.

( तारा सचिंत प्रवेश करते. )

**तारा:**—शिलेदार म्हणतात ती गोष्ट खरी असेल काय ? थोरल्या महाराजांच्या पावलावर पाऊल टाकून स्वराज्यविस्ताराची प्रतिज्ञा करणारे आमचे संभाजीमहाराज असा कपटप्रयोग करायला तयार होतील काय ? आपल्या पूज्य स्वामीच्या पवित्र कार्यासाठीं धडाडलेल्या रणकुंडांत मोठ्या आनंदानं स्वदेहाची आहुति देणाऱ्या आमच्या सरनाईकांच्या घराण्याचा लौकिक ते आजच विसरले काय ? सरनाईकांच्या घराण्यांतील प्रत्येक पुरुष खऱ्या दिलाचा, सच्च्या रक्ताचा आणि निधड्या छातीचा आहे हें पूर्णपणें माहित असूनहि बाबांच्या स्वामिभक्तीविषयीं महाराजांना संशय आला ही गोष्ट संभवते तरी का ?—नाहीं, नाहीं, अशी गोष्ट कालत्रयींहि घडायची नाहीं. पण बाबांना गडावरून यावयाला इतका वेळ कां बरं लागावा ? या पूर्वी ते कैकवेळां रात्रीं अपरात्रीं गडावर जात असत, त्यावेळीं माझ्या मनाची अशी चलबिचल केव्हांहि झाली नाहीं. मग आजच माझं मन अस्वस्थ कां बरं व्हावं ? काल सर्व दिवस बाबांना दुश्चिन्हं होत होतीं तीं—

( मल्हारी प्रवेश करतो. )

**मल्हारी:**—सर्व खरीं ठरणार !

**तारा:**—कोण !—अगदीं वेळेवर येणं झालं ! मी आपली केव्हांची वाट पहात आहें.—आतां गडावर जायचं ना ? पण गडे, प्रथम बाबांचा शोध करावा. सकाळपासून माझ्या मनाला एकसारखी हुरहूर लागून राहिली आहे.—पण कसला एवढा विचार चालला आहे ? आज आपली चर्या अशी बदललेली कां ?—हें काय ?—आज असं काय बरं पहावयाचं ! दिवस उजाडतांच तुम्ही गडावर ना जाणार होतां ?

**मल्हारी:**—( तिरस्कारानें ) गडावर जायचं म्हणतेस ?

**तारा**:—होय. तो कलुषा ब्राह्मण आपल्या महाराजांविरुद्ध कांहीं कारस्थान करील, तर त्याच्यावर इकडून नजर ठेवावी असं बाबांनीं सांगितलं आहे ना ? मग जायचं ना गडावर ?

**मल्हारी**:—( त्वेषानें ) गडावर जाणार खरा, परंतु एखाद्या चोराप्रमाणं लपून छपून कलुषाच्या हालचालीवर नजर ठेवण्याकरितां नव्हे तर आपल्या नेकजात सेवकांच्या माना मुरगळणाऱ्या त्या समंधाची—आपल्या सावत्र आईला भिंतींत चिणून मारणाऱ्या त्या राक्षसाची—शिरक्यांचा शिरकाण करणाऱ्या त्या मांगाची मान मुरगळण्याकरितां ! तारे ! तुझ्या बाबांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे, परंतु त्यांची ही एवढीच आज्ञा मला पाळतां येत नाहीं.

**तारा**:—म्हणजे ? मी आज हें निराळंच ऐकतें !

**मल्हारी**:—निराळं नव्हे, मुळांतलंच आहे ! माझ्या मनःक्षेत्रांत सुडाचं प्रचंड अग्निकुंड पेटलेलं आहे. तुझ्या बाबांच्या उपदेशाच्या गारठ्यानं त्याची तीव्रता क्षीण होत असे इतकंच ! पण तुझ्या बाबांना अपरात्रीं कैद करून नेण्यांत त्या नीचाचा हेतु चांगला नाहीं हें पक्कें समजून चुकल्यापासून, त्या अग्नीच्या ज्वाला माझ्या अंगाची एकसारखी आग आग करून सोडीत आहेत. त्या अग्नींत राजनिष्ठा—स्वामिभक्ति—नेकजातपणा यांची जळून पार राख-रांगोळी झाली ! या सुडाच्या संतापानं सळसळणारं माझ्या अंगांतील रक्त दुसरे विचारच मला सुचूं देत नाहींत.

**तारा**:—( किंचित् रागानें ) मग कसले विचार सुचतात ? आपल्या राजाच्या—आपल्या धर्माच्या—आपल्या शीलाच्या शत्रूंशीं संगनमत करून आपल्या राजाचा खून करण्याचे—आपल्या शीलावर अक्षय्य काळं फासण्याचे विचार सुचत असतील तुम्हाला ? एकूण आपण दिसतां तसे नाहीं तर ! वेळींच परीक्षा झाली म्हणायची !

**मल्हारी**:—राजा ! राजा कसला तो ! थोरल्या महाराजांनीं आंखून दिलेल्या पवित्र ध्येयाकरितां शीर हातांत घेऊन वेळीं अवेळीं संकटांत प्राण घालणारांचीं शिरें तडातड तोडणारा तो राजा कसला ? तो आपल्या सर्वस्वावर उठला तो आपला शत्रूच ! आणि शत्रूची गय करणं नीतीच्या विरुद्ध आहे.

**तारा**:—तुमची नीति आम्हां बायकांना काय कळणार आहे ! आमचं शहाणपण फक्त चुलीपुरतं ! पण राजा म्हणजे ईश्वर—आणि त्याच्या विरुद्ध वाईट विचार करणं म्हणजे राजनिष्ठेच्या नीतिविरुद्ध आहे.

**मल्हारी**:—राजा म्हणजे ईश्वर खरा ! पण त्या राजाच्या अंगांत दैविक गुण खेळत असले पाहिजेत ना ? हा संभाजी म्हणजे दुर्व्यसनांत लोळणारा किडा—अमानुष कृत्यें करून त्यांत धन्यता मानणारा अधम निशाचर—सच्छील प्रजाजनांचा हकनाहक प्राण हिरावून घेणारा यमदूत आहे. याच्याबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी कशी ? मी तर असा निर्धार केला आहे कीं, या संभाजीला कंठस्नान घालून त्याच्या दुष्टपणाचं त्याला प्रायश्चित्त दिल्यावांचून आतां रहावयाचं नाहीं.

**तारा**:—( रागानें ) असं का ? मग माझाहि निर्धार ऐका. तुमच्यासारख्या नीच विचारांच्या नराधमानं आमच्या राजाला कंठस्नान घालतेवेळीं माझ्यासारख्या अबलेला राज्याचा नाश होऊं नये म्हणून दुष्ट विकारांनीं भारावलेलं तुमचं मस्तक आमच्या प्रभूच्या पायावर घालून तुम्हांला नीतीचे पाठ शिकवावे लागतील.

**मल्हारी**:—काय तारे, तूंच बोलतेस हें ?

**तारा**:—होय मीच बोलतें. आपल्या प्रभूसंबंधानं घातकी विचार आपल्या तोंडून बाहेर पडले हें जितकं सत्य आहे, तितकंच हेंहि सत्य आहे ! आपणाला माझ्या अबलत्वामुळं कदाचित् शंका आली असेल, पण तुमच्यासारखे शूराग्रणी जर आपल्या शौर्याचा, वीर्याचा आणि धैर्याचा उपयोग राजद्रोहाकडे करूं लागले तर आम्ही अबला, आपलं अबलत्व विसरून जाऊन तुम्हां सबलांशीं लढून तुमचा विध्वंस करून राजनिष्ठेची इभ्रत कायम राखूं हें लक्षांत ठेवा. म्हणून म्हणतें भ्रांति सोडा—ज्ञानचक्षु उघडा—आणि आपल्यासमोर कोण उभी आहे हें नीट ओळखा.

**मल्हारी**:—तारे ! तुझं डोकं तर फिरलं नाहीं ना ?

**तारा**:—माझं डोकं फिरण्यापूर्वीच आपलं डोकं फिरलं आहे तें ताळ्यावर आणा, आणि नीट शुद्धीवर येऊन तुम्ही काय बोलत आहांत याचा विचार करा.

**मल्हारी**:—तारे ! आज इतके दिवस तोच विचार करीत होतों. आतां त्या विचारांना मूर्तस्वरूप आल्यावांचून माझ्या जिवाची तळमळ नाहींशी होणार नाहीं. पहिल्यापासूनच आम्हीं शिरक्यांनीं ह्या संभाजीच्या नांग्या मोडण्याचा प्रयत्न केला असता तर—

**तारा**:—काजव्यानं सूर्याचा खून करण्याचा प्रयत्न केला असता तर—

मुंगीनं वनराजाचा गळा चिरडण्याचा प्रयत्न केला असता तर—कोंबड्यानं आकाशाच्या चिंधड्या उडविण्याचा प्रयत्न केला असता तर—हं बोला पुढं—तर काय ? बाकी तरच ती ! ही तरच पार जातां जातां गच्छंति !

**मल्हारीः**—तारे, मला तूं इतका क्षुद्र समजतेस काय ?

**ताराः**—मी आपणाला क्षुद्र केव्हांहि म्हटलेलं नाहीं. आपल्या मोठेपणाला आकाशहि ठेंगणं झालेलं आहे.

**मल्हारीः**—तारे ! आज मला तूं तोंडांतून एक शब्दहि काढूं देत नाहींस ?

**ताराः**—इतकं बोलूं दिलं हेंच भाग्य समजा.

**मल्हारीः**—तारे ! विचार कर. माझं बोलणं खोटं होणार नाहीं. तूं अजून भ्रमांत आहेस. तारे ! तुझ्या बाबांवर या वेळीं काय प्रसंग गुजरला असेल याची कल्पना देखील करवत नाहीं.

**ताराः**—माझ्या बाबांवर कसला प्रसंग येणार ? माझ्या बाबांनीं ज्या कृष्ण सर्पावर विश्वास टाकून आपल्या अमूल्य उपदेशाचं अमृत ज्याला पाजलं तोच हा कृष्णसर्प कृतघ्न होऊन त्यांना—त्यांच्या ब्रीदाला—त्यांच्या ध्येयाला दंश करतांना पहाणं यापेक्षां कोणता भयंकर प्रसंग माझ्या बाबांवर येणार आहे ?

**मल्हारीः**—तारे, तूं खास शुद्धीवर नाहींस. अग, इतक्या अवधींत तुझ्या बाबाला त्या अन्यायी राजानं हत्तीच्या पायीं तुडविलं असेल—नाहीं तर तोफेच्या तोंडीं दिलं असेल अथवा त्याचा कडेलोटहि केला असेल.

**ताराः**—एवढंच ना ? मग त्यांत काय मोठंसं ! महाराज वाटेल तें करण्यास समर्थ आहेत. सरनाईक राजनिष्ठ आहेत. आणि वाटेल तिथं आणि वाटेल त्यावेळीं आपल्या राजाकरितां मरायला तयार आहेत, हें तुम्ही विसरलांत वाटतं ?—ज्यानं या देहांत प्राण घातला त्यानंच तो हिरावून नेला तर त्यांत त्या सर्वेश्वराला दोष देणं अगदीं चुकीचं आहे. आणि त्याबद्दल माझ्या बाबांना चुकूनहि वाईट वाटावयाचं नाहीं. उलट ते समाधानच मानतील. शिवाय आपल्या सारख्या, दिवसांतून तीन रंग पालटणाऱ्या नेकजात माणसावर टाकलेल्या विश्वासाचं चीज होईल या सुखाशेच्या दिव्यानंदांत त्यांचा आत्मा स्वर्गाची पायरी चढला असेल. परंतु तसा प्रसंग येण्याच्या पूर्वींच जर आपलं हें सत्यस्वरूप त्यांना समजलं तर त्या आनंदाच्या ऐवजीं निराशेनं त्यांना दुःखांत खितपत पडावं लागेल.

**मल्हारीः**—कसंहि असो ! पण अशा दुष्ट राजाच्या हातून मरण ! तारे,

हें बायकी मरण ! अशा तऱ्हेचं बायकी मरण तुझ्या बाबांना येण्यापेक्षां त्यांचा एखाद्या मारेकऱ्यानं खून केला असता तर मला इतकं वाईट वाटलं नसतं. कारण नसतांना आपल्या एकनिष्ठ सेवकाचा खून करणाऱ्या राजाचा खूनच केला पाहिजे.

**तारा**:—( दोन्ही हात कानांवर ठेऊन ) बस्स ! बस्स ! आपल्या तोंडून एकहि शब्द ऐकून घेण्याची माझी इच्छा नाहीं. इतका वेळ मी—बाजी सरनाइकांच्या मुलीनं आपल्या स्वामीची निंदा ऐकली तेवढी बस्स झाली !—आमचा राजा म्हणजे तुम्ही कोण समजलांत ? स्वतः प्रखर सूर्याचा ताप सहन करून—झंझावाताशीं झगडून—जगाचे आघात सोसून पत्रानं, पुष्पानं, फुलानं आणि छायेनं, लहान-थोरांना, गरीब-श्रीमंतांना, शत्रु-मित्रांना समतेनं संतुष्ट करणारा कल्पवृक्षच तो ! ! ! त्याची थोरवी अवर्णनीय आहे ! त्याचा समूळ उच्छेद करणाराला नरकाशिवाय दुसरी गतीच नाहीं. राजा आहे तोंपर्यंतच तुम्हीं आहांत ! राजाच्या कृपाछत्राखालीं यच्चयावत् सगळीं माणसं निर्भयपणं वावरत आहेत. राजाच्या अभावीं तुमचे पाय जमिनीला लागले असते किंवा नाहीं, याची शंकाच आहे. अशा आमच्या राजाच्या जिवावर तुम्ही उठलां तुम्हांला काय म्हणावं हेंच कळत नाहीं ! अशा रीतीनं तुम्हां पुरुषांचे विचार जर अधोगामी होतील तर आम्हां अबलांना कोमल हातांत कठोर शस्त्र घेऊन तुम्हाला राजनिष्ठेचा मार्ग दाखवावा लागेल, हें लक्षांत ठेवा. आणि आतां यापुढें तुम्हांला याच गोष्टी बोलायच्या असतील तर आपण उभयतांची ओळख अजिबात विसरणंच चांगलं ! ( जाऊं लागते. )

**मल्हारी**:—तारे, उभी रहा. तूं काय बोलतेस याचा नीट विचार केला आहेस ना ? पहा—याचा परिणाम काय होईल याचा प्रथम विचार कर !

**तारा**:—केला—नीट विचार केला.

**मल्हारी**:—तारे, तुला माझ्या प्रेमाला मुकावं लागेल.

**तारा**:—( त्वेषानें ) मल्हारराव ! ही प्रेमाची धमकी मला देऊं नका. ज्याला आपल्या राजाची चाड नाहीं—ज्याच्या अन्नावर आपला देह पोसला जात आहे, त्याची ज्याला आठवण राहिली नाहीं, त्यानं प्रेमाची फुशारकी मारण्यांत काय अर्थ आहे ? मी तर त्याचं प्रेम पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणं—भांड्याच्या नादाप्रमाणं समजतें.

**मल्हारी**:—चुकतेस—तारे, तूं इथं साफ चुकतेस. मला राजाची चाड

नाहीं असं नाहीं. आपले छत्रपती थोरले महाराज कुणीकडं, आणि हा अन्यायी संभाजी कुणीकडं ? त्याची पारख नको का करायला ?

**ताराः**—तुम्ही काय त्यांची पारख करणार ? उलट मीच तुमची पारख केली नाहीं याबद्दल मला मात्र आतां वाईट वाटतं.

**मल्हारीः**—तारे ! मर्यादा सोडून चाललीस हें चांगलं नाहीं. बायकांनीं आपली मर्यादा—

**ताराः**—कशाला या मर्यादेच्या गोष्टी ! अशा वरकांती मर्यादेची क्षिति बाळगणारी ही तारा नव्हे. आणि तुमचे हे कुलक्षय करणारे विचार कायम राहिले तर उलट मर्यादेची कांस तुम्हालाच धरावी लागेल.

**मल्हारीः**—तारे ! पहा—पुन्हा आपल्या प्रेमाचा विचार कर.

**ताराः**—स्वामिभक्तीकरितां आपल्या सर्वस्व सुखावर पाणी सोडण्यास तयार असलेल्या सरनाईकांच्या मुलीला निःस्सीम प्रेमसुद्धां अस्सं पायाखालीं तुडविण्यास बिलकूल दिख्खत वाटावयाची नाहीं.

**मल्हारीः**—पहा तारे, तुला तुझं सर्व आयुष्य कष्टमय स्थितींत काढावं लागेल. आपल्या प्रेमविषयाला सांभाळून त्याच्याशीं संलग्न होणं हेंच तरुण कुमारिकांचं कर्तव्य आहे, हें विसरूं नकोस.

**ताराः**—जेथें पुरुषांना कर्तव्याचा विसर पडला, त्या ठिकाणीं बायकांना आपल्या कर्तव्याचा विसर पडावा यांत काय नवल ? ज्या कुमारिकांना जगांत अधिक श्रेष्ठ कर्तव्य उरतं नाहीं, त्यांच्याकरितांच तुम्ही सांगतां तो मार्ग ! पण माझ्या कर्तव्याचं बाळकडू माझ्या बाबांनीं लहानपणापासूनच मला पाजलेलं आहे. त्या माझ्या श्रेष्ठतम कर्तव्यापुढं जगांतील कोणतीहि ऐहिक वस्तू मला प्रिय नाहीं.

**मल्हारीः**—तुझं डोकंच ठिकाणावर नाहीं. एरव्हीं तुला माझा हा युक्तिवाद तेव्हांच पटता.

**ताराः**—आमच्या पूज्य महाराजांच्या विरुद्ध युक्तिवाद ऐकण्याची ह्या तारेला मुळींच जरूरी नाहीं. ( रागानें जाते. )

**मल्हारीः**—तारेनं माझा असा उपमर्द करावा काय ?—माझा उपमर्द करून तारे, माझ्या प्रेमाचा तूं धिःक्कार केलास काय ? ठीक आहे. हा मल्हारीहि तुझ्या प्रेमाला कस्पटाप्रमाणं लेखून तें हें असं पायाखालीं तुडवून जातो आहे पहा— ( जातो. )

## प्रवेश दुसरा

**स्थळ**—नांदगांवचा रस्ता.

( मल्हारी प्रवेश करतो. )

**मल्हारीः**—सकाळपर्यंत इथं अगदीं सामसूम होती. प्रत्येकजण हवालदिल बनलेला दिसत होता. जिकडं पहावं तिकडं संभाजीच्या दुष्टपणाबद्दल कांहीं तरी कुजबूज चाललेली असावयाची !—त्याच्या क्रूरपणाची पक्की दहशत बसल्यामुळं प्रत्येक इसम अगदीं बेदील झालेला ! परंतु इतक्यांत सर्व गांवांत ही इतकी गडबड कशाबद्दल सुरू झाली ? सकाळीं सर्व गांव अगदीं शांत दिसत होता. त्यांतून ही दुपारची—भर उन्हाची वेळ ! म्हणजे अगदींच शुकशुकाट असायचा. पण इतक्यांत एखाद्या यक्षिणीची कांडी फिरली कीं काय ? ही इतकी मंडळी एकजुटीनं निघाली तरी कुठं ? जो तो आपआपलीं हत्यारें घेऊन धांवपळ करीत आहे, हा आहे तरी काय प्रकार ? शिवाय हा प्रत्येक मराठागडी आतां असा आनंदित कां बरं दिसतो ? मी सकाळीं येथून गेलों, तेव्हांचा प्रकार आणि आतांचा हा प्रकार, यांत जमीन अस्मानाचा फरक दिसतो. छे !—इथं उभं राहून मला कांहीं कळायचं नाहीं. प्रथम ह्या मंडळीजवळ जाऊन चौकशी केली पाहिजे.

( तीन मराठे गडी प्रवेश करतात. )

**भवानरावः**—का शिरपतराव, तरवार अक्षी लई गंजली व्हती न्हवका ? पन म्हाराजांनीं जंजिऱ्यावर सुवारी करण्याचा घाट घातला हें लई नामी केलं बघा !

**श्रीपतरावः**—यांत काय सोशय ! घरीं बसूनशान माशा मारीत दिस काढणं मस्नी न्हाई पसंत भवानराव ! पन काय करनार इच्चिभन ! पन आतां आलीया खरा वखत ! पन भवानराव, ह्यो सवारीचं नांव निघतांच तुम्ही तर अर्धे झाल्यावानीं दिसतायासा ?

**विश्वासरावः**—अर्धे कसलं ? अर्धे मेल्यावानीं म्हनाकी ! यांचा म्होरा पगुन मस्नी असं वाटतुया, हें राव लढाया न्हाई जात तर रडाया जात्याती ! ह्यो रावांचा मुर्दाड म्होरा जर का एखाद्यानं पायला तर राव संगद ल्वोक गोरा मोरा व्हईल—हं भवानराव काढा की ती तळवार म्यानांतनं ? परजून तर घ्या ! छतरपती संभाजी महाराजांनीं जंजिऱ्यावर मोहिम करन्याचा बूट

काढलाया खरा पन भवानरावानीं शेंदाडाचा मातूर जीव जान्याचा वखुत आलाया बघा—

**भवानराव:**—का ? इसवासराव, लईसं त्वांड सोडतुयास ? माजा म्होरा मुरदाड, पन तुज्या त्वोंडाचं भगदाड भराया लई उपेगी हाय ल्योका ! काय बगा गमजा करतुया ! पन ल्योका, म्यां केलं तें तुज्या बाऱ्या हातून बी व्हनार न्हाई !

**विश्वासराव:**—ह्यो मातुर खरं ! लढायाला त्वोंड लागल्यावर कुळ्याला पाय लावूनशान या भवानरावासारखं पळून जानं माझ्या बाऱ्या हातून भी व्हनार न्हाई !

**भवानराव:**—प्वोरा ! मुसकाट फोडुनशानी टाकीन बघ ! ल्योका, कालचा बच्चा तूं आन् ल्हान न्हाई मोठं न्हाई लागलास चहाटळावानी बोलाया ? लढाईचं नांव ऐकलं कीं माज्या अंगांत लढाईचं वारं शिरतं वारं ! हैस कुठं ? ल्योका ह्या ह्योईमींत म्या त्या हबशाचं डोक्स जर न्हाई महाराजांच्या पायाप व्हाईल तर नांव बदलूनशान् देईन ! ल्योका बगतुस काय असा बायकुवानी हा भवानराव उगाच न्हाई ?

**विश्वास०**—ह्यो—ह्यो ह्यातुर अक्षी खरं ! ह्यो भवानराव उगाच न्हाईय ! ह्यो मर्द गडी भवानराव म्हंजे असं तसं न्हाईत बरं पट्टीचे सरदार हायत सरदार !—पन ह्यो सरदार कसं म्हनून न्हाई इचारलं तुम्ही शिरपतराव ? अशी बायकूच्या नथीतनं तीर मारनार लई हाईत वाकबदार !

**श्रीपत०**—जाऊं द्या की राव. पन ही बघा माझी तरवार ! कशी अक्षी बिजलीवानी चमकतीया ! आतां दरबारातनं ह्माराजांचा हुकूम याया खोटी की हानतोच बगा हबशाला !

**भवान०**—राहूं द्या राव त्या गफ्फा ! ह्यो पठ्ठा हाय आघाडीचा ! हबशाला हाननार त्यो ह्योच पठ्ठा हाननार !

**मल्हारी:**—( पुढें होऊन ) कायहो ! ही गावांत आज कसली गडबड चालली आहे ?

**भवान०**—अहो राव ! इचारतां काय नवख्यावानी ! आतां जंजिऱ्यावर मोहीम निघनार आन तुह्मी काय बाइकुवानी इचारतां ? बघता काय राव ? जा की धारवाल्याकडं !—चला शिरपतराव, इसवासराव चला राव—ह्ये राव हाईत नवखे !

**मल्हारीः**—मोहिम निघणार पण ह्या मोहिमेवर जाणार कोण ?

**भवान॰**—कोन ह्मंजे ? वाः राव तुमी इचारणार ? अहो—जानार कोन ह्मंजे महाराज—छतरपती संभाजी महाराज जानार नी काय ? चला चला राव तुमी. हे राव हैती नवखं ! ( जातात. )

**मल्हारीः**—( क्षणभरानं विचार करीत. ) हा काय बरं चमत्कार ! आपापल्या व्यवसायांत गुंग होऊन शस्त्रास्त्रांना किंचित्काल विसरणाऱ्या या मराठेगड्यांच्या अंगांत ही चेतना एकाएकीं कशी उत्पन्न झाली ? आपला आपल्या कुटुंबाचा काडीचाहि फायदा नसतां या लढाईच्या—या काळाच्या जबड्यांत उडी टाकण्यास या मराठेगड्यांना स्फुरण कां चढावं ? आपल्या बायका—पोरांची ताटातूट करण्यास मायेचें बंधन ताडकन् तोडण्यास यांचीं मनं एकाएकीं कां तयार व्हावीं ?—या सर्वांचं कारण ?—कारण—कारण—संभाजीचा लढाईचा बेत ! पण संभाजी यांचा कोण ? आणि संभाजीचे हे कोण ? जंजिऱ्याचा सिद्दी यांचा शत्रू कसा ? आणि हे शिद्यांचे शत्रू कसे ? वास्तविक प्रत्यक्ष हिताहिताचा कांहींच संबंध नाहीं मग हा हिताहिताचा संबंध आला कोठून ? लढाईच्या या भावी मानवी संहारांत व्यक्तीचा स्वार्थ तर काडीइतकाहि दिसत नाहीं. मग यांत अर्थ तरी साधणार कोणाचा ? संभाजीचा ?—छे ! जंजिऱ्याचा सिद्दी मराठी साम्राज्याचा शत्रू आहे. संभाजीचा नाहीं. त्या शत्रूचा नाश करून मराठी साम्राज्य निर्वैर झाल्यानं त्यांत समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा त्यांत स्वार्थ साधणार आहे. सर्व जनतेचा फायदा होणार आहे आणि या जनतेच्या सुखाची—शांततेची जबाबदारी संभाजीनं त्यांचा राजा—त्यांचा अधिपति—त्यांचा लोकनायक या नात्यानं आपल्या शिरावर घेतली आहे. आणि म्हणूनच हे मराठे वीर त्याच्या शब्दाबरोबर जीव द्यायला तयार झाले आहेत. पण माझं आणि संभाजीचं हाडवैर ना ? पण संभाजी या व्यक्तीनं हा वैरभाव माजविलेला आहे. मराठी राज्यानं नव्हे, किंवा आमच्या राजानं नव्हे. आणि हे मराठे वीर राज्याकरितांच मरणाकरितां तयार झालेले आहेत. कारण—? कारण—राजनिष्ठा ! ! ! अहाहा ! तारे ! आतां तुझा युक्तिवाद मला पटला. माझ्या अंतःकरणांत आतां लख्ख उजेड पडला. शाबास—तारे शाबास ! आतां माझे स्वकर्तव्याविषयीं चांगलेच डोळे उघडले. ( जातो. )

## प्रवेश तिसरा

**स्थळ**—दरबार.

स्तुतिपाठकः—

**साहितनै सरजाकी कीरति सोंचाऱ्यों ओर चांदनी वितान छिति छोर छाईयतु है ॥ भूषण भतन ऐसो भूपति भौंसिलाको है जाके द्वार भिछुक सदाई भाइयतु है ॥ रजतुकी हौस कीए हेम पाईयतु जासो हायनिकी होस किये हांथी पाईयतु है ॥ १ ॥**

( स्तुतिपाठ होत असतां दरबारांतील मंडळी उभी रहाते. संभाजी प्रवेश करितो. )

**स्तुतिपाठकः—**

**पैज प्रतिपाल भूमिभारको हमाल चहूं चक्को अमाल भयो दंडत जहानको। साहिनको साल भयो ज्वारको जवाल भयो हरको कृपाल भयो हारको निधानको। वीररसख्याल श्रीसंभाजी भुवपाल तुव हाँतको विसाल भयो भूषण वरवानको। तैरा करवाल भयो दक्षिणको ढाल भयो हिंदको दिवाल अयो काल तुरकानको ॥ १ ॥**

( दरबारांतील मंडळी एक एकजण संभाजीला मुजरा करितात. नंतर एक सेवक नजराण्याचें ताट घेऊन येतो. मागून वृद्ध रघुनाथपंत हणमंते प्रवेश करितात. )

**संभाजीः**—माझे अष्टप्रधान आणि रणशूरहो ! आजच्या ह्या दरबारांत आपले कर्नाटक प्रांतचे कर्ते पुरुष आणि कैलासवासी आबासाहेबांच्या पूर्ण मर्जीतील रघुनाथपंत हणमंते यांचं मी मोठ्या प्रेमानं स्वागत करितों. (हणमंते मुजरा करतो. त्याला संभाजी उजव्या बाजूला बसवितो. ) आबासाहेबांच्या मागं स्वराज्यहितासाठीं तत्पर असणारे जे वयोवृद्ध मुत्सद्दी आहेत, त्यांतच रघुनाथपंतांची गणना आहे. आज इतक्या लांबून येथें येऊन त्यांनीं गादी-वरील आपलं प्रेम व्यक्त केलं त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

**हणमंतेः**—हिंदुपदबादशाहीचा मी एकनिष्ठ सेवक आहें. आपल्या कैलासवासी पूज्य महाराजांची ह्या दासावर पूर्ण मर्जी होती. कै. महाराजांचीं पुष्कळ जबाबदारीचीं कामं ह्या सेवकानं केलीं आहेत. कै. महाराजांनीं प्रत्येक

बिकट कामांत माझी सल्लामसलत घेतली आहे. तेव्हां त्यांच्या मागं महाराज आपणांला दोन हितोपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा मलाहि अधिकार आहे.

**संभाजी**:—गादीविषयीं आपल्या मनांत वसत असलेली ही कळकळ पाहून मला आपला फार अभिमान वाटत आहे.

**हणमंते**:—थोरले महाराज कैलासवासी होऊन इतका थोडा अवधि लोटला नाहीं तोंच येथील राज्यव्यवस्थेंत जो फरक पडला—मंत्रिमंडळांत जी ही ढवळाढवळ झाली आणि प्रजेंत जो असंतोष उत्पन्न झाला आहे, तो हा सर्व प्रकार पाहून मला फार फार वाईट वाटत आहे. प्रजा बेदील कां झाली, याचं कारण पाहूं गेलों तर निरनिराळ्या गोष्टी कानीं येतात. राज्यांतील सरदार मुत्सद्दी लोक अन्यायी आहेत असं वाटत होतं, तर मनाची खात्री होईपर्यंत त्यांस बेड्या ठोकून किल्ल्यावर नेऊन ठेवावयाचं होतं; परंतु त्यांचा शिरच्छेद करण्यांत व्यर्थ कर्ते पुरुष मात्र मारले गेले. महाराज! असा अन्याय पूर्वीं कधीं झाला नाहीं. थोरल्या महाराजांची राजनीति कशी होती ? त्या महाप्रतापी व पुण्यशील पुरुषानं भरतखंडांत अपूर्व असं स्वराष्ट्राचं स्वतंत्र राज्य स्थापन करून आपली कीर्ति पृथ्वीवर अजरामर करून ठेविली; परंतु तसं होण्यास महाराजांना किती कष्ट—किती विपत्ति—किती संकटें भोगावीं लागलीं, त्यांपैकीं कांहींचा प्रत्यक्ष अनुभव महाराजांना मिळाला आहे; मग आज हा असा प्रकार कां ? शौर्य, धैर्य, पराक्रम, कर्तृत्वशक्ति हे अलौकिक गुण थोरल्या महाराजांप्रमाणं महाराजांच्याहि अंगीं आहेत. ह्या थोर गुणांचा महाराजांनीं योग्य काळीं योग्य ठिकाणीं उपयोग करावा आणि कैलासवासी महाराजांप्रमाणं आपली कीर्तिहि अजरामर करून ठेवावी इतकंच माझं सांगणं आहे.

**संभाजी**:—गादीच्या खऱ्या राजनिष्ठ सेवकाचे हे शब्द आबासाहेबांच्या शब्दाइतकेच मला मौल्यवान् वाटतात. शिवाय आजच्या दरबारांत नव्या मोहिमीचा विचार करावयाचा आहे. अशा वेळीं रघुनाथपंतांसारख्या अनुभवी मुत्सद्दी योद्ध्यांची सल्ला फार उपयोगीं पडेल अशी मला खात्री आहे. त्या दिल्लीपति नीच बादशहाच्या चिथावणीवरून जंजिऱ्याचा सिद्दीकासम आपल्या कोंकण प्रांताला फार उपद्रव करूं लागला आहे. आपल्या आरमाराचे सरदार दौलतखान नागोठाण्यास लढाईची तयारी करून येथील हुकुमाची वाट पहात आहेत. परंतु माझ्या मतानं सिद्दीचा भेद काढण्याची प्रथम व्यवस्था झाली पाहिजे.

**हणमंते**:—महाराजांचा हा विचार फार दूरदर्शीपणाचा आहे. थोरले महाराज देखील असंच करीत असत. प्रथम शत्रूचा भेद काढून सैन्यबळ अजमावीत आणि मग पुढील विचार ठरवीत.

**खंडोजी फर्जंद**:—( पुढें होऊन मुजरा करतो. ) महाराजांनीं ही कामगिरी ह्या दासाकडे सोंपवावी. सिद्दीचा भेद काढून आणण्यास हा सेवक तयार आहे. मी ह्या गादीच्या पुण्याईनं सिद्दीच्या लोकांत फितुरी करून येतों.

**संभाजी**:—खंडोजी, तूंच ह्या कामाला योग्य आहेस. ह्या कामावर मी तुझीच नेमणूक करितों.

**दादजी**:—( पुढें होऊन मुजरा करतो. ) तसंच महाराज, ह्या दासाला आरमारावर पाठविण्याचं करावं. हा सेवक ह्या पवित्र गादीच्या आशीर्वादानें शिद्दीची खोड मोडण्यास समर्थ आहे.

**संभाजी**:—ठीक आहे. दादजी, मी तुम्हांकडे आमच्या आरमाराचं आधिपत्य दिलं आहे. तुम्ही प्रतिज्ञेप्रमाणं ही गादीची सेवा करा—त्याचा पुढें योग्य विचार केला जाईल. जा, उदयीक निघण्याची तयारी करा. मंत्री, दादजी आणि खंडोजी यांची जाण्याची व्यवस्था करा.

**मंत्री**:—आज्ञा सरकार.

**संभाजी**:—रघुनाथपंत, आजच्या दरबारांत दुसरी एक महत्त्वाची गोष्ट घडवून आणण्याचा माझा विचार आहे. आमच्या बहाल मर्जीतले आणि गादीच्या पूर्ण भरंवशाचे कविजी यांस मी अष्टप्रधानांत ‘ पंडितराव ’ हें पद देण्याचा विचार केला आहे. कविजीचा आणि माझा परिचय किती जुना आहे हें आपणां सर्वांस माहीत आहेच. आबासाहेबांच्या बरोबर आम्ही त्या विश्वासघातकी औरंगजेबाच्या हातून निसटल्यावर दिल्लीहून परत स्वदेशीं येत असतां आमचा मथुरेस मुक्काम झाला. त्या वेळेपासून मी कविजींना ओळखीत आहें. त्यांचा आमच्यावर विशेष लोभ असून थोड्या दिवसांत त्यांनीं गादीची पुष्कळ सेवा केली आहे. तशीच ते पुढं करतील अशी आशा आहे. मंत्री ! पंडितरावांचा पोषाख आणि आमच्या सहीशिक्क्याकरितां त्यांची सनद घेऊन या.

**कलुषा**:—महाराजांनीं मला आज अष्टप्रधानांत घेऊन माझा जो बहुमान केला त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. ( मुजरा करतो. )

**सेवकः**—( प्रवेश करून मुजरा करतो. ) परळीहून श्रीसमर्थ रामदासस्वामींकडून एक शिष्य आला आहे व महाराजांच्या भेटीची इच्छा दर्शवितो.

**संभाजीः**—जा—त्याला आंत घेऊन ये. ( सेवक जातो. समर्थशिष्य प्रवेश करतो. )

**स्वामिशिष्यः**—आमच्या पूज्य स्वामींनीं राजाचं क्षेम इच्छून ही आशीर्वादजनक पत्रिका पाठविली आहे. ( आपल्या काखेंतील मृगचर्म सिंहासनासमोर आंथरून त्यावर पत्रिका ठेवतो. )

**संभाजीः**—मंत्री ! स्वामींकडून काय लिहून आलं आहे तें वाचा.

**मंत्रीः**—( पत्र उचलून मस्तकीं धारण करून वाचूं लागतो. )

' संभाजीराजे ! तुम्ही सिंहासनाधीश्वर जहालां. आतां राज्यनीतिशास्त्रसंमतें कृता-त्रेता-द्वापारीं जे जे धर्मपरायण पुण्यश्लोक सोमसूर्यवंशींचे राजे वर्तत आले, त्याप्रमाणें राज्याधिकार या कलियुगीं करणें. अनाचरण वर्तलियानें वंशक्षयासी कारण. बहुत सावधपणें राहून दिगंतीं अपार कीर्तिपदास प्राप्त होणें. राजनीतिस अंतराय केलीया राज्यभ्रष्टता प्राप्त होऊन येईल. सिंहासन म्हणजे सामान्य नव्हे. श्रीईश्वराचें आसन. जो ईश्वरी पुरुष असेल तोच आरूढेल. इतरांस अलभ्य वस्तु. प्राप्त होणेंच नाहीं. समर्थ राजनीतीस अंतर न करणें. आज समर्थ बोध पाठविला असे, याप्रमाणें वर्तणूक करून राज्यभार पृथ्वींत चालवावा. '

**अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ॥**
**तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं ॥ १ ॥**
**कांहीं उग्र स्थिति सोडावी । कांहीं सौम्यता धरावी ॥**
**चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ॥ २ ॥**
**मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ॥**
**सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥**
**पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ॥**
**तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥**
**जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला ॥**
**जन ठाईं ठाईं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥**
**श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ॥**
**मग जाणावें फावलें । गनिमासीं ॥ ६ ॥**

ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जये ॥
धीर धरूनी महत्कार्ये । समजुनी करावें ॥ ७ ॥

आधींच पडती धास्ती । म्हणजे कार्यभाग होय नास्ती ॥
या कारणें समस्तीं । बुद्धी शोधावी ॥ ८ ॥

राजी राखितां जग । मग कार्यभागाची लगबग ॥
ऐसे जाणोनी सांग । समाधान करावें ॥ ९ ॥

सकळ लोक एक करावे । गनिम निवटून काढावे ।
येणें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥ १० ॥

आधी गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळ धाके ॥
ऐसें न होतां धके । राज्यास होती ॥ ११ ॥

समय प्रसंग ओळखावा । राग निपटून सांडावा ॥
आला तरी कळों न द्यावा । जनामध्यें ॥ १२ ॥

राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊनी करावे साक ॥
लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंचि नये ॥ १३ ॥

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें ॥
महाराष्ट्र राज्यचि करावें । जिकडे तिकडे ॥ १४ ॥
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ॥
चढती वाढती पदवी । पावाल तेणें ॥ १५ ॥
शिवरायास आठवावें । जिवीत तृणवत् मानावें ॥
( हळु हळू संभाजी उठून उभा राहतो व गंभीर मुद्रेनें सिंहासनाकडे पहातो. )
इहलोकीं परलोकीं रहावें । कीर्तिरूपें ॥ १६ ॥
शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ॥
( ट्रान्सफर सीन. श्रीशिवाजी महाराजांची प्रतिमा दिसू लागते. )
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळीं ॥ १७ ॥
शिवरायाचें कैसें बोलणें । शिवरायाचें कैसें चालणें ॥
शिवरायाची सलगी देणें । कैसें असे ॥ १८ ॥
( संभाजी सिंहासनाला वंदन करतो. )
सकळ सुखाचा त्याग । करोनि साधिजे तो योग ॥
राज्यसाधण्याची लगबग । कैसी केली ॥ १९ ॥

**त्याहून करावें विशेष । तरिच म्हणावें पुरुष ॥**
**याउपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ २० ॥**

( पत्र वाचून झाल्यावर गंभीरपणानें पुनः सिंहासनाला वंदन करून संभाजी जातो. )

**हणमंते**:—( स्वगत ) योग्य वेळीं ही समर्थपत्रिका आली. मी ज्या कार्याकरितां कर्नाटकांतून मुद्दाम येथें आलों, त्या कार्याची पूर्तता ही पत्रिका खात्रीनं करील. परमेश्वर महाराजांना सद्बुद्धि देवो !

**कलुषाः**—( स्वगत ) मोठा घोंटाळा झाला ! ह्या पत्रानं महाराजांच्या मनावर परिणाम झालेला दिसतो—इतके अविश्रांत श्रम करून जाळ्यांत पकडलेली शिकार निसटूं पहात आहे. परंतु असं होतां उपयोगी नाहीं. कांहीं तरी बिनतोड युक्ति काढलीच पाहिजे.

**हुजऱ्याः**—( प्रवेश करून ) कविराज, महाराजांनीं दरबार बरखास्त करून स्वामींच्या शिष्याची व्यवस्था करण्याचा हुकूम दिला आहे.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश चौथा

**स्थळः**—जगदेवरावाच्या घराची देवडी.

**मल्हारीः**—सकाळीं याच ठिकाणाहून जातांना माझ्या मनाची स्थिति कशी होती, आणि आतां कशी आहे ? सकाळीं मी ‘ राजद्रोही ’ होतों, आतां मी ‘ राजनिष्ठ ’ आहें. सकाळपर्यंत मला माझ्या स्वतःच्या मनाची ओळख करतां आली नव्हती, ती ओळख मला आतां पूर्णपणें पटली !—खरखीत विस्तवावर स्वतःचा देह पसरून स्वामीला आपल्या पाठीची पायवाट करून देणारे थोरल्या महाराजांच्या वेळचे नखशिखांत स्वामिभक्त कुणीकडे आणि मी कुणीकडे ? अहाहा ! स्वर्गाचं द्वार जर कुणाला खुलं असेल तर तें राज-निष्ठानांच !—राजनिष्ठा हेंच आम्हां मराठ्यांचं जीवन. आतां हे माझे बदललेले विचार ऐकून माझ्या तारेला कितीतरी आनंद होईल. तिला माझा कितीतरी अभिमान वाटेल—परंतु मी अगदीं तारेच्या घराजवळ येतांच मला असं चमत्कारिक कां बरं वाटूं लागलं ? तिला भेटण्याकरितां मी इतक्या उल्हासानं

परत आलों, परंतु इतक्यांत माझे पाय असे जड कां झाले ?—पण मी येथें कां आलों ? माझ्या तारेची क्षमा मागून माझं खरं मन तिच्यापुढं उघडं करण्याकरितां ना ? मग मी असा गोंधळलों कां ? छे—मला तारेची क्षमा मागितलीच पाहिजे. ( पुढें होऊन दरवाजा वाजवितो ) तारे ! तारे ! (आंतून 'कोण आहे ?' असा आवाज होतो. ) मी मल्हारी. ( तारा दरवाजा उघडून बाहेर येते. ) तारे ! मी परत आलों आहें.

**तारा**:—आपण आलांत परंतु घरांत कोणी नाहीं. मानाजीला घेऊन शिलेदार बाहेर गेले आहेत.

**मल्हारी**:—( बराच वेळ थांबून ) तारे ! मी आलों आहें तो—

**तारा**:—तें मला कळतं ! आपण आलां आहांत—माझ्या पुढं उभे आहांत इतकं मला कळतं. माझं डोकं ठिकाणावर आहे. परंतु घरांत कोणी नाहीं म्हणून सांगितलं ना ? शिलेदार आल्यावर आपण या. ( जाऊं लागते. )

**मल्हारी**:—तारे, थांब—मी काय बोलतों तें ऐकून घे.

**तारा**:—सकाळीं पुष्कळ ऐकून घेतलं. आतां जास्त ऐकून घेण्याची मला इच्छा नाहीं.

**मल्हारी**:—तारे, सकाळीं मी जें बोललों त्याबद्दल मला पश्चात्ताप होतो आहे. स्वामिभक्ति हेंच मराठ्यांचं जीवन अशी आतां माझी पक्की खात्री झाली. तूं म्हणतेस तेंच खरं !—राजनिष्ठ सेवकानं राजाच्या आचाराविचारांचा विचार करणं पातक आहे, हें मला आज कळलं. राजा स्वतःच्या बऱ्यावाईट कृत्यांचा स्वतःच जबाबदार असतो, हें आतां चांगल्या प्रकारें माझ्या लक्षांत आलं. निरपेक्ष बुद्धीनं स्वामिसेवा करणं हेंच आम्हा मराठ्यांचें कर्तव्य आहे याची मला आतां चांगली जाणीव झाली. तारे ! सकाळीं माझ्याकडून अक्षम्य चुकी झाली, हें मी कबूल करतों.

**तारा**:—( शांतपणानें ) ही चुकी तुमच्या लवकर लक्षांत आली म्हणून मला आनंद वाटतो. आतां यापुढं ही चुकी सुधारण्याचा प्रयत्न करा म्हणजे झालं !

**मल्हारी**:—तो प्रयत्न तर आतां मी करणारच ! पण तारे. तूं मला आज एकाद्या परक्या मनुष्याप्रमाणं कां वागवितेस ? तारे, सकाळच्या वर्तनाबद्दल मी तुझ्याजवळ क्षमा मागत आहें.

**तारा**:—मजजवळ क्षमा मागून आपणांस अधिक तें काय मिळणार आहे ? चुकी झाली, ती लक्षांत आली; आतां ती सुधारण्याचा प्रयत्न करा म्हणजे झालं !

**मल्हारी:**—तारे ! माझ्यावर असलेल्या तुझ्या प्रेमाचा इतक्या लवकर कसा अस्त झाला ? ह्या मल्हारीचा तुला इतक्यांत कंटाळा आला काय ? तारे ! माझ्या येण्याची तूं चातकीसारखी मार्गप्रतीक्षा करीत असस; माझ्या येण्यानं तुला अलोट आनंद होत असे, माझं वेळोवेळीं निरनिराळ्या रीतीनं स्वागत करण्यांत तुझ्या निस्सीम व गाड प्रेमाचं प्रदर्शन होत असे, ती तुझ्या मनाची स्वाभाविक उत्सुकता, तो तुझा अलोट आनंद. तें तुझं गाढ प्रेम आज सर्वच लयास गेलं काय ? तारे ! माझा तुला इतका वीट आला काय ? हा मल्हारी तुला इतका तुच्छ वाटतो काय ?

**तारा:**—आपणांस मी तुच्छ मानीत नाहीं. आपणावरील माझं प्रेम काडीइतकं देखील कमी झालं नाहीं आणि ह्या पुढं होणार नाहीं. इतकंच नव्हे तर आपणा व्यतिरिक्त अन्य पुरुषाला ह्या तारेच्या नखाचं सुद्धां दर्शन होणार नाहीं, याचीहि खात्री ठेवा. प–ण—

**मल्हारी:**—( उत्सुकतेनें ) पण ?—तारे, पण काय ? सांग—सांग—

**तारा:**—पण आपलें मन घाणेरड्या अपवित्र अधोगतीला नेणाऱ्या स्वामिद्रोही—राजद्रोही विचारांनीं कलंकित झालं आहे. आपलं मन महाराजांच्या अन्नाला विसरलं आहे;—आपल्या मनाला स्वतःच्या शिलाचा भ्रम झाला आहे; याचा काय विचार ?—मल्हारराव, हा देह अग्निब्राह्मणांसमक्ष जरी तुम्हाला अजून वाहिला नाहीं. तरी मनानं मी तो कधींच आपल्या चरणीं वाहिला आहे. मी आपली आहें, तथापि मी स्वामिभक्त बाजी सरनाइकांची मुलगी आहें. केवळ प्रेमाकरितां कर्तव्यपराङ्मुख झालेल्या पतीला पति म्हणण्याइतकी ही तारा स्वाभिमानशून्य नाहीं हेंही आपण पूर्णपणें लक्षांत ठेवा.

**मल्हारी:**—पण मला आतां पश्चात्ताप झाला आहेना ?

**तारा:**—केवळ पश्चात्ताप होऊन काय उपयोग ! प्रायश्चित्ताशिवाय पश्चात्तापाचं महत्त्व नाहीं. म्हणून प्रायश्चित्त घेऊन मन शुद्ध करून या म्हणजे ही सरनाइकांची तारा आपली—सर्वस्वी आपलीच आहे. आणि जोंपर्यंत आपलं मन प्रायश्चित्तानं शुद्ध झालं नाहीं, तोंपर्यंत आपण ह्यापुढें इकडे येण्याचं धाडसहि करूं नये. ही तारा या उपर आपल्या दृष्टीसहि पडणार नाहीं.

**मल्हारी:**—मग सांग—तारे, हे माझ्या आराध्यदेवते ! सांग—मी हें माझं कलंकित मन शुद्ध करून घेण्याकरितां कोणतं प्रायश्चित घेऊं ? सांग— तूं सांगशील तें अघोर प्रायश्चित्त घेऊन मन शुद्ध केल्याशिवाय हा मल्हारी

तुझ्या दर्शनाला येणार नाहीं, हीच माझी प्रतिज्ञा ! सांग—प्रायश्चित्ताचं नांव सांग ?

**तारा**:—आतां तुमच्या अंगांतील शिर्क्यांचं रक्त उसळूं लागलं आहे असं दिसतं. मल्हारराव ! ही तारा—नेकजात मरठ्याची स्वामिभक्त बाजी सरनाइकाची मुलगी तारा—आपणास पाहिजे असेल तर ज्या आमच्या पूज्य स्वामींची—छत्रपति संभाजी महाराजांची तुम्ही इतकी निंदा केलीत त्याच प्रभूची एकनिष्ठपणें सेवा करून—त्यांना प्रसन्न करून त्यांचा प्रसाद घेऊन या.

**मल्हारीः**—ठीक आहे. तारे—छे ! हे माझ्या सन्मार्गदर्शक देवते ! हा अन्यायी मल्हारी तुला प्रणाम करतो. ( प्रणाम करतो ) आजपासून जंजिऱ्याची मोहीम सुरू झाली आहे. आणि त्याबरोबरच माझ्या प्रायश्चित्ताला सुरवात झाली असं समज. तूं सांगितल्याप्रमाणं स्वामी प्रसन्न करून घेऊन त्यांचा प्रसाद घेऊन येईन आणि तुझं दर्शन घेईन. नाहीं तर देहशुद्धि करीत धारा-तीर्थीं देहार्पण तरी करीन ! ( तिच्याकडे पहात क्षणभरानें ) तारे ! तुझी खरी खरी योग्यता आज माझ्या लक्षांत आली. तुझ्या सत्यनिष्ठ स्वामिभक्तीनं आणि बाणेदारपणामुळं तुझ्या प्रेमाचं उज्ज्वल रूप आज मला पहावयास मिळालं. मला पश्चात्ताप झाला आहे, हें पाहून तूं मोठ्या प्रेमानं माझा आदरसत्कार करशील असं मला वाटलं होतं. परंतु छे ! माझ्या शाब्दिक पश्चात्तापाला न भाळतां फक्त माझ्या कर्तव्यजागृतीबद्दल आनंद व्यक्त करून माझ्या पापी मनाला प्रायश्चित्त सांगतांना तूं आपल्या उज्ज्वल प्रेमाची, मराठ्यांच्या नेकजातपणाची आणि बाणेदार सरनाइकांच्या निस्सीम स्वामिभक्तिची मला खरी ओळख पटविलीस ! धन्य आहे तुझी ! तारे तूं माझी खरी मार्गदर्शक देवताच आहेस. तुझ्यासारख्या कुलाभिमानी ललना माझ्यासारख्या कर्तव्यच्युत माणसांना मार्गदर्शक आहेत, म्हणूनच आमचा हा आर्यदेश कर्तव्याच्या दृष्टीनं सर्व जगाला आदर्शवत् आहे. तुम्ही आर्य स्त्रियाच आमच्या देशाचें भूषण होत !—तारे, माझी प्रतिज्ञा तूं ऐकलीच आहेस. त्या प्रतिज्ञेची माझ्या हातून पूर्तता होण्याकरितां मला आशीर्वाद दे. मी आतां स्वामिकार्या-करितां जातों.

**ताराः**—जा. माता भवानी आपले मनोरथ पूर्ण करील. ( जाते. )

[ मल्हारी जाऊं लागतो तोंच पुरुषवेषांत राजकुंवर प्रवेश करते. ]

**राजकुंवरः**—रामराम मित्रा ! रामराम.—कुणीकडं निघाला आहेस ?

**मल्हारी:**— ( साशंक ) तुम्ही कोण आहांत ? तुमची माझी ओळख नसतां किंवा ह्यापूर्वी कधींहि भेट झाली नसतां—

**राजकुंवर:**—मी रामराम केला म्हणून तुला आश्चर्य वाटलं काय ? पण मित्रा, राज्यहिताकरितां तळमळणाऱ्या राजनिष्ठ जिवांना परस्परांबरोबर ओळख करून देणारा ' रामराम ' हा श्रीसमर्थ रामदास स्वामींचा 'परवल' आहे.— क्षणापूर्वी तुमचं झालेलं सर्व भाषण मी आडून ऐकलं. तुझं मन राजनिष्ठे-करितां तळमळत आहे हें पाहूनच तुला स्वामींचा ' रामराम ' हा मी परवल सांगितला. आतां तूं आणि मी मित्र झालों. [ हातांत हात धरून त्याच्या खांद्यावर हात ठेवते ] थोड्या वेळापूर्वी सरनाइकांच्या बाणेदार मुलीनं— तुझ्या भावी पत्नीनं उच्चारलेला प्रत्येक शब्द माझ्या कानांत दुमदुमत असून माझ्या रोमरोमांच्यांत स्वामिभक्तीचं स्फुरण आणीत आहे. तूं प्रतिज्ञा करून प्रायश्चित्त घेण्याकरितां निघालास खरा, पण मित्रा ! मनशुद्धिकरितां प्रायश्चित्ता-साठीं पुढील दिशा आंखल्याशिवाय असा अविचारानं भलत्याच संकटांत उडी घालूं नकोस, असं माझं सागणं आहे; म्हणून तूं कुठें जातोस हें मी विचारलं.

**मल्हारी:**—आपल्या प्रभूला प्रसन्न करून घेण्यासाठीं मी निघालों आहें.

**राजकुंवर:**—होय—तें मी समजलों, परंतु प्रभु प्रसन्न करून घेण्यास कोणत्या मार्गानं जातोस हें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

**मल्हारी:**—आतां सुरू झालेल्या जंजिऱ्याच्या मोहिमींत जाऊन प्रतिज्ञा पूर्ति करावयाची अगर देहशुद्धि करीत देहार्पण तरी करावयाचं !

**राजकुंवर:**—मित्रा, असा अविचार करूं नकोस. तुझ्यासारख्या कर्तव्य-जागृति झालेल्या तरुणांची त्या मोहिमेपेक्षां इथं फार जरूरी आहे. आपल्या प्रभूला दंश करण्याकरितां बरेच काळसर्प इथं आहेत. करितां मित्रा ! प्रतिज्ञा-पूर्तीसाठीं इतक्या लांब मोहिमेवर न जातां तुला इथंच राहून आपल्या प्रभूला प्रसन्न करून घेतां येईल.

**मल्हारी:**—परंतु कोणत्या मार्गानं ?

**राजकुंवर:**—चल, मजबरोबर चल. मी तुला तो मार्ग दाखवितों.

( जातात. )

---

## प्रवेश पांचवा

**स्थळः**—कलुषाचा महाल.

( कलुषा आणि दादजी प्रवेश करतात. )

**कलुषाः**—सकाळीं दरबारांत मोठा आणीबाणीचा प्रसंग आला होता. तो बुड्ढा कर्नाटकचा हणमंत्या मध्येंच बिब्बा फांसण्याच्या बेतांत होता. तेव्हां महाराज किंचित् रागवल्यासारखे दिसत होते खरे पण त्या म्हाताऱ्याची भीड त्यांना तोडवली नाहीं. तसंच तें रामदास गोसाव्याचं पत्र. ह्या गोसावड्याला ह्या उठाठेवी सांगितल्या कोणी ?

**दादजीः**—पण त्या पत्राचा महाराजांच्या मनावर परिणाम झालेला दिसतो.

**कलुषाः**—म्हणूनच तर मी हा मजलशीचा योग जुळून आणला. महाराजांनीं माझी अष्टप्रधानांत नेमणूक केली, त्या प्रीत्यर्थ पानसुपारीच्या निमित्तानं मी महाराजांना आतां आमंत्रण दिलं आहे. आतां ते आल्यावर मी असा बेत जुळवून ठेवला आहे कीं, त्या गोसावड्यांच्या पत्रांतील सर्व गोष्टी महाराज साफ विसरून जातील. ती तुळशी महाराजाकरितां झुरणीस लागली आहे अशी मला पूर्वीं बातमी लागली होती. तिला मी आज येथें बोलावून आणली आहे. महाराजांच्या प्राप्तीकरितां मी सांगेन तें करण्यास ती तयार आहे. आतां हळु-हळू माझ्या मनाप्रमाणं सर्व गोष्टी जुळून येतील असं मला वाटतं. पंत आणि सरनाईक यांच्या गुप्त भेटीचा फायदा घेऊन त्या दोघांचाहि मला कांटा मोडतां आला. एकाला तर रसातळाला पोंचवला आणि दुसऱ्याला कारागृहांत टाकविला. आतां मी बराच मोकळा झालों असं मला वाटतं.

**दादजीः**—नाहीं. असं म्हणूं नका कविराज ! आज महाराज जरी तुमच्या कलाप्रमाणं वागतात तरी तुम्ही स्वतःच्या मनाप्रमाणं कारभार पहाण्यास अद्यापि मुखत्यार झालां नाहीं. आतां दरबारांत जुन्यांपैकीं दोन माणसं राहिलीं. हंबिरराव सेनापति एक. पण तो सिध्या मार्गाचा शिपाई गडी ! त्याच्या अंगीं मुत्सद्दी डावपेंच नाहींत. आणि दुसरा बाळाजी आवजी. हा चिटणीस तुम्हाला फार साधा मनुष्य दिसतो पण त्याच्या साधेपणावर जाऊं नका. तो पंतांच्या इतकाच मोठा कांटा आहे.

**कलुषाः**—दादजी, तूं जेव्हां तेव्हां ह्या बाळाजीची मला भीति घालतोस ती कशाकरितां ? त्याच्या चिटणिशीकरितां ना ?—समजलों. अरे, ह्या सर्व

गोष्टी मला प्रसंग पाहूनच साधून घेतल्या पाहिजेत. पण आतां तूं जा. उद्यां तुला जंजिऱ्याच्या मोहिमेवर जावयाचं आहे, तेव्हां तयारी करावयाची असेल. जा. तुझी ही चिटणीसी मजकडे लागली. जा—

**दादजीः**—पंडितराव, एवढी आठवण असली म्हणजे झालं—बरं मी जातों. ( मुजरा करून जातो. )

**कलुषाः**—दादजी म्हणतो ती गोष्ट खरी आहे. अष्ट प्रधानांत आज माझा प्रवेश झाला तरी माझ्या हातांत मुखत्यारी कुठं आहे ? महाराज माझ्या तंत्रानं वागतात खरे, परंतु हातांत मुखत्यारी नसल्यामुळं ज्या उद्देशानं मी स्वतःचा देश सोडून इतक्या लांब इकडं आलों तो सफल व्हावा कसा ? बादशहाच्या म्हणण्याप्रमाणं जर,—पण तो विचारच नको. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून स्वतःला शह लावून घेण्याइतका मी मूर्ख नाहीं. आपलें काम साध्य होतांच तो संभाजी बरोबर मलाहि तोफेच्या तोंडी द्यायचा ! काय नियम या दुष्ट बादशहाचा ! मध्यंतरी त्या शहाजाद्या अकबराची मला मोठी आशा होती. परंतु त्या पळून आलेल्या पोराकडून मला काय अर्थप्राप्ति होणार ? छे— आपलं चाललं आहे हेंच ठीक आहे.—आज मला काय कमी आहे ? मथुरेंत उपाध्येगिरी करणारा हा कबजी आज अष्टप्रधानांत पंडितराव झाला. तेथें खोपटांत राहून यात्रेकऱ्याकडं पैसा दोन पैशांकरितां याचना करणारा हा पंड्या आज राजमहालांत गाद्या गिरद्यांच्या ऐषआरमांत लोळत आहे. याला म्हणावं डोकं ! पण हा सर्व चंडी मातेच्या कृपेचा खेळ आहे.

( तुळशी प्रवेश करिते. )

**तुळशीः**—कसला एवढा विचार चालला आहे पंडितराव ?

**कलुषाः**—आतां महाराज येण्याची वेळ होत आली. तेव्हां आपण योजलेला कार्यक्रम उत्तम रितीनं कसा पार पडेल याचा विचार करीत होतों.

**तुळशीः**—त्याविषयीं पंडितराव, तुम्ही अगदीं निष्काळजी रहा. आज इतके दिवस ज्या राजसाच्या प्राप्तीकरितां मी रात्रंदिवस तळमळत होतें, तो माझ्या सर्व सौख्याचा निधि आज माझ्या हातीं येणार ना ? मग आजचा कार्यक्रम माझ्याकडून अगदीं मनाप्रमाणं नाहीं का पार पडणार ? ( मुरका मारते. )

**कलुषाः**—अस्सं—अगदीं असं शरसंधान झालं पाहिजे ! कीं, संभाजीनं येसूबाईचं नांव सुद्धां घेतां उपयोगी नाहीं.

**तुळशीः**—तें काम माझं !—तुम्ही पहा तर खरी माझी करामत मग बोला !

( हुजऱ्या प्रवेश करितो. )

**हुजऱ्याः**—बाहेर एक तरुण मराठा आला आहे. आणि तो भेट घेऊं इच्छितो.

**कलुषाः**—तरुण मराठा ? कोण बरं असावा ?—तुळशी, तूं जा आतां आंत. आणि आपल्या तयारीला लाग. ( तुळशी जाते. ) हा तरुण मराठा कोण बरं असावा ? गणोजी शिरक्याकडून तर आला नसेल ? कारण बादशहा-कडून माझं मन वळविण्याकरितां तो नुकताच दक्षिणेंत आला आहे, अशी मला नेमाजीकडून खबर लागली आहे. पण कोणी का असेना ? पाहूं तर खरं ! ( उघड ) जा त्याला पाठवून दे आंत. ( हुजऱ्या मल्हारीला घेऊन येतो. कलुषा निरखून पाहतो. ) तूं कां आलास ? मजजवळ तुझं काय काम आहे ?

**मल्हारीः**—( मुजरा करून ) आपल्याजवळ रहावं अशी इच्छा आहे.

**कलुषाः**—मजजवळ रहावं अशी इच्छा आहे ? पण मजजवळ रहावयाचं म्हणजे फार बिकट काम आहे.

**मल्हारीः**—धर्म आणि नीति या विरुद्ध सोडून कोणतेंहि बिकट काम करण्यास मी केव्हांहि माघार घेणार नाहीं.

**कलुषाः**—धर्म आणि नीति या विरुद्ध म्हणजे काय ?

**मल्हारीः**—धर्म आणि नीति यांस संमत नाहीं असं काम मी करणार नाहीं.

**कलुषाः**—पण तुझ्या धर्मनीति विरुद्ध कीं माझ्या धर्मनीति विरुद्ध ?

**मल्हारीः**—धर्म—नीति ही सर्वत्र सारखी आहे. तेव्हां तुमची आणि माझी असा प्रश्नच उद्भवत नाहीं.

**कलुषाः**—ठीक आहे. तुझी ही उत्तर देण्याची तडफ पाहून तुला जवळ बाळगावा असं मला वाटतं. तरी देखील माझ्याजवळ रहावयाचं फार कठीण आहे. कान असून ऐकायचं नाहीं, तोंड असून बोलायचं नाहीं, डोळे असून पहायचं नाहीं आणि मी सांगितलेलं काम कसं करूं—कां करूं ? अशी मनांत शंका न आणतां बिनचुक करायचं !

**मल्हारीः**—ठीक आहे महाराज. मला ह्या सर्व गोष्टी मान्य आहेत.

**कलुषाः**—तुझं नांव काय ?

**मल्हारीः**—माझं नांव मल्हारी.

**कलुषाः**—तूं रहाणार कुठला ?

**मल्हारीः**—मी रहाणार नात्याचा.

**कलुषाः**—तुला आप्त मंडळी कोण आहेत ?

**मल्हारीः**—मला आप्त मंडळी कोणी नाहींत. मी एकटाच आहें,

**कलुषाः**—बरं आहे मल्हारी, आजपासून मी तुला जवळ ठेवीत आहें. तूं माझ्या मनाप्रमाणं वागशील तर तुला लवकरच मोठ्या पदावर चढवीन. आणि कपटानं वागशील तर मात्र एकदम रसातळाला पोंचवीन याची आठवण ठेव. ( अटी मान्य आहेत असें दर्शविण्याकरितां मल्हारी मुजरा करितो. ) तुझ्या वेतनाचा उद्यां विचार करूं. आज महाराज इथं येणार आहेत, तर तूं इथं जवळच ऐस. आणि पडेल तें काम कर. आतां महाराज येण्याची वेळ झाली; मी त्यांच्या स्वागताकरितां जातों. ( कलुषा जातो. )

**मल्हारीः**—आजपासून मी नोकरीचा पेशा उचलला. नोकरी म्हणजे गुलामगिरी. ह्या गुलामगिरीचा 'श्रीगणेशा' म्हणजे कान असून ऐकायचं नाहीं, तोंड असून बोलायचं नाहीं, डोळे असून पहायचं नाहीं, आणि सांगितलेलं काम कसं करूं—कां करूं अशी मनांत शंका न आणतां बिनचुक करायचं ! ( मान हालवीत ) ठी—क. ही गुलामगिरी म्हणजे श्वानवृत्तीच ! पण माझ्या नोकरीचं ध्येय श्वानवृत्तीचं आहे काय ?—नाहीं. महाराजांचा प्रसाद मिळविण्याकरितां जरी मी हा नोकरीचा पेशा उचलला आहे, तरी माझं अंतिम निरिच्छ ध्येय स्वामिभक्ति हें आहे. अहाहा !—'स्वामिभक्ति'— 'राजनिष्ठा' या शब्दांत अशी काय जादू भरली आहे ? आतां मला हे शब्द किती तरी प्रिय वाटूं लागले ?—हो, पण तो तरुण कोण ? कलुषाची नोकरी पत्करून त्याच्या हालचालीवर नजर ठेवायची आणि महाराजांचं रक्षण करावयाचं हा महाराजांकडून प्रसाद मिळविण्याचा किती सोपा मार्ग त्यानं मला दाखविला. पण तो तरुण कोण असावा बरं ! त्याच्या चर्येवर एक प्रकारचं अपूर्व तेज झळकत होतं. ( आंत पाहून. ) हे कोण येत आहेत ? महाराज येत आहेत वाटतं !—होय. ( प्रथम चोपदार मागून संभाजी व कलुषा येतात. )

**संभाजीः**—कविराज, आज माझं मन अगदीं अस्वस्थ झालं आहे. मी आतां येणार नव्हतों. परंतु तुम्हांला वाईट वाटेल म्हणून आलों.

**कलुषाः**—( हात जोडून ) या नम्र सेवकावर महाराजांचे महत् उपकार

आहेत. मजसारख्या गरिबावर महाराजांचा इतका लोभ आहे हें पाहून मी स्वतःला धन्य समजतों. पण महाराज, मला वाटतं आपलं मन अस्वस्थ होण्याचं कारण,—तें परळीहून आलेलं पत्र असावं. पण महाराज, त्यांत इतका विचार करण्यासारखं काय आहे? रामदास स्वामींनीं उपदेश करण्याचा मोठा आव घातला आहे तो ठीकच आहे. परंतु राजकारस्थानांतील बिकट डावपेंच त्या एकांतांत रहाणाऱ्या सर्वसंगपरित्यागी अशा ब्रह्मचाऱ्याला काय कळणार?—थोरले महाराज त्यांना मान देत होते. कारण ते त्यांना साधु पुरुष समजत होते. आणि आपणहि त्यांना मान द्यावा हें योग्य आहे. पण राजकीय गोष्टींत त्यांनीं कितपत मन घालावं हाहि एक प्रश्नच आहे. पण महाराज, तें जाऊं द्या. आतां ह्या आनंदाच्या वेळीं, त्या रूक्ष गोष्टी कशाला?

**संभाजीः**—पंडितराव, आज तुम्ही आमच्याकरितां फार श्रम घेतलेले दिसतात.

**कलुषाः**—( हात जोडून ) महाराज, यांत श्रम ते कसले? उलट असे प्रसंग वारंवार येऊन महाराजांना दरबारांत होणारे श्रम परिहार व्हावेत अशी या सेवकाची मनापासून इच्छा आहे.

**संभाजीः**—कविराज, त्याला मी श्रम म्हणून म्हणणार नाहीं. आबासाहेबांनीं जी जबाबदारी शिरावर घेतली होती तीच मला घेतली पाहिजे. त्या करितांच माझा जन्म आहे. आणि ती जबाबदारी योग्य रीतीनं बजावणं हेंच माझं कर्तव्य काहे. वास्तविक नव्या मोहिमेवर मीच जातीनं जावयास पाहिजे होतं परंतु दादजीनं ते माझे श्रम वांचविले.

**कलुषाः**—महाराज, आतां गोष्टच निघाली आहे म्हणून बोलतों. दादजी हा मोठा शूर आहे. त्यानं आज जी कामगिरी अंगिकारली आहे ती यशस्वी करून परत आल्यावर चिटणीस हें पद त्यास देऊन त्याला आपल्या लोभांत घ्यावं अशी माझी नम्र सूचना आहे.

**संभाजीः**—कविराज, हें असं होणं शक्य नाहीं. आबासाहेबांनीं बाळाजी आवजीला चिटणीस हें पद वंशपरंपरेनं देऊन शपथवचन दिलं आहे. ह्या अर्थी ही गोष्ट घडावयाची नाहीं. दादजी विजयी होऊन परत आल्यावर त्याचा निराळ्या प्रकारें गौरव करावयाला मी समर्थ आहें.

**कलुषाः**—प-ण मी त्याला तसं आश्वासन दिलं आहे.

**संभाजीः**—छे! छे! पंडितराव, तुम्ही ही गोष्ट फार वाईट केली. आबा-

साहेबांच्या मागं मला ज्यास्त जरी कांहीं करितां आलं नाहीं किंवा मी ज्यास्त जरी कांहीं केलं तरी त्यांनीं घालून दिलेली मर्यादा उल्लंघन करण्याचं मजकडून केव्हांहि धाडस व्हावयाचं नाहीं. आतां दादजी विजयी होऊन आल्यावर मी त्याची अन्य रीतीनं संभावना करीन.

**कलुषाः**—( किंचित् निराश होऊन ) कोण आहे तिथं ?—तुळशी—( तुळशी मुरडत प्रवेश करते. संभाजी पहातो. ) तुळशी जा. महाराजाकरितां देवीचा प्रसाद घेऊन ये. ( ती जाते व प्रसाद घेऊन येते. तुळशी मदिरापात्र पुढें करिते. संभाजी घेत नाहीं. ) महाराज, मी शाक्तपंथी आहें. हा माझ्या देवीचा प्रसाद आहे. ह्या देवीच्या प्रसादाचा असा अपमान करूं नये.
( संभजी पात्र घेतो पुन्हा ठेवतो. व उचलून तोंड वाईट करून पितो. तुळशी त्याच्याजवळ बसते. पुनः पात्र भरते व स्वतः देते. तो 'नको' म्हणत असतां ती अविर्भाव करून पात्र पुढें करिते. तो घेतो. तिसरें पात्र भरते. संभाजी मंदील काढतो. व मागें टेकतो. )

**मल्हारीः**—( स्वगत ) मघांपासून हा सर्व प्रकार मी पहात आहें. या चांडाळानं महाराज 'नको नको' म्हणत असतां त्यांच्या इच्छेविरुद्ध देवीचा प्रसाद म्हणून त्यांना मदिरेला बळी पाडलं. पहा कसा एका घटकेंत हा सिंहाचा छावा गोगलगाईसारखा मलुल झाला !

**कलुषाः**—कोण आहे तिकडं ?–मल्हारी, जा आतां, तुझं इथं काम नाहीं. देवडीवर जाऊन बैस.

**मल्हारीः**—( मुजरा करतो ) ( स्वगत ) आतां हा चांडाळ पुढें काय काय रंग करील ते परमेश्वराला ठाऊक ! ( जातो. )

**संभाजीः**—( अडखळत ) पंडितराव, तुम्ही—तुम्ही आमच्या राज्याचे, खरे खरे हितचिंतक. तुमच्या—तुमच्यासारखे सेवक असतां माझ्या राज्याला अपाय होण्याची काय भीति आहे ?

**कलुषाः**—(हात जोडून) महाराज असं म्हणूं नका. आम्ही जरी राज्याचे खरे खरे हितचिंतक आहों तथापि तुमच्या मुत्सद्दीमंडळांत अद्यापि दुष्ट फितुरी आहे. ते केव्हां काय करतील याचा नेम नाहीं. ( तुळशीला खूण करतो. ती मदिरापात्र पुढें करते. )

**संभाजीः**—( अडखळत ) दुष्ट फितुरी आहेत ?—माझ्या राज्यांत दुष्ट

फितुरी आहेत ? कविराज-पंडितराव—सांगा—सांगा—त्यांचीं नांवं सांगा ! आतां त्या चांडाळांना हत्तीच्या पायीं तुडवितों.

**कलुषाः**—महाराज, इतके श्रम घेण्याचं कारणच नाहीं. महाराजांनीं ह्या सेवकाला लेखी हुकूम द्यावा, म्हणजे हा सेवक तें काम करील.

**संभाजीः**—( ज्यास्त अडखळत ) प—पण—पण कबजी, त्या—त्या दुष्टांचीं नांवं सांगा ?

**कलुषाः**—महाराजांना त्यांचीं नांवं सांगितलीं तर खरं सुद्धां वाटणार नाहीं.

**संभाजीः**—( अडखळत जोरानें ) खरं वाटणार नाहीं ?—कां वाटणार नाहीं ?—वाटलंच पाहिजे !—सांगा—सांगा नांवं !

**कलुषाः**—महाराज, त्यांचीं नांवं का ?—आपले बाळाजी आवजी, त्यांचा बंधु, त्यांचा मुलगा ही सर्व मंडळी आंतून राजारामाची फितुरी आहे !—

**संभाजीः**—( पाय आपटीत अडखळत ) फितुरी !—फितुरी आहे !—बस्स—द्या त्यांना एकदम हत्तीच्या पायीं—तुडवा—आत्तांच्या आत्तां तुडवा—

**कलुषाः**—आज्ञा सरकार. ( मागें ठेवलेला कागद पुढें करतो. ) हा हुकुम—

**संभाजीः**—( हुकूमावर सही करून कागद टाकतो. ) तुळशी !—

**तुळशीः**—( जवळ जाते. ) महाराज—( पात्र पुढें करते ) माझ्या हातानं घ्यायचं आतां ! ( तो पितो व तिच्या गळ्यांत हात टाकतो. )

**कलुषाः**—( स्वगत ) हां माझ्या मार्गांतील शेवटचा कांटा मी आतां उपटला. त्याच्याबरोबर त्याचा भाऊ आणि मुलगाहि उडवले. झालें !—आतां सूर्योदयापूर्वी ह्या हुकूमाची अंमलबजावणी करतों. ( तुळशीला नेत्रसंकेत करतो. परस्परांच्या खुणा होतात. कलुषा जातो. )

**तुळशीः**—महाराज, ह्या गरीब दासीबरोबर बोलायचं नाहीं का ?

**संभाजीः**—तु—तु—ळ—शी—

**तुळशीः**—महाराज, ह्या आपल्या तुळशीला विसरणार नाहीं ना ?

**संभाजीः**—( एकदम तिच्या गळ्याला मिठी मारून ) तूं माझी आहेस !

( पडदा पडतो. )

**दुसरा अंक समाप्त**

---

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

**स्थळः**—राजमहाल.

( राजकुंवर बसली आहे. )

**राजकुंवरः**—शिर्क्यांच्या कुळांत उत्पन्न झालेला एक तरुण—भोसल्यांच्या वैऱ्यांपैकीं एक वैरी, तारे ! तूं राजनिष्ठ बनविलास. तुला मी गुरुस्थानीं कां मानू नये ? तूं खरी तेजस्वी आर्यांगना आहेस. माझ्या दादानं—तुझ्या राजानं निरापराधी जगदेवरावाचा अन्यायानं कडेलोट करून तुझं पितृछत्र नाहींसं केलं तरी तुझ्या राजनिष्ठेंत अणुरेणूं इतकाहि फरक पडला नाहीं. उलट एका शिर्क्याला तूं राजनिष्ठ बनविलंस. शाबास—धन्य तुझ्या राजनिष्ठेची ! शिर्क्यांच्या सुडाला आंत शिरण्यास अटकाव करणारे हे गडाचे अभेद्य तट तूं तयार केलेल्या राजनिष्ठ मल्हारीपुढें अगदीं फिके आहेत. खरोखरीच तुझा मल्हारी म्हणजे महाराष्ट्रप्रभूचं रक्षण करणारा एक दर्शनी अभेद्य तट बनला आहे यांत शंका नाहीं. तुझ्या ह्या निस्सीम राजनिष्ठेची मला राहून राहून आठवण होतांच प्रत्येक वेळीं माझ्या सर्वांगावर रोमांच उभे राहतात. मी देखील प्रयत्न केला, परंतु मला माझ्या पतिदेवाला असं राजनिष्ठ कां बनवितां आलं नाहीं ? माझ्या प्रयत्नांत कसूर झाली काय ? माझ्या प्रयत्नांची दिशा चुकली काय ?—पतीच्या अंतःकरणांत ठाणं देऊन बसलेल्या राजद्रोहाचं रक्त बाहेर काढून तिथं सळसळणाऱ्या राजनिष्ठ रक्ताच्या ऊर्मि उठवण्याइतकं माझं शब्दशस्त्र तीक्ष्ण नव्हतं काय ?—तारे ! तुझ्या शब्दशस्त्रांत अशी कोणती जादु भरलेली होती ?—छे ! ही जादू नव्हे. मी समजतें तितकं हें कार्य तुला सहजासहजीं करतां आलं नाहीं—होय. असंच ! आपल्या भावी पतीला राजनिष्ठ बनविण्याकरितां तुला आपल्या प्रेमजीविताचा होम करून प्रेमसर्वस्वाची किंमत द्यावी लागली, हें इतका वेळ माझ्या कसं लक्षांत आलं नाहीं ?—आणि माझं चुकलं तें इथंच ! प्रयत्नाच्या ऐनवेळीं माझ्या पतीप्रेमानं मला दगा दिला ! ऐन वेळीं माझ्या पतीप्रेमानं माझ्या तोंडाला कुलुप

लाऊन माझा प्रयत्न लंगडा पाडला. माझं चुकलं तें इथंच !—कर्तव्यापेक्षां मला पतीप्रेम जास्त वाटावं काय ?—नाहीं. पतीदेवाला राजनिष्ठ बनविण्याकरतां मला माझ्या पतीप्रेमाचा होमच केला पाहिजे.

**येसूबाई**:—( प्रवेश करून ) काय केलं पाहिजे ताईसाहेब ?

**राजकुंवर**:—( तिच्याकडे क्षणभर पाहून ) काय केलं पाहिजे ?—अरेरे ! वहिनी, मला तुझी कींव येते ! अग, काय केलं पाहिजे म्हणून तूं विचारतेस ?—वहिनी, अशा वेळीं प्रयत्नच केले पाहिजेत. ( येसुबाई बसते. )

**येसूबाई**:—पण प्रयत्न करायचे कसे ? आपल्या हातभर कापडानं दिवसेंदिवस जास्त फाटत चाललेल्या ह्या अफाट आकाशाला आपण ठिगळं लावणार तरी किती ? आणि तें कापड पुरणार तरी कसं ?

**राजकुंवर**:—प्रयत्नांनीं पुरवलंच पाहिजे ! वहिनी, हा तुझा हताश युक्तिवाद ऐकून आतां मी म्हटलं तेंच पुन्हां म्हणतें कीं, मला तुझी कींव येते ! वहिनी, तूं पापभीरु आहेस हें मीं जाणतें. दादाची प्रत्येक कृति तुझ्या शुद्धांतःकरणाचं पाणी करीत आहे हें खरं ! पण ह्या तुझ्या मनाच्या कमकुवतपणामुळं तूं स्वतःला—धर्मपत्नीच्या खऱ्या कर्तव्याला—लाथाडीत आहेस असंच मी म्हणेन ! वहिनी, पति स्वकर्तव्यच्युत झाला असतां त्याला शुद्धीवर आणण्याचं काम कोणाचं ? कर्तव्यभ्रष्ट पतीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याचं काम कोणाचं ?—पतीला शुद्धीवर आणणं, त्याला कर्तव्यभ्रष्टतेच्या भयंकर पातकापासून परावृत्त करणं, हाच आपला पतिव्रताधर्म नव्हे काय ?—शिवाय वहिनी, याहीपेक्षां एक अत्यंत मोठी अशी जबाबदारी तुझ्या शिरावर आहे, याची तुला अद्यापि कल्पना देखील नाहीं असं दिसतं.—तूं राजपत्नी ना ? मग अखिल प्रजेची तुम्हांवर 'लोकमाता' या नात्यानं असलेली जबाबदारी तुझ्या केव्हां लक्षांत येईल—प्रजेनं चोहोंकडून फोडलेले टाहो, त्याचा करुणस्वर तुझ्या कानावर सारखा आदळत असूनहि अद्यापि तुझ्या आद्यकर्तव्याची जागृति होत नाहीं काय ? वहिनी, ह्या ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं तुझ्या मनानं कच खाल्ली तर आबासाहेबांनीं इतक्या दीर्घ प्रयत्नांनीं स्थापिलेल्या ह्या स्वराज्याला धक्का बसला म्हणून समज. ऊठ, वहिनी ऊठ, अशी हताश होऊं नकोस. तूं लोकमाता आहेस हें लक्षांत ठेऊन आपल्या पतीला—माझ्या दादाला—महाराष्ट्राच्या प्रभूला—महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां जागं करण्याचं तुझं पवित्र कर्तव्य आजपासून सुरू कर. तूं आतां पुढें

सरसावल्याशिवाय ह्या पंडितजीच्या कारस्थानाला आळा बसणार नाहीं. प्रथम ह्या नीच मनुष्याची दरबारांतून उचलबांगडी तरी कर, नाहीं तर प्रथम राजाचा शिक्कामोर्तब तरी आपल्या हातीं घे.

**येसूबाई:**—ताईसाहेब, तर मग तुम्हीं सांगतां त्याप्रमाणं करतेंच मी मनाचा निश्चय !

**राजकुंवर:**—वहिनी, मीं सांगतें म्हणून का तूं मनाचा निश्चय करणार?— आपल्या वंदनीय थोरल्या मासाहेबांची शिक्षा तूं इतक्या लवकर विसरलीस वाटतं ? अग, आबासाहेबांना कठीण प्रसंगीं मार्गदर्शक होणारी—संकटसमयीं त्यांचं रक्षण करणारी—विजयोत्साहाच्या वेळीं त्यांस प्रसन्न वर देणारी अधि-देवता तुला आणि मला कोणते पाठ देऊन गेली ?

**येसूबाई:**—( ताड्कन उठून ) ताईसाहेब, झाला माझा निश्चय.

**राजकुंवर:**—शाबास, वहिनी शाबास ! भेटूं दे मला एकदां कडकडून ! ( भेटतात ) आजपासून आपल्या दोघींच्या आद्यकर्तव्याला खरी सुरुवात झाली म्हणायची !—माझे पूज्य पति—माझ्या पंचप्राणाचे स्वामी, सांप्रत कर्तव्यभ्रष्ट झाले आहेत. मी एकवेळ केलेला प्रयत्न निष्फळ झाला. पण माझ्या चिकाटीचा हा दुसरा प्रयत्न आजपासून सुरू होणार. ह्या माझ्या प्रयत्नांत मला माझ्या पतिप्रेमाचा होम करावा लागला तरी बेहेत्तर आहे पण माघार म्हणून घेणार नाहीं, हीच माझी प्रतिज्ञा.

**दासी:**—( प्रवेश करून ) बाईसाहेब, बाहेर चिटणिशीणबाई आपल्या मुलांना घेऊन आल्या आहेत.

**येसूबाई:**—जा. त्यांना आंत घेऊन ये.

**राजसबाई:**—( मुलांसह प्रवेश करते. ) राणीसरकार ! हीं माझीं दीन अनाथ पोरं आपल्या चरणावर टाकिलीं आहेत ( मुलांना पुढें लोटते ) आतां तारा नाहीं तर मारा ! आपण आमचे प्रभू आहांत. आपणाशिवाय आतां आम्हां दीनांना कोण वाली आहे ? बाईसाहेब, अन्नदात्यानं हत्तीच्या पायीं चिरडलं—मी गरीब गाय दैवाला बोटं लाऊन बसलें तों इकडे पंडितरावांनीं ह्या अनाथ पोरांवर शस्त्र उगारलं ! राणीसरकार, ती घोर कहाणी मी किती म्हणून सांगूं ? मोठ्या शर्तीनं जिवाचा हट्टाहास करून व्याघ्रमुखांतून हे माझे आशातंतू मी सोडवून आणले आहेत.—आतां मायबाप आपण ! तारा नाहीं-तार मारा. ( रडूं लागते. )

**येसूबाई:**—( स्वगत ) हिचीं हीं गलित झालेलीं गात्रें—निस्तेज पडलेला चेहेरा—कुंकुम रहित कपाळ काय दर्शवीत आहेत ? ह्या अनाथ स्त्रीचा सौभाग्यरवि तिकडच्या अत्याचारामुळंच मानवला असेल काय ? पण मी हिला कोणत्या तोंडानं विचारूं ?

**राजकुंवर:**—राजसबाई, हा काय प्रकार आहे ?

**राजसबाई:**—( हुंदके देत ) ताईसाहेब, मी काय सांगूं आणि कसं सांगूं ? राजानं मारलं—पावसानं भिजिवलं—आकाशाची कुऱ्हाड कोसळली मी फिर्याद कुणाजवळ नेऊं ?—अन्नदात्याच्या हुकुमानं पंडितरावानं अरुणोदयापूर्वींच माझा सौभाग्यरवि हिरावून नेला—माझ्या एका लाडक्या पाडसाला हत्तीच्या पायीं तुडविलं—माझ्या संसाराची माती केली ! राणीसरकार काय सांगूं ?

**राजकुंवर:**—समजलें ! त्या चांडाळ कलुषाचं हें नवीन कारस्थान असलं पाहिजे.—दादा, तूं इतका कसारे अविचारी बनलास ?—वहिनी, इतका वेळ विचार कसला करतेस ? तूं आतां आपल्या अधिकाराचा उपयोग करणार नाहींस मग तूं राणी कसली ? घाल—घाल त्या पोरांना पाठीशीं ! वहिनी, तूं लोकमाता ना ? मग आतां विचार कसला करतेस ? हीं दीन झालेलीं पोरं, पुत्रशोकानं हृदय विदारण झालेली—वैधव्यानं होरपळलेली ही अनाथ तुझ्या आश्रयाला येणार नाहीं तर ती जाईल तरी कुठं !—राजसबाई, पुसा आतां डोळे ! तुम्हीं आतां ह्या मुलांची कांहीं सुद्धां चिंता करूं नका. आजपासून वहिनी त्यांची आई झाली.

**येसूबाई:**—ताईसाहेब, ही पहा मी कंबर बांधली !—राजसबाई, आतां हीं मुलं तुमचीं नव्हत, माझीं आहेत. ( मुलांना जवळ घेऊन ) पहातें आतां या पोरांच्या केसाला धक्का लावण्याचं सामर्थ्य कोणांत आहे तें !

**दासी:**—( प्रवेश करून ) राणीसाहेब. सरकारस्वारी येत आहे.

**राजकुंवर:**—वहिनी, दादा आला. आतां मी राजसबाईला घेऊन जातें आणि तिची स्वतःच्या महालांत व्यवस्था करितें. पण ठरलेल्या गोष्टी तुझ्या लक्षांत आहेत ना ?

**येसूबाई:**—ताईसाहेब, आपण आतां निर्धास्त असा. ही येसूबाई आतां पूर्वींची राहिली नाहीं. ( राजकुंवर, राजसबाई मुलांसह जातात, संभाजी प्रवेश करतो. )

**संभाजीः**—( स्वगत ) कृतीमागून पश्चात्ताप होतो, यावरून हातून घड-लेली कृति वाईटच असली पाहिजे. चांगल्या कृतीचा नेहेमीं आनंदच व्हायचा ! आतांपर्यंत माझ्या हातून किती तरी कृत्यें घडलीं, परंतु त्याबद्दल एकदांहि आनंद झाल्याचं मला स्मरत नाहीं. मग माझीं सर्वच कृत्यें वाईट होतीं काय ? कां बरं ? माझ्या हातून अत्याचार घडले खरे, पण त्या सर्वांना कारण होतं. पण माझ्या रात्रीच्या कृत्याला काय कारण ? तें सर्व कृत्य कारणाशिवाय घडलं. कविकलुषानं रात्रीं माझ्याकडून किती तरी पापाचरण करविलं ! पण मी असा मूर्ख कसा झालों ? रात्रीं मी मद्यप्राशन केलं—आणि—मी इतका विषयासक्त कसा बनलों ? छेः ! छेः ! रात्रीं घडलेल्या गोष्टींची आठवण झाली कीं आंगावर शहारे येतात. ह्या मोहाचा पाश मला तोडलाच पाहिजे. माझा जन्म ऐषआरामांत लोळण्याकरतां आहे काय ?

**येसूबाईः**—( पुढें होऊन ) आतां हा विचार पाठीशीं लागलाच आहे. जबाबदारीबरोबर विचार वाढतो खरा परंतु तो सुविचार मात्र असला पाहिजे.

**संभाजीः**—( स्वगत ) माझ्या रात्रींच्या कृत्यावर हिचा रोंख दिसतो. ( उघड ) असा कोणता कुविचार मी केला ? ( कोचावर बसतो. )

**येसूबाईः**—केला असं म्हणण्याचं मी कसं धाडस करूं ? आपले राज्य-कारणी मुत्सद्दी डावपेचांचे विचार मला कसे कळणार ? आणि कळले तरी ते सुविचार आहेत किंवा कुविचार आहेत हें तरी कसं कळणार ? बोलून चालून मी बायको माणूस !

**संभाजीः**—ही प्रस्तावना सुरू झाली आहे तेव्हां आमच्या वर्तनांत कांहीं तरी कमी अधिक प्रकार घडलेला राणीसाहेबांच्या नजरेस आला असावा. असं वाटतं. आमच्या हातून काय प्रमाद घडला तो तरी कळूं द्या !

**येसूबाईः**—कळून काय उपयोग ?

**संभाजीः**—कां बरं ? अपराध असल्यास शिक्षा करा !

**येसूबाईः**—शिक्षा कोणी करायची ? धन्याला का कोणी धनी आहे ? पण आतां विचारतां तेव्हां बोलतेंच. ह्या एक दोन दिवसांत आपल्या हातून कांहीं कमी अधिक प्रकार नाहीं का घडला ?

**संभाजीः**—( स्वगत ) जवळ जवळ येत चाललं. पण दिशाभूल केली

पाहिजे. ( उघड ) होय—घडला. आणि त्यामुळंच माझं मन अस्वस्थ झालं आहे.

**येसूबाई:**—एकूण हातून घडलेली चुकी लक्षांत आली आहे तर ? मग आतां व्यर्थ विचार करून दिवस घालविण्यापेक्षां झालेली चुकी दुरुस्त कां करून घेत नाहीं ?

**संभाजी:**—तेवढ्या करतांच तर मी तुमची परवानगी घेण्याकरतां आलों आहें.

**येसूबाई:**—त्यांत परवानगी कशाला ? आणि माझ्या परवानगीनं असं कोणतं कार्य झालं ?

**संभाजी:**—म्हणूनच तर आमच्या हातून चुक्या झाल्या. बरं पण तें राहूं द्या. मग आम्हीं उदयीक निघण्याची तयारी करावी तर ?

**येसूबाई:**—निघण्याची तयारी ?—कुठं ?

**संभाजी:**—मोहिमीवर. इथं राहिल्यानं ह्या ऐषआरामामुळं निरुद्योगी मन भलत्याच गोष्टीकडे धांव घेतं आणि आमच्या हातून चुक्या घडतात. म्हणून मी मोहिमीवर जाण्याचं ठरवलं आहे. आबासाहेबांची इच्छा—जंजिरा काबीज करून कोकणपट्टीचा नाका आपल्या ताब्यांत घ्यावा ही त्यांची इच्छा पूर्ण करणं हा माझा पुत्रधर्म ! पण मी ही कामगिरी स्वतः शिरावर न घेतां दादजी-वर सोपवली ही माझ्याकडून चुकी झाली.

**येसूबाई:**—महाराज, ही आपली कर्तव्यजागृति पाहून मला आनंदच होत आहे. आणि आपणाला सदोदित अशीच कर्तव्य जागृति असावी, असं माझं आई अंबेजवळ पदर पसरून मागणं आहे.

**संभाजी:**—( स्वगत ) किती भोळी ही ? मी दिशाभूल करतांच ही फसली !

**येसूबाई:**—पण महाराज, मी म्हणतें ती चुकी दुसरी आहे.

**संभाजी:**—कोणती ? सांगा ?

**येसू०**—पण तिला चुकी म्हणण्यापेक्षां दुसरंच कांहीं तरी विशेष नांव दिलं पाहिजे. महाराज, आपण कलुषाच्या नादानं बाळाजी प्रभूला हत्तीच्या पायीं बांधलं याबद्दल आपलं मन आपणांस टोंचत नाहीं का ? ( संभाजी दचकतो. ) ( स्वगत ) आत्तांच दोन वळसे देऊन पहावे. (उघड) महाराज, बाळाजीला मारल्याबद्दल आपल्याला वाईट वाटतं का ? त्या दुष्ट कलुषाच्या नादानं आपण

राज्याचं हें केवढं मोठं नुकसान केलं आहे ? तीर्थरूप आबासाहेबांच्या प्रयत्नांना सहाय्यभूत आणि स्थापिलेल्या ह्या स्वराज्याच्या बुद्धीला जे कारणपुरुष झाले आहेत, त्यांना वागवून घेण्यांतच महाराज सुख आहे. त्यांना मारून टाकल्यानं राजा करतां प्राण देणारे पुरुष निर्माण व्हायचे नाहींत हें विसरूं नका. महाराज, ही नुकतीच स्थापन झालेली—आपल्या परमपूज्य वडिलांनीं स्वतःच्या आणि महाराष्ट्र वीरांच्या रक्ताचं पाणी करून ही हिंदुबादशाहीची इमारत उभारली, ती सतत टिकावी असं जर आपणाला वाटत असेल तर करतीं सवरतीं माणसं मारविण्याचा आपण हा क्रम आरंभला आहे तो सोडून द्या. थोरल्या महाराजांनीं बाळाजीस जें इतकं वाढविलं आणि त्याच्या हातून वेळोवेळीं जीं महत्वाचीं कामं करून घेतलीं तीं त्याच्या अंगांत कांहीं चांगले गुण होते म्हणूनच ना ? पण महाराज, आपण ह्या गोष्टींचा विचार सुद्धां केला नाहीं. तो चांडाळ कब्जी आपलं मन दूषित करीत आहे, त्यांत त्याचं खात्रीनं कांहीं तरी कपट आहे. महाराज, आपण हा जो स्वभाव धारण केला आहे, तो आपणास खात्रीनं संकटांत टाकील. आणि याची सत्यता आपणास शिर्क्यांच्या वर्तनावरून अजून पटली नाहींका ? तो माझा प्रत्यक्ष भाऊ असला, तरी त्याला मी आतां भाऊ म्हणणार नाहीं. त्यानं स्वाभिमान टाकला, जात्याभिमान सोडला आणि धर्माभिमान तर पायीं तुडवला ! तो स्वराज्याचा शत्रु झाला, त्याला मी कध्धीं-कध्धींही भाऊ म्हण-णार नाहीं ! पण महाराज, सर्वच कांहीं शिर्के नाहींत. आपल्या राजाकरतां सर्वस्व अर्पण करणारी राजनिष्ठ मंडळी अद्यापि आहेत. आतां त्या बाळाजी प्रभूचीं दोन मुलं लहान आहेत. त्यांना अभय देऊन सरकार चाकरींत ठेवा. त्यांच्याकडून स्वामिसेवा करून घ्या. म्हणजे त्यांच्या आईला—त्या साध्वीला पतिवियोगाचं आणि पुत्र शोकाचं दुःख हलकं वाटेल. मग करायचं ना असं ?

**संभाजीः**—( दीर्घ श्वास सोडून ) चिटणिसांच्या बाबतींत माझ्या हातून मोठी चुक झाली खरी !

**राजकुंवरः**—( प्रवेश करून स्वगत ) वहिनीनं आपल्या कार्याला सुरवात केली म्हणायची ! आतां आपण पुढें व्हावं. ( उघड ) दादा ! एकट्या चिट-णिसांच्या बाबतींत तुझ्या हातून चुकी झाली असंच का तुला वाटतं ? आणि पंतांसारखा मोहरा, तूं आपल्या क्रोधाच्या इरेस पाडलास याचं तुला कांहींच वाटत नाहीं कारे ? पंत म्हणजे आपल्या आबासाहेबांचा उजवा हात ! तो

मराठी साम्राज्यरूपी इमारतीचा मुख्य आधारस्तंभ तूं त्या दुष्ट कलुषाच्या सांगण्यानं कारागृहांत टाकून कलम केलास, याबद्दल तुझं मन तुला काय सांगतं ? दादा, आपल्या आबासाहेबांची राष्ट्र उर्जितावस्थेला आणण्याची अनावर उत्कंठा कोणीकडे आणि राष्ट्र विपन्नावस्थेला नेण्याचा हा तुझा अट्टा-हास कुणीकडे ?—पहा—दादा मजकडे पहा—नाहीं. माझ्याकडे पाहण्याची तुझी छाती नाहीं. माझ्या दृष्टीला दृष्टि देण्याचं तुला धैर्य नाहीं.

**संभाजीः**—ताई, तुम्हीं दोघींनीं आज माझ्यावर हा भडिमार करण्याचा विचारच केला आहे काय ?

**राजकुंवरः**—दादा, आम्हीं आज तुला किती जरी बोललों तरी तें आजच्या पुरतंच ! परंतु कालच्या तुझ्या वर्तनावरून तूं विषयासक्त—व्यसना-धीन होतास असा तुझ्या नांवाचा भावी पिढी डांगोरा पिटील याचा तूं कांहीं तरी विचार केला आहेस का ?—आबासाहेबांनीं आपल्या लोकोत्तर कृत्यांनीं भूमंडळाला अक्षय्यीचं ऋणी करून ठेवलं आहे. आणि तूं आपल्या लोकोत्तर दुष्कृत्यांनीं भूमंडळ कंपायमान करणार कारे ? दादा, आबासाहेबांचं वर्तन किती न्यायाचं, नीतीचं, आणि पराक्रमाचं होतं याची नीट आठवण कर—त्यांची दैदीप्यमान मंगलमूर्ति सतत डोळ्यांपुढं जागृत ठेव. आणि—( संभाजी दचकतो. ) ( हळूच ) वहिनी, दादाच्या मनाची जागृति होऊं लागली आहे, असं दिसतं. ( उघड ) दादा, असा दचकलास कां ? राज्य चालविणं म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. ही मराठी साम्राज्यरूपी इमारत तुला बिनश्रमानं रहावयास मिळाली आहे. पण ही इमारत बांधतांना आबासाहेबांच्या जवळ पुरेसं मनुष्यबळ नव्हतं, द्रव्यबळ नव्हतं शिवाय स्वदेशाची विपन्नावस्था होती. आणि त्यांतून शत्रूंच्या मी मी म्हणणाऱ्या पराक्रमी सरदारांचा सर्व देशभर सारखा धुडगुस होता. अशा समयीं त्यांना किती धोरणं संभाळावीं लागलीं असतील याचा विचार कर. आणि तुला बिनश्रमानं लाभलेली ही इमारत नीट वापर इतकेंच आमचं तुला सांगणं आहे.

**संभाजीः**—ताई, तुला माझ्या कर्तबगारीबद्दल शंका वाटते असं दिसतं. पण ताई, गडाच्या कोसळून पडणाऱ्या तटाला आपल्या हातावर तोलून धरणारा हा संभाजी कमी समजूं नकोस. शत्रूला मी हार जाईन असं जर तुला वाटत असेल तर तो तुझा भ्रम आहे. ताई, औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रू मजपुढं कःपदार्थ आहे. माझ्या तरवारीच्या नुसत्या टोंकानं शत्रूंचीं शिरकमलं एखाद्या

चेंडूसारखीं मी सहज लीलेनं केव्हां अंतराळांत भिरकावून देईन त्याचा मागमूसही लागणार नाहीं. समजलीस ?

**राजकुंवरः**—दादा, मी तुझ्या अचाट शक्तीबद्दल किंवा अलोट धैर्याबद्दल स्वप्नांतहि शंका घ्यावयाची नाहीं. तूं विलक्षण सामर्थ्याचीं अनेक कामं केलीं आहेस, तीं मीं विसरलें नाहीं. मी तुझ्या सामर्थ्याबद्दल बोलत नाहीं. राक्षसहि अचाट शक्तीचीं कामं करतो. पण डोक्यानं विचार करून मग हातानं होणाऱ्या कृतीबद्दल माझी शंका आहे.

**संभाजीः**—एकूण तूं मला राक्षस ठरविलंस तर ?

**राजकुंवरः**—नाहीं तर कोण ?—दादा, तूं राज्यारूढ झाल्यापासून तुझ्या हातून घडलेल्या कृतींचं वर्गीकरण केल्यास तुझं प्रत्येक कृत्य ' राक्षसी कृत्य ' या सदरांत घालावं लागेल.

**संभाजीः**—ताई, असं झालं आहे खरं. पण त्याला मी काय करूं ?

**राजकुंवरः**—काय करायचं तें मी सांगतें. पण ही मराठी साम्राज्यरूपी इमारत अक्षय्य टिकावी अशी तुझी इच्छा आहे ना ?

**संभाजीः**—होय.

**राजकुंवरः**—मग मीं सांगतें तसं करायला तुझी तयारी आहे काय ?

**संभाजीः**—आहे.

**राजकुंवरः**—मग तुझ्याकडून राजदरबारांतून सुटणारा प्रत्येक हुकूम वहिनीच्या दृष्टी खालून जाऊन शिक्का मोर्तब झाला पाहिजे.

**संभाजीः**—ठीक आहे.

**राजकुंवरः**—नुसतं ठीक आहे म्हणून काय ? त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

**संभाजीः**—होईल. खात्रीनं होईल.

**राजकुंवरः**—मग ऊठ तर.

**संभाजीः**—( उठतो ) आणि ?

**राजकुंवरः**—प्रथम माझ्यासमक्ष तुझा शिक्कामोर्तब वहिनीच्या स्वाधीन कर.

**संभाजीः**—करतों.

**राजकुंवरः**—मग चल तर— ( जातात. )

## प्रवेश दुसरा

**स्थळः**—रायगडावरील समाधीचा रस्ता.

( मोरोपंत पिंगळे प्रवेश करतात. )

**मोरोपंतः**—विधीलेखन हें कोणालाहि टाळतां यायचं नाहीं. कर्तृत्व-वान् पुरुष उत्पन्न झालेल्या वाटेल तशा प्रतिकूल परिस्थितीला वेसण घालून बदलूं शकेल परंतु विधीलेखन मात्र त्याला बदलतां यावयाचं नाहीं. माझ्या नशिबीं कारागृहवास होता. आजपर्यंत त्या महाप्रतापी पुरुषाच्या बरोबर आम्हीं वाटेल त्या बिकट परिस्थितीला लहान मुलांच्या खेळण्याप्रमाणं हाता बोटावर नाचवून अनुकूल करून घेतली, परंतु विधीलेखन तें विधी-लेखन ! त्याच्यापुढं प्रत्येकाला मान वांकविलीच पाहिजे. त्या विधीलेखना-प्रमाणं आज माझा कारागृहवास सुटला. महाराजांनीं कृपावंत होऊन मला घरीं जाण्याची मोकळीक दिली. राजभगिनी आणि राजपत्नी यांच्यामुळं ही माझी सुटका झाली असं मला कळलं. परंतु त्याचा काय उपयोग ? राजकार-णांत मन घालायचं नाहीं आणि स्वस्थ घरीं बसून असायचं असा ह्या सुटकेबरोबरच मला सक्त हुकूम मिळाला आहे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणं सर्व दिवस घरांत बसून काढला. परंतु महाराष्ट्राच्या भावी स्थितीचं चित्र डोळ्यां-पुढून हालत नाहीं, किंवा विचार मला सोडीत नाहींत. झोंप घेण्याचा प्रयत्न केला परंतु मनाची तळमळ शांत होईना म्हणून इतक्या रात्रीं घराबाहेर पडलों. आतां एकदां त्या पुण्यश्लोक पुरुषाच्या समाधीचं दर्शन घेतल्याशिवाय ही मनाची तळमळ शांत होणार नाहीं. ( जाऊं लागतो व थांबून ) हा कोण बरं इतक्या रात्रीं इकडे फिरत आहे ?

( मल्हारी प्रवेश करतो. )

**मल्हारीः**—( मुजरा करतो ) आपलं दर्शन घडावं अशी फार दिवस इच्छा होती.

**मोरो०**—पण तूं कोण आहेस ? तुझं नांव काय !—

**मल्हारीः**—मला मल्हारी म्हणतात.

**मोरो०** —मल्हारी ! जगदेवराव सरनाइकांचा आणि तुझा कांहीं संबंध आहे काय ?

**मल्हारी**:—होय महाराज, आणि त्यांच्याच सांगण्यावरून—

**मोरो०**—गेला बिचारा ? त्यांनीं आणि मी किती तरी सुखाचे प्रसंग एकत्र अनुभवले. पण आतां काय त्याचं ! मेला बिचारा ! महाराष्ट्राचा खरा हितचिंतक गेला ! ( सुस्कारा सोडून ) पण तूं इतक्या रात्रीं इथं काय करतोस ?

**मल्हारी**:—आपणच सांगितलेली कलुषाच्या हालचालीवर नजर ठेवण्याची कामगिरी बजावित आहें.—पण महाराज, हें घोंगडं असं भिजत ठेवण्यापेक्षां एकं घाव आणि दोन तुकडे करून त्या कलुषाचा कांटा मुळांतून काढून टाकल्यास—

**मोरो०**—छे: छे: ! हा अविचार होईल. मल्हारी, असे प्रसंग पाहून तुम्हां तरुण मंडळीचं रक्त उसळूं लागतं हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु त्या बरोबर मनुष्यानं आपलं उदात्त ध्येय केव्हांहि विसरतां कामा नये. असा अविचार करावयाचा असता तर मी देखील या पूर्वींच कारागृहांतू स्वतःची सुटका करून घेतली असती. परंतु नाहीं ! असा विकारवश होऊं नकोस आणि मी सांगतों तें लक्षांत ठेव. स्वाभिमान, स्वराज्यप्रीति आणि राजनिष्ठा ह्या बहुमोल गुणांनीं मंडित निरपेक्ष स्वकर्तव्य बजावणाऱ्या तुझ्यासारख्या धाडसी तरुणांच्या सहाय्यानें थोरल्या महाराजांनीं हा स्वराज्याचा भक्कम पाया घातला आहे, हें तूं विसरूं नकोस.—मल्हारी, मी नुकताच कारागृहवास भोगला त्याबद्दल मी महाराजांना दोष देत नाहीं. माझ्या ह्या कारागृहवासाला महाराज केवळ निमित्तमात्र होते. बाकी हा सर्व विधिलेखनाचा खेळ आहे. मी सांप्रत अज्ञातवासांत आहें, त्यामुळं माझ्या हातून प्रत्यक्ष अशी स्वराज्यसेवा घडत नाहीं. तथापि माझी इच्छा तें कार्य करीत आहे. कर्तव्यनिष्ठ सेवकाच्या सदिच्छेचा प्रभाव फार मोठा आहे. हें केव्हांहि विसरूं नकोस. जा—मी आतां जें हें सांगितलं तें नीट ध्यानांत ठेव. जगदेवराव सरनाइकांचं उदाहरण डोळ्यांपुढं ठेव. त्यांनीं सांगितल्याप्रमाणं कलुषाच्या प्रत्येक हालचालीवर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेव. आणि जेव्हां महाराजांविरुद्ध त्यांचं मन कलुषित झालेलं तुझ्या दृष्टोत्पत्तीस येईल, तेव्हांच त्यांचा प्रतिकार कर. जा—

**मल्हारी**:—( वंदन करून ) महाराज, आपला हा बहुमोल उपदेश मी माझ्या हृत्पटलावर खोदून ठेवीन.

**मोरो०**—ईश्वर तुला चिरायु करो. जा. पण इतक्या रात्रीं तूं गडावर काय करीत आहेस ?

**मल्हारीः**—महाराजांच्या महालावर पहारा करीत आहें.

**मोरो०**—कां बरं ? तेथें पहारेकरी आहेत ना ?

**मल्हारीः**—होय, परंतु कलुषाचं कारस्थान त्या पाहऱ्यांतून शिरकाव करून घेऊन महाराजांस अपाय करील अशी मला शंका येऊन रात्रंदिवस मी असा गुप्त पहारा करीत आहें.

**मोरो०**—शाबास—मल्हारी शाबास ! जा. तुला निरपेक्ष स्वामिभक्तीचं फळ खात्रीनं मिळेल. जा— ( जातात. )

## प्रवेश तिसरा

**स्थानः**—रायगडावरील समाधि.

( पुरुषवेषांत राजकुंवर प्रवेश करते. )

**राजकुंवरः**—रात्रीची ही वेळ किती प्रशांत आहे. यावेळीं प्रेमी स्त्रिया आपल्या पतीच्या कंठाला घट्ट मिठी मारून स्वस्थ निद्रासुख अनुभवीत असतील. लहान मुलं आपल्या मातापितरांच्या कुशींत डोकीं खुपसून झोपीं गेलीं असतील. वृद्ध स्त्रीपुरुष आपल्या मुलाबाळांचं परमेश्वराजवळ जीवितस्वास्थ्य चिंतून निजले असतील. अशा रीतीनं सर्व गड यावेळीं निद्रासुख अनुभवीत आहे. सर्वत्र शांतता असलेली दिसत आहे. परंतु गडावरील त्या गगनचुंबित मनोऱ्यावरून आसमंतांतील शत्रूकडे तुच्छतेनं पहात असलेल्या—आपल्या आत्मतेजानं फडकत असलेल्या आबासाहेबांच्या प्रासादिक भगव्या झेंड्याला विश्रांति आहे काय ?—बा भगव्या झेंड्या ! तुझ्या अंगांत वसत असलेली दैवी शक्ति काळाच्या वक्र गतीनं कमकुवत होऊन तूं डळमळीत झालास काय ?—पण एकाएकीं तूं असा दिसेनासा कां झालास ? सांप्रत आपापसांत माजलेल्या यादवीच्या वाऱ्यानं चोहोंकडं पसरलेल्या कृष्णकृत्याच्या ढगांत तूं लपूं पहातोस, परंतु स्वातंत्र्य देवीच्या मंदिरांत स्वातंत्र्यउपासकांना जातां येऊं नये म्हणून त्यांचा मार्ग अदृश्य करण्याचा तूं आरंभलेला हा उद्योग फुकट आहे. कारण आबासाहेबांनीं स्वातंत्र्यदेवीची केलेली कडकडीत तपश्चर्या केव्हांहि व्यर्थ जाणार नाहीं.—पहा तुझ्या दर्शनानं प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या अंतःकरणांत कर्तव्याची जागृति व्हावी म्हणून आकाशस्थ चंद्रमा

आपले धवल किरण तुझ्यावर टाकूं लागला. आतां तूं मला स्पष्ट दिसूं लागलास. बा भगव्या झेंड्या! असाच वातावरणांत फडकत रहा. तुझ्या मंगल दर्शनानं स्वकीयांच्या अंतःकरणांत कर्तव्यनिष्ठेच्या ऊर्मि उठूं दे. आणि परकीयांच्या अंतःकरणांत भीतीचा धडधडाट सुरू होऊं दे. ( पुढें चालत जाऊन ) ही पवित्र भूमी! आमरणांत अविश्रांत श्रम करून आबासाहेबांचा तेजस्वी देह इथं विश्रांति घेत आहे. त्यांच्या दिव्य समाधीचं मंगल दर्शन घेऊन आपण अंगिकारलेल्या कर्तव्याला लागूं. ( समाधीला वंदन करते ) आबासाहेब, ही आपली लाडकी कन्या राजकुंवर आपणास वंदन करीत आहे. मजवर आपली कृपादृष्टि असूं द्या. मी आतां मोठं अवघड कार्य हातीं घेऊन निघालें आहें. मला यशस्वी होण्याकरितां आशिर्वाद द्या. आपण माझा शिर्केकुलोत्पन्न वीराबरोबर विवाह केलात आणि आपल्या अंतिम ध्येयाच्या पूर्ततेकरतां त्या कुलाचा संबंध जोडलात. परंतु तो शिर्केकुलोत्पन्न पराक्रमी सिंह आज अभिमानशून्य झाला आहे. तो माझा पति—आपल्या ह्या लाडक्या कन्येचा पति—शिर्केकुलध्वंसक गणोजीराव शिर्के, स्वातंत्र्य देवीला—महाराष्ट्रभूमीला राजरुधीराभिषेक करून आपला निर्वंश करण्याची प्रतिज्ञा करून बाहेर पडला आहे. त्याला वळवून आणण्याकरतां मी जात आहें. मला आपला मंगल आशिर्वाद असावा. ( गुढघे टेंकून वंदन करते. मोरोपंत येतात. )

**मोरो०**—जा—शौर्यशालिनी जा. वीरकन्ये, यशस्वी हो जा! हे मंगल अदृश्य देवतानों! ह्या धैर्यशाली राजनंदिनीला शुभाशीर्वाद द्या.

**राजकुंवरः**—कोण?—पंत, ही राजकुंवर आपणास वंदन करीत आहे.

**मोरो०**—तुझं अंगीकृतकार्य यशस्वी होवो! राजकुंवर, तुझ्या ह्या अंगीकृत कार्यामुळं तुझ्या स्वर्गस्थ पित्याला—ह्या समाधीस्थ महापुरुषाला किती आनंद होत असेल म्हणून सांगूं? तूं गोब्राह्मण प्रतिपालक स्वराज्यसंस्थापकाची कन्या खरी! तथापि राजकुंवर, तूं अंगीकृन कार्याचं हातीं बांधलेलं कंकण फार कठीण आहे! पतीप्रेम आंधळं आहे,—तारुण्यांतील मोह उन्मादक आहे—पतिसौख्याची आठवण जाचक आहे; म्हणून—

**राजकुंवरः**—पंत, त्याविषयीं आपण बेफिकीर असा. माझ्या कर्तव्यच्युत पतीला अधोगतीच्या कुंडांतून बाहेर काढण्याकरितां मी पतिप्रेमाचा होम करण्यास तयार आहें. ( येसूबाई प्रवेश करते. )

**येसूबाई**:—नव्हे—प्रतिज्ञा केली आहे—पंत, ही येसूबाई आपणांला वंदन करते.

**मोरो०**—दीर्घायुषी भव ! तुमचा दोघींचा हा उत्साह पाहून मी कोणत्या शब्दांनीं तुमचं अभिनंदन करूं तेंच मला कळत नाहीं. तुम्हीं अबला असून आपल्या कर्तव्यजागृतीनं आम्हाला लाजवीत आहांत. मी मात्र खरा हतभागी आहें. मला तुमच्या कार्याला काडीइतकाहि हातभार लावतां येत नाहीं, हें माझं दुर्दैव !

**राजकुंवर**:—पंत, तुम्हीं कां वाईट वाटून घेतां ? तुम्हाला आतां विश्रांतिच हवी आहे. आबासाहेबांच्या बरोबर रात्रंदिवस खपून तुम्हीं हा अवाढव्य पसारा पसरला ! तुम्हाला किती श्रम झाले असतील याची आम्हांला कल्पना तरी होईल का ? तुम्हीं जो कार्यभार उचलला त्याच्या शतांश जरी आमच्या हातून कार्य झालं तरी आम्हीं स्वतःला धन्य मानूं !

**मोरो०**—राणीसाहेब, राजकुंवर तर ही चालली. आतां येथील सर्व जबाबदारी तुमच्या शिरावर आहे.

**राजकुंवर**:—आणि ती तर तिनं उचलली आहे. वहिनीनंदेखील प्रतिज्ञा केली आहे. आणि त्याप्रमाणं तिनं दादाकडून त्याचा शिक्का मोर्तब आपल्या स्वाधीन करून घेतला आहे.

**मोरो०**—त्याची प्रतीति म्हणजे माझी ही कारागृहांतून सुटका ! पण राणीसाहेब, महाराजांचा स्वभाव फार चमत्कारिक आहे. ते ज्याच्या संगतींत रहातील तसं वर्तन करतात; म्हणून त्यांना जपा.

**राजकुंवर**:—त्याचाहि बंदोबस्त केला आहे. ह्यापुढें प्रत्येक मोहीम दादा जातीनं करणार आणि त्याची सुरुवात उद्यांपासूनच होणार आहे—पण वहिनी तूं दादाला सोडून इथं कशाला आलीस ? आतां त्याला क्षणभरहि विसंबतां कामा नये.

**येसूबाई**:—ताईसाहेब, जीव रहात नाहीं; म्हणून तिकडे निद्रा लागली असं पाहून मी इकडे आलें. मी आतां तुम्हाला जास्त काय सांगूं ? माझी भीति व्यर्थ आहे, तरी पण तुम्हीं अशा एकट्याच पुरुष वेषांत इतक्या लांब जाणार, त्यांतून हा धामधुमीचा काळ ! तुम्हांला जर कोणी ओळखलं तर कोणता प्रसंग येईल ?

**राजकुंवर**:—वहिनी, पुन्हां तूं लागलीस शंका कुशंका काढायला ? मी

क्षत्रिय कन्या आहें. कोणतंहि संकट आलं तरी मी त्याला तोंड देईन ही खात्री असूं दे. आणि यदाकदाचित् तसा जरी प्रसंग आला तरी वहिनी, तुला हताश होण्याचं कारण नाहीं. महाराष्ट्रांतील कोणतीहि स्त्री तुझ्या हांकेला ओ देईल. प्रभूच्या कार्याकरितां देहदान करण्यास सज्ज झालेल्या स्त्रिया सर्व महाराष्ट्रभर पसरल्या आहेत याची तुला कल्पना नाहीं ! वहिनी, आबासाहेबांनीं प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनांत विलक्षण भावना उत्पन्न करून ठेवली आहे. इतकंच नव्हे तर आपल्या महाराष्ट्रांतील प्रत्येक पुरुष आणि प्रत्येक स्त्री अनभिषिक्त राजा—राणी आहे, अशी खात्री करून दिली आहे. मग तुला माझ्याकरितां भिण्याचं काय कारण आहे ? मला वाटेंत कोणी गिरफ्दार करून नेलं, किंवा कर्तव्य बजावीत असतां एक राजकुंवर नाहींशी झाली म्हणून तूं हताश होऊं नकोस.

**मोरोपंतः**—गोष्ट खरी आहे ! राणीसाहेब, राजकुंवर म्हणते ती गोष्ट अक्षरशहः खरी आहे. थोरल्या महाराजांनीं आपल्या पुत्रवत् पाळलेल्या प्रजेंत उत्पन्न केलेली भावना फार उच्च प्रतीची आहे.

**राजकुंवरः**—आतां मी जातें. पण तूं मात्र आपल्या कर्तव्यांत रतिभर देखील कच खाऊं नकोस. आतां माझा दादा—महाराष्ट्राची चाड बाळगणारा माझा दादा—आणि प्रसंगीं त्या दुष्ट कलुषाच्या नादानं बहकणारा माझा दादा—वहिनी, आतां तुझ्या हातीं दिला आहे !

**येसूबाईः**—ताईसाहेब, माझ्या प्रयत्नांत कसूर व्हायची नाहीं. राजदरबारांतील प्रत्येक काम मी आतां स्वतः पहाण्याचा निश्चय केला आहे.

**राजकुंवरः**—आतां येथील जबाबदारी तुझ्या शिरावर आहे. प्रसंग विशेषीं पंत तुला सल्ला मसलत देतील.

**मोरो०ः**—मोठया संतोषानं !

**राजकुंवरः**—मग चल तर आपण सर्वजण आबासाहेबांचा ह्या अंगीकृत कार्यांत आशिर्वाद घेऊं.

( सर्व समाधीपुढें वंदन करतात. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश चौथा

**स्थळः**—राजमहालाचा रस्ता.

**मल्हारीः**—( नेमाजीला ढकलीत आणतो. ) तुझ्याकडून मला सर्व गोष्टी कळल्याशिवाय मी तुला जिवंत सोडीत नाहीं, हें लक्षांत ठेव, बोल तूं महाराजांच्या महालावर टेहेळणी करीत होतास कीं नाहीं ?

**नेमाजीः**—ना—नाहीं—नाहीं—

**मल्हारीः**—खोटें बोलशील तर मुळापासून जीभ छाटून टाकीन.

**नेमाजीः**—नाहीं—नाहीं—मी खोटं बोलत नाहीं—मी—मी एक गरीब मनुष्य आहें.

**मल्हारीः**—तूं गरीब नाहींस पण गनिम मात्र आहेस! बोल—( मारतो. ) तूं महाराजांच्या महालावर टेहेळणी करीत होतास कीं नाहीं ? लवकर बोल.

**नेमाजीः**—नका—नका—सांगतों. होय—होय.

**मल्हारीः**—अस्सं ! आतां बोल लवकर. कां टेहेळणी करीत होतास ?

**नेमाजीः**—उगाच—उगाच—उगाच—मेलों—

**मल्हारीः**—थांब—इतक्यांतच मरत नाहींस. मला सर्व गोष्टी कळल्याशिवाय मी तुला मरूं देत नाहीं. हं—सांग झटपट. कां टेहेळणी करीत होतास !

**नेमाजीः**—सांगतों—सांगतों—पण कां उगाच मारतां हो ? ( स्वगत ) पण अद्यापि कविराज कसे येत नाहींत ? इतक्यांत ते आले नाहींत तर हा राक्षस माझा जीव घेईल. ( उघड ) आई—ई—माझा हात—दुखावला हो !

**मल्हारीः**—सांगतोस कीं, आतां खरोखरच हात मोडूं ?

**नेमाजीः**—ओय्—ओय्—ओय्—सांगतों—पण सांगितलं आणि तुम्हांला राग आला तर ?

**मल्हारीः**—मला राग आला तर ? मला कां राग येईल ?

**नेमाजीः**—तें तसंच वांगडं आहे. म्हणून म्हणतों, तुम्हांला राग यायचाच आणि राग आला म्हणजे कसं करायचं ? ( स्वगत ) आतां याला असंच फसवून पलायन केलं पाहिजे.

**मल्हारीः**—तूं आतां बऱ्या बोलानं सांगतोस कीं—

**नेमाजीः**—ठीक आहे. सांगतों. महाराज, आपणच लफडं करतां आणि उलट मलाच विचारतां काय ? वाः खासा न्याय ! अशानं तुमचंच मेथकुट चव्हाट्यावर येईल याचा कांहीं विचार केला काय ?

**मल्हारीः**—हरामखोरा! तूं असा चाळवाचाळव करतोस काय? ( मारतो. )

**नेमाजीः**—नाहीं—नाहीं—महाराज, सांगतों—ती आपल्या मागून कोण गेली? ( स्वगत ) अद्यापि कविराज कसे येत नाहींत बुवा?

**मल्हारीः**—माझ्या मागून कोण गेली?

**नेमाजीः**—तुम्हालाच माहीत!

**मल्हारीः**—मला माहीत?

**नेमाजीः**—होय. आणि तें मला माहीत व्हावं म्हणून मी टेहेळणी करीत होतों!

**मल्हारीः**—अरे बदमाष, मला फसवूं पहातोस काय?

**नेमाजीः**—आपणाला फसवील त्याला देव पाहून घेईल!

**मल्हारीः**—देव कशाला? मीच पाहून घेतों. पहा—( मारतो. )

**नेमाजीः**—अर्रर्र! तुम्हीं फार मारतां हो!

**मल्हारीः**—अद्यापि मारलें नाहीं. पण—

**नेमाजीः**—पण काय?—महाराज, तुम्ही मला कोण समजून मारतां हो!

**मल्हारीः**—तूं एक हलकट—बदमाष—हरामखोर समजून मारतों.(मारतो)

**नेमाजीः**—अर्रर्र! माझी—कंबर पिचली!—पडलों—मेलों—( खालीं पडतो. )

**मल्हारीः**—( लाथ मारून ) असा कांगावा केल्यानं मी तुला कधींहि सोडणार नाहीं. मला खरी गोष्ट कळलीच पाहिजे.

**नेमाजीः**—( एकदम उठून ) ते पहा पंडितराव आतां आले. त्यांनाच विचारा. ( कलुषा प्रवेश करतो. )

**कलुषाः**—नेमाजी, काय गडबड आहे?

**नेमाजीः**—( हात जोडून ) महाराज, मला न्याय पाहिजे. आणि मला न्याय मिळालाच पाहिजे. मी आपल्या हुकुमाप्रमाणं सरकारी कामाची अंमलबजावणी करीत असतां ह्या मनुष्यानं मला रोखून माझ्या सरकारी कामाचा बिघाड केला. हा अन्यायी आहे. याला शिक्षा ही झालीच पाहिजे. सांगा—याला कोणती शिक्षा करूं? ( हात चढवितो. )

**कलुषाः**—मल्हारी, हा काय प्रकार आहे?

**नेमाजीः**—( हात जोडून ) महाराज, मी सांगतों खरा प्रकार! हा मनुष्य दोषी आहे. अन्यायी आहे—यानें सरकारी –

**मल्हारीः**—चूप ! किती वटवट करतोस ?—कविराज, तुमच्या सांगण्या-प्रमाणं मी महाराजांच्या महालावर पहारा करीत असतां हा मूर्ख मनुष्य तिथं टेहेळणी करीत होता म्हणून संशयावरून मी याला पकडलं.

**कलुषाः**—असं काय ? एकंदरीनं तुम्हीं दोघेहि आपआपलीं नेमून दिलेलीं कामं योग्य रीतीनं बजावीत होतां हें ऐकून मला आनंद होत आहे. तुमची नोकरी मी विसरणार नाहीं. बरं मल्हारी, तूं तिथं काय काय गोष्टी पाहिल्यास ?

**मल्हारीः**—पुष्कळ गोष्टी पाहिल्या.

**कलुषाः**—आणि काय काय गोष्टी ऐकल्यास ?

**मल्हारीः**—पुष्कळ गोष्टी ऐकल्या.

**कलुषाः**—मग सांग पाहूं एक एक.

**मल्हारीः**—त्या मला सांगतां येत नाहींत.

**कलुषाः**—सांगतां येत नाहींत !–म्हणजे ?

**नेमाजीः**—( वेडावून ) म्हणजे ? सांगतां येत नाहीं म्हणजे ?

**कलुषाः**—( रागानें ) नेमाजी.

**नेमाजीः**—( हात जोडून ) सरकार.

**कलुषाः**—मल्हारी, तुला सांगतां येत नाहींत याचा अर्थ काय ?

**मल्हारीः**—याचा अर्थ कविराज, आपला सक्त हुकूम.

**कलुषाः**—माझा हुकूम ?

**मल्हारीः**—होय.

**कलुषाः**—तो कसा ? आणि असा हुकूम मी दिला केव्हां ?

**मल्हारीः**—मी नोकरीला राहिलों त्या दिवशीं.

**कलुषाः**—काय हुकूम दिला ?

**मल्हारीः**—मला डोळे असून पहायचं नाहीं.—कान असून ऐकायचं नाहीं आणि यदाकदाचित् माझ्या डोळ्यांनीं पाहिलं किंवा कानांनीं ऐकलं तरी तोंड असून बोलायचं नाहीं.

**कलुषाः**—( रागानें ) मग तूं तेथें जाऊन केलंस काय ?

**मल्हारीः**—पहाऱ्याचं काम ! आपण सांगितलेलं राजमहालावर पहारा करण्याचं काम कसं करूं–कां करूं अशी शंका मनांत न आणतां बिनचूक केलं.

**कलुषाः**—( स्वगत ) हा मनुष्य म्हणजे एक विक्षिप्त प्राणीच दिसतो ! अगदीं बिनचूक माझे दांत माझ्याच घशांत घातले ! असा मनुष्य जवळ ठेऊन काय उपयोग ?

**नेमाजीः**—अरे वारे पहारेकरी ! डोळे असून पाहिलं नाहींस, कान असून ऐकलं नाहींस, आणि तोंड असून आतां बोलत नाहींस. पण तुझ्या हातांनीं मात्र मघांपासून चांगलं काम केलं.

**मल्हारीः**—कां ! अद्यापि रग नाहीं वाटतं जिरली ?

**नेमाजीः**—जिरली बाबा जिरली ! हात जोडतों तुला—

**कलुषाः**—( स्वगत ) पण नको ! असा मनुष्य जवळ असल्यानं माझा फायदाच आहे. याच्याकडून माझीं कारस्थानं बाहेर फुटण्याची बिलकुल भीति नाहीं. ( उघड ) मल्हारी, तूं माझ्या आज्ञेबरहुकूम वागत आहेस हें पाहून मला फार संतोष झाला. जा—तुला नेमून दिलेल्या ह्याच कामगिरीवर जा. आणि उद्यां सकाळीं येऊनं मला भेट. ( मल्हारी मुजरा करून जातो ) बरं नेमाजी, तुझी काय खबर आहे ?

**नेमाजीः**—महाराज, माझी खबर फार मोठी आहे. पण ओय्–ओय्–य् महाराज, या तुमच्या डोळे, कान, तोंड नसलेल्या पहारेकऱ्यानं मला फार मारलं हो !

**कलुषाः**—त्याला हात होते म्हणून त्यानं तुला मारलं. कारण तूं पहिल्या प्रतीचा अजागळ आहेस. त्या सरळ मनुष्याबरोबर हुजत करण्याची तुला काय जरूरी ? बरं चल–आतां घरीं चल–मला प्रथम तुझी खबर ऐकूं दे. (जातात.)

---

## प्रवेश पांचवा

**स्थळः**—राजमहाल.

( पलंगावर संभाजी झोंपला आहे. मल्हारी पहारा करीत आहे. )

**मल्हारीः**—महाराजांच्या महालाचा दरवाजा उघडा ठेऊन राणीसाहेब, बाहेर गेल्या. वास्तविक त्यांनीं हें किती धाडस केलं आहे ? अशा वेळेचा फायदा घेऊन कलुषासारख्या एखाद्या दुष्ट मनुष्याचं कृष्ण कारस्थान सहज आंत शिरायचं ! पण मी इथं आतां पहाऱ्यावर आहें. राणीसाहेब आल्या म्हणजे त्यांची क्षमा मागून आपण बाहेर जावं. ( पुढें होऊन ) महाराजांना ही किती शांत झोंप लागली आहे. अहाहा ! तारेनं मला स्वामीभक्तीचा धडा शिकवितांना उच्चारलेला प्रत्येक शब्द आतां मला आठवतो. ‘ आमचा राजा ’

हे शब्द उच्चारतांना माझ्या मनांत आतां किती उच्च भावना उत्पन्न होतात. ' स्वतः प्रखर सूर्याचा ताप सहन करून, झंझावाताशीं झगडून, दुष्ट जगाचे आघात सोसून पत्रानं, पुष्पानं, फलानं आणि छायेनं लहान थोरांना आणि गरीब—श्रीमंतांना समतेनं संतुष्ट करणारा हा कल्पवृक्षच आहे ! ' हें तारेचं म्हणणं अगदीं अक्षरशः खरं आहे. आमच्या राजाच्या कृपछत्राखालीं आम्ही सर्व माणसं निर्भयपणें रहात नाहीं काय ? शत्रूपासून संरक्षण करून आमचं पुत्रवत् पालन करणाऱ्या आमच्या ह्या राजाकरतां आम्ही एकनिष्ठ प्रजेनं काय करूं नये ?—माझ्या आयुष्यांतील हा क्षण किती सुखाचा आहे ! रात्रंदिवस आमच्या सुखाकरितां तळमळणारा आमचा हा राजा सुखनिद्रा घेत असतां पहारा करण्यासारखं क्षुल्लक काम कां होईना, पण त्या निमित्तानं महाराजांच्या इतक्या जवळ राहून मला त्यांची अल्पशी सेवा करण्याची संधि मिळाली हें मी माझं भाग्य समजतों ( आवाज ऐकून ) दरवाजा वाजला; राणीसाहेब परत आल्या असं वाटतं. ( न्याहाळून पहातो ) राणीसाहेब खास नाहींत; मग ही कोण बरं लपत छपत इकडे येत आहे ? हं ! आलं लक्षांत !—ही तुळशी ! पण ही इतक्या रात्रीं राजमहालांत कां आली आहे ? खात्रीनं हें कांहीं तरी कलुषाचं कारस्थान आहे खास ! आतां इथंच लपून राहून ही काय करते तें पाहिलं पाहिजे. ( लपतो. हातांत मदिरापात्र घेतलेली तुळशी हळूच प्रवेश करते. )

**तुळशीः**—( स्वगत ) शेवटीं राजमहाल तर गांठला ! आतां इतके दिवस हृदयाशीं बाळगलेली माझ्या स्वर्गवासी प्रियपित्याच्या वधाबद्दल सुडाची प्रतिज्ञा आज शेवटास जाणार ! त्या कलुषाच्या म्हणण्याला रुकार देतांच माझं इच्छित कार्य किती लवकर आटोक्यांत आलं ! वास्तविक कलुषानं स्वतःचे दुष्ट हेतु साधून घेण्याकरतां मला हस्तक बनविलं. आणि मीहि त्याची हस्तक बनलें. पण कां ?—मूर्खा—मथुरेच्या भटा, ही तुळशी आजपर्यंत कोणाची तरी ताबेदार झाली आहे काय ? पण मी तुझी कां हस्तक झालें ? मूर्खा—तुला यांतील रहस्य काय कळणार आहे ?—संभाजी उद्यांपासून मोहिमेवर जाणार, हें कळल्यापासून माझं मन किती अस्वस्थ झालं होतं ! माझी प्रतिज्ञा शेवटास नेण्याचा दिवस लांबणीवर पडतो कीं काय अशी मला भीति पडली होती. पण कलुषानं पुनः हा योगायोग जुळवून आणला. रात्रीं त्याच्या घरीं घडलेल्या गोष्टींबद्दल येसूबाईनं आणि त्या राजकुंवर पोरीनं त्याच्या विरुद्ध संभाजीची कानउघाडणी केली, असं कळतांच त्या चोब्याचं धाबं दणाणलं—आणि

तेवढ्याकरितांच मी संभाजीला पुनः मोहिनी घालावी म्हणून त्यानं माझी मनधरणी सुरू केली. मी इकडे आलें ! डोळयांत तेल घालून बसलेली संधि मला आज मिळाली ! आतां मी कलुषानं केलेल्या मनधरणीप्रमाणं त्यानं दिलेलं हें मदिरापात्र पुढें करून संभाजीवर मोहिनीअस्त्र टाकायचं किंवा स्वर्गस्थ पित्याच्या सुडाकरतां रात्रंदिवस हृदयाशीं बाळगलेलं हें शस्त्र ह्या दुष्टाच्या छाताडांत खुपसायचं, हा प्रश्न माझा आहे. आतां मला कलुषाशीं काय कर्तव्य आहे ? माझं सुडाचं कार्य आटोपलं म्हणजे झालं ! याबेळीं येसूबाई महालांत नाहीं, हें एक सुचिन्हच म्हणायचं ! ( पलंगाकडे पाहून ) संभाजीला यावेळीं शांत झोंप लागली आहे. पण माझ्या मनाला शांति कुठं आहे ? दुष्टा, माझ्या पित्याला कुस्तींत कपटानं मारून आपल्या शक्तीची घमेंड दाखविलीस काय ? पण ही तुळशी आतां तुझी घमेंड जिरविणार. माझ्या पित्याच्या सुडासाठीं दुष्टा, तूं माझ्या शस्त्राच्या आटोक्यांत यावंस म्हणून मी काल रात्रीं मदिरेच्या मोहांत तुझी विषयवासना प्रदीप्त करून माझा देह मी भ्रष्टवून घेतला. पण सुडाकरितां तळमळणारं माझं हें मन मात्र भ्रष्ट होऊं दिलं नाहीं. माझ्या मनाची ही तळमळ शांत होण्याकरतां हा खंजीर, संभाजीराजा ! आतां तुझ्या छातींत मी भोंसकणार ! दुष्टा तयार हो ! ( पदर खोंचते. ) माझ्या स्वर्गवासी पित्या, तुझ्या वधाचा सूड घेण्याकरतां ही तुझी लाडकी तुळशी तयार झाली आहे पहा. आणि संभाजीच्या छाताडांत खुपसून बाहेर काढलेला—त्याच्या लाल भडक रक्तानं भरलेला हा खंजीर पाहून तूं शांत हो. ( पुढें जाऊं लागते. )

**मल्हारीः**—( पुढें होतो ) थांब—( तुळशी दचकते व खंजीर लपवते. ) तुळशी, आल्या वाटेनं मुकाट्यानं परत जा.

**तुळशीः**—तुझ्या सांगण्यानं परत जाणारी ही तुळशी नव्हे. तूं कोण आहेस ? पहारा करणारा दीडदमडीचा नोकर ! तुला या महाराजांच्या आवडत्या तुळशीला अटकाव करण्याचा अधिकार काय ?

**मल्हारीः**—अधिकार आहे म्हणूनच अटकाव करतों व येथून मुकाट्यानं बाहेर जाण्यास सांगतों.

**तुळशीः**—माझ्या कामांत ढवळाढवळ करण्याची तुला जरूरी नाहीं. महाराजांच्या जवळ माझं फार निकडीचं आणि महत्वाचं काम आहे. मला अटकाव करूं नकोस.

**मल्हारीः**—तुझं काम वाटेल तितकं निकडीचं आणि महत्त्वाचं असलं तरी मी तुला आंत जाऊं देणार नाहीं.

**तुळशीः**—पहा विचार कर. पुन्हा सांगतें माझं काम अत्यंत निकडीचं आहे. हें काम किती महत्त्वाचं आहे, हें मला सांगतां यावयाचं नाहीं. परंतु माझ्या कामाचा आणि मृत्यूचा निकट संबंध आहे, यावरून माझ्या कामाचं महत्त्व जाणून तूं मला मुकाट्यानं आंत जाऊं दे.

**मल्हारीः**—तुळशी, तुला एक वेळ सांगितलं. तुला अटकाव करण्यांत महाराजांचा कोप होऊन प्रत्यक्ष मृत्यु जरी माझ्या वाट्याला आला तरी चालेल परंतु तुला मी एक पाऊलहि आंत टाकूं देणार नाहीं. तुझं काल रात्रीचं सर्व चरित्र मी डोळ्यांनीं पाहिलं आहे. तेव्हां इथं येण्यांत तुझा हेतू चांगला नाहीं म्हणून मी तुला आत जाऊं देणार नाहीं. जा—आलीस तशी परत चालती हो.

**तुळशीः**—माझ्या हेतूशीं तुला काय कर्तव्य आहे ? मी महाराजांची आवडती तुळशी आहें. महाराजांनीं मला आपली म्हटलं आहे. माझ्या हेतू-बद्दल शंका घेतोस ?

**मल्हारीः**—तुला महाराजांनीं ‘ आपली ’ म्हटलं नाहीं; आणि ‘ आव-डती ’ हि म्हटलं नाहीं ! तुझ्या हातांतील त्या मदिरापात्रानं रात्रीं महाराजांना मोहिनी घालून महाराजांकडून तसं वदवलं असेल. परंतु ह्या गोष्टीचा इथं निरर्थक खल करण्यापेक्षां महाराजांनीं अग्नि-ब्राह्मणांसमक्ष जिला आपली म्हटलं आहे, त्या राणीसाहेब आतां इतक्यांत परत येतील आणि त्याच हा महाराजांच्या मालकीचा प्रश्न सोडवतील.

**तुळशीः**—मूर्खा, तूं हें काय आरंभलं आहेस ? राणीसाहेब येण्यापूर्वीच महाराजांजवळ असलेलं माझं निकडीचं काम झालं पाहिजे. नाहीं तर मोठा घात होईल. चल. दूर हो. मला जाऊं दे—

**मल्हारीः**—तुला आंत जाऊं देण्यापेक्षां तुझं जर खरोखरच निकडीचं काम असेल तर मी स्वतः पुढं होऊन महाराजांना उठवतों, ( जाऊं लागतो. )

**तुळशीः**—( स्वगत ) आतां प्रथम ह्याचा कांटा काढल्याशिवाय माझा मार्ग मोकळा होणार नाहीं. ( खंजीर उपसून त्याच्या अंगावर धांवते. )

**मल्हारीः**—( तलवार उपसून ) तुळशी, सांभाळ ! एक पाऊल पुढं टाकशील तर तुझ्या या मायावी कोमल शरीराचा तुकडा पडेल. ( संभाजी उठतो. )

**संभाजीः**—कोण तुळशी ?—तूं इथं कशी आलीस ?

**तुळशीः**—मी—कशी आलें ? ( खंजीर लपवते, संभाजी पहातो. ) पण प्रथम ह्या दीड दमडीच्या मनुष्याला बाहेर घालवून द्या.

**संभाजीः**—कोणता मनुष्य ?—( मल्हारीस ) जा—( मल्हारी मुकाट्यानें जातो ) आतां सांग तूं कां आलीस ?

**तुळशीः**—आतां मी महाराजांच्या जवळ मुळींच बोलायची नाहीं.

( मुरका मारून दूर उभी रहाते. )

**संभाजीः**—( स्वगत ) ह्या सुंदरीच्या ठिकाणीं वसत असलेलं हें लावण्य मला किती जोरानं आपल्या जवळ आकर्षण करून घेत आहे. काल रात्रींच्या—एका दिवसाच्या परिचयांत हिनं माझ्या हृदयांत माझ्या नकळत आपलं निवासस्थान करून ठेवलं असेल काय ? मग त्याशिवाय ही नंदनवनाची लावण्यलतिका आपल्या अवर्णनीय तेजस्वितेनं चमकत चमकत सलज्ज मुद्रेनें मंदहास्य करीत येथें कां आली असेल ? ही अत्यंत तेजस्वी अशी सौंदर्याची मूर्तिमंत पुतळी कोणाला मोहून टाकणार नाहीं ? ही सुंदरी माझ्या रंगमहालांत माझ्या अगदीं सान्निध्याला आल्यावर माझी चित्तवृत्ति चळल्याशिवाय राहील काय ?—ज्या विधात्यानं अत्यंत श्रेष्ठ कौशल्य खर्च करून ह्या सुंदरीला हें अनुपम रूप दिलं, त्याबद्दल त्याला धन्यवादच दिले पाहिजेत. या वेळच्या हिच्या डोळ्यांतील विलक्षण तेजानं आणि हिच्या गालावरील आकर्षण करणाऱ्या गुलाबी लालीनं माझं हृदय अधिकच विव्हळ करून टाकलं आहे. माझं मन या वेळीं अगदींच वेडावून गेलं आहे. मी या वेळीं या लावण्यमय अप्सरेला आपल्या बाहूपाशांत बद्ध करून हृदयाजवळ आदरानं जवळ केलं नाहीं तर नियंत्याच्या एका हृदयंगम सुंदर वस्तूचा अनादर केल्यासारखं होईल. ( उघड ) तुळशी—

**तुळशीः**—इतका वेळ इतकं बारीक निरीक्षण कसलं चाललं होतं ?

**संभाजीः**—तुझ्या सौंदर्याचं.

**तुळशीः**—कांहीं तरी बोलतां झालं ! मी इतकी का सुंदर आहें ?

**संभाजीः**—तें तुझ्या नेत्रांनीं तुला कसं दिसणार ? सुंदरी, तूं खरोखरच एक स्वर्गांगना आहेस.

**तुळशीः**—अबब्बब् ! महाराज, माझ्या सौंदर्याच्या वर्णनांत तुम्हीं मला स्वर्गांत फेंकून दिलंत ! तेथून मी खालीं पडलें तर माझ्या गरीब देहाचा चकाचूर होईल. पण महाराज, असं किती वेळ उभं राहायचं ? मंचकावर यायचंना ?

**संभाजीः**—पण तुळशी, तूं माझ्याशीं अशी प्रतारणा करणं चांगलं का ?

**तुळशी**:—मी प्रतारणा केली ? महाराज, आपण हें काय बोलतां ? ही तुळशी आपणाशीं केव्हां तरी प्रतारणा करील का ?

**संभाजी**:—मग मघांशीं तूं तें पदराखालीं काय लपवलंस ?

**तुळशी**:—कुठं ?—केव्हां—छे ! महाराज, आपला कांहीं तरी गैरसमज झाला आहे—हं—आतां आलं लक्षांत ! मी तें—( हंसून ) बाई—बाई—बाई—आपला स्वभाव किती तरी संशयी हा !—पण महाराज, आपणाकरतां मुद्दाम देवीचा प्रसाद आणला आहे. मी कीं नाहीं महाराज, आपल्या हातानं हा तुम्हाला देणार. ( मदिरा ओतते. )

**संभाजी**:—आणि मी तो घेणार—( ती पात्र पुढें करते ) पण तें काय लपवलं आहेस तें कळल्याशिवाय मात्र नाहीं.

**तुळशी**:—असं काय बरं करायचं महाराज ? हा हट्ट नाहीं गडे चांगला ! घ्यायचं ना ?—माझ्या हातून घ्यायचं हें ! काय ? ही तुळशी आपली ना !

**संभाजी**:—तुळशी जर माझी असेल तर ती माझ्याशीं अशी प्रतारणा करणार नाहीं.

**तुळशी**:—महाराज, मी खरं सांगितलं असून असा काय बरं हट्ट घ्यायचा ! ( संभाजी स्तब्ध रहातो )—आतां मी काय करूं ? देवा—( डोळ्याला पदर लावून ) काय हा माझ्यावर प्रसंग आणलास ?—महाराजांची मी कशी खात्री करूं ?

**संभाजी**:—तें काय लपवलंस तें दाखवून ! तुळशी, तूं आतां मजपासून अशी कोणती गोष्ट लपवूं इच्छितेस ? काल रात्रीं तुझा सगळा देह ह्या संभाजीपुढें उघडा झाला असतां आतां लपविण्यासारखी कोणती वस्तू तुझ्याजवळ राहिली आहे ?

**तुळशी**:—महाराज, आतां ह्या दीन दासीची किती थट्टा करावयाची ?—माझ्या सख्या !—आपल्या सुखाचा एकेक क्षण कां व्यर्थ घालवतां ? चला गडे मंचकावर—( हात धरून ओढूं लागते ) किती हा हट्ट !

**संभाजी**:—तुळशी, सर्व जग मला हट्टी—हूड—हेखेखोर म्हणतं. आणि तूंहि कदाचित् तसं ऐकलं असशील पण आतां तुला त्याची प्रत्यक्ष प्रतीति दाखवतों. तूं तें काय लपवलं आहेस तें दाखविल्याशिवाय मी ह्या जागेवरून एक केंसभरहि हालणार नाहीं.

**तुळशी**:—महाराज, तुम्हांला नाहीं ना माझी दया येत ? देवा—

( डोळ्याला पदर लावून ) मी ह्या प्रेमाच्या सौद्यांत फसलें कारे ? तुळशी—हे दुर्दैवी तुळशी ! तूं खरी हतभागी आहेस. ( कपाळावर हात मारून घेते ) तुझ्या नशिबीं सुखच नाहीं ! महाराज—

**संभाजीः**—तुळशी, संभाजी हट्टी आहे हें विसरूं नकोस.

**तुळशीः**—मग नाहीं ना माझी करुणा येत ?

**संभाजीः**—मी एकदां सांगितलं.

**तुळशीः**—ठीक आहे. ( एकदम खंजीर काढून ) मग दुष्टा, मीच तुझा हट्ट पुरवितें—( अंगावर धांवून जाते. संभाजी एकदम तिचा हात धरतो. )

**संभाजीः**—एकूण तूं दिसत आहेस, तशी नाहींस तर ?

**तुळशीः**—चांडाळा, माझ्या प्रिय पित्याचा तूं कपटानं खून केलास, तो मी विसरलें नाहीं. तुझा सूड उगवण्याकरितां मी प्रेमाचं हें लटकं पांघरूण घेतलं आणि हे विषयांध राजा, तूं ह्या माझ्या वेषांतराला फसलास !

**संभाजीः**—हे मायारूपिणी तुळशी, तुला हें अनुपम रूप, कोमल शरीर, आणि मनोहर सौंदर्य दिल्याबद्दल थोड्या वेळापूर्वी मीं त्या विधात्याला धन्यवाद दिले. त्याच विधात्यानें तुला हें राक्षसी हृदय दिलेलं पाहून मला आतां त्याची कींव येऊं लागली आहे.— जा—ह्या संभाजीचा सूड उगविण्याचा भ्रामक नाद सोडून दे. मी तुझ्या अबलत्वाकडे पाहून तुला सोडून देतों. जा—( तिला जोरानें ढकलतो. ती तितक्याच जोरानें पुनः झडप घालते. )

**तुळशीः**—दुष्टा, तुझा सूड उगवल्याशिवाय ही तुळशी—( खंजीर मारते तोच खंजीर संभाजीच्या आघातामुळें तिच्या छातींत जातो. रक्तस्राव होऊन ती मरून धाडकन् खालीं पडते. )

**संभाजीः**—स्वतःच्या हातानेंच मेली ! ( तिच्याकडे क्षणभर पाहून ) हा अकल्पित प्रकार पाहून माझ्या हृदयाला एक प्रकारचा विलक्षण चरका बसला ! आतां माझ्या मनांत लज्जा, भीति, क्रोध असे अनेक विकार एकदम उत्पन्न झाले आहेत. शिव ! शिव ! तुळशीसारख्या मनस्वी दुराचारी, बेताल होऊन गेलेल्या आणि स्वैर वर्तनानं वागणाऱ्या खुनशी तरुणीच्या मोहपाशांत मी सांपडलों होतों. धिःकार असो मला ! ( येसूबाई प्रवेश करते. )

**येसूबाईः**—( आश्चर्यानें ) महाराज, हें काय ?

**संभाजीः**—( खालीं पहात ) राणीसाहेब, मी आपला अपराधी आहें.

---

# अंक चौथा

## प्रवेश पहिला

### स्थळः— जंगल.

**नेमाजीः**—( इकडे तिकडे पहात प्रवेश करून ) सुटलों! काळाच्या जबडयांतून मोठ्या मुष्किलीनं सुटून येथवर तर येऊन पोहोंचलों! आतां एकदां महाराजांचा विश्रांतीचा तळ गांठला कीं जिंकलें! इथं जवळपास कवीराजानं राहुटया उभारून महाराजांच्या विश्रांतीची व्यवस्था केली आहे, तें स्थळ आतां हुडकून काढलं कीं मिळवलं? ( थांबून ) अबब्! कोण तो भयंकर प्रसंग! आठवण झाली कीं सर्वांगाला कसा दरदरून घाम सुटतो. ह्या संभाजीची छाती म्हणजे दगड आहे कीं लोखंड आहे? त्याला निधड्या छातीचा असं लोकांनीं म्हणतांना मी आजपर्यंत कानांनीं फक्त ऐकत होतों. परंतु आज मला त्याची साक्ष पटली. एक नव्हे—दोन नव्हे तीन भले मोठे हत्तीसारखे वाघ एकामागून एक त्या पठ्यानं उघडया छातीवर घेऊन कापडाप्रमाणं त्यांचे जबडे सहज किं हो फाडून टाकले! अरे बापरे! कोण तें विलक्षण साहस! आतां ह्या पांच सहा वर्षें सतत चाललेल्या युद्धांत हा संभाजी शत्रूकडल्या लोकांना काळासारखा वाटत असेल यांत शंकाच नाहीं. ही या प्राण्याची अजस्त्र शक्ति कुणीकडे आणि आम्ही कुणीकडे? मघां शिकारीच्यावेळीं जंगलांत शिरतांनांच वाघाची एक आरोळी माझ्या कानीं आली. मग काय विचारतां? एकाद्या मोडलेल्या केळीप्रमाणं मीं जागच्या जागींच कोसळून पडलों. पण दुःखांत सुख कीं त्या माझ्या भेकडपणाला जवळपास कोणी साक्षीदार मात्र नव्हतं.

**मल्हारीः**—( प्रवेश करून ) पण मी तुझ्या ह्या कबुली जबाबाला मात्र साक्षीदार आहें.

**नेमाजीः**—( स्वगत ) ऐकलं वाटतं यानं! पण आतां जरा जोरांतच घेतलं पाहिजे. ( उघड ) कोण मल्हारराव, आज फार वर्षांनीं आपली भेट होत आहे म्हणायची?

**मल्हारीः**—होय. पुष्कळ वर्षांनीं भेट होत आहे खरी ! गेलीं पांच सहा वर्षें मोठीं धुमाकुळीचीं गेलीं. तुम्हीं गेलां तिकडे भडोच्याकडे आणि आम्हीं आलों इकडे बऱ्हाणपुराकडे ! पण कांय हो नेमाजीराव, तुम्हीं म्हणे तिथं बरीच शर्थीची तरवार गाजवून आलां.

**नेमाजीः**—चाललंच आहे. आम्हीं काय म्हणा ! आहे ही सर्व महाराजांच्या पायांची पुण्याई आहे; तुम्हां आम्हां कडूनहो काय होत आहे ?

**मल्हारीः**—असं कसं म्हणतां ? मी तर असं ऐकलं कीं, हंबीरराव लढाईत कामास आल्यावर कांहीं दिवस तुम्हींच शत्रुपुढं सारखे चमकत होतां ?

**नेमाजीः**—असंच कांहीं नाहीं ! पण—काय सांगूं तुम्हाला मल्हारराव, तो संताजी घोरपड्या आला मधेंच बिब्बा घालायला ! नाहीं तर सेनापतीचं पदच मला मिळायचं !

**मल्हारीः**—( स्वगत ) काय लेकाचा फुशारकी मारतो आहे पहा ?

**नेमाजीः**—तरी पण आपले महाराज खरे गुणग्राहक ! त्यांनीं माझी कामगिरी सर्व लक्षांत आणून माझा पेशा आतां बराच वाढविला आहे.

**मल्हारीः**—मोठे भाग्यवान म्हणायाचे तुम्हीं ! नाहीं तर आम्हीं पहा ! आहों त्याच स्थितींत अद्यापि खिचपत पडलों आहोंत.

**नेमाजीः**—अरेरे ! मल्हारराव, तुमच्याबद्दल मला फार वाईट वाटतं !

**मल्हारीः**—करायचं काय त्याला ! असतो एखाद्याच्या सद्दीचा जोर पण काय हो नेमाजीराव, तुम्हीं भडोचास फार लूट मिळवली ही गोष्ट खरी का ?

**नेमाजीः**—लूट ! अहो, गांवच्या गांव जाळून लूटून उध्वस्त करून टाकले. आहांत कुठं ?

**मल्हारीः**—असेल—असेल—कारण अलीकडे तुमच्या पराक्रमाच्या गोष्टी पोंवाड्यांतूनहि ऐकूं येऊं लागल्या आहेत.

**नेमाजीः**—खरं कीं काय ? पण मल्हारराव, हें बुवा फार झालं ! आमच्या पेक्षां महाराजांचेच पोवाडे गायले पाहिजेत. कारण त्यांची गोष्ट कुठं ? वाटेल तशा बिकट संकटांत त्यांची वाघासारखी पहिली उडी असायची !

**मल्हारीः**—त्यांची गोष्ट कशाला ? पण नेमाजीराव, तुम्हीं शिकार सोडून इकडे कुणीकडे ?—एखाद्या वाघाची उडी चूकवून तर इकडे आलां नाहींत ना ?

**नेमाजीः**—काय म्हटलंत ?—तुम्ही मला भित्रा समजतां वाटतं ? अहो, पहिला वाघ तर मीच अंगावर घेतला होता. पण महाराज मधें आल्यामुळं माझा नाइलाज झाला. हा नेमाजी तुमच्यासारखा कविराजाच्या देवडीवर रात्रंदिवस माशा मारीत बसणारा पहारेकरी नाहीं ! हा मर्द गडी शत्रूला समोरासमोर घेऊन त्याच्या छातीवर पाय देऊन केव्हां पलीकडे जाईल हें तुमच्यासारख्या नामर्दांना कळणारहि नाहीं.

**मल्हारीः**—अहांत खरे तसे शूर वीर ! ( दूर पाहून ) अरे पण तें काय ?

**नेमाजीः**—( घाबरून ) कुठं ?

**मल्हारीः**—महाराजांच्या तावडींतून सुटलेला हा वाघच इकडं येत आहे.

**नेमाजीः**—कोण–वाघ–अरे बापरे ! आतां माझी धडगत नाहीं ( बसतो. )

**मल्हारीः**—आला वाटतं पुढं, अहो ! मर्द वीर, व्हा कीं आतां पुढं. तो पहा जवळ येत चालला. आतां तुम्हीं शत्रूच्या छातीवर पाय देऊन जा पलीकडं आणि माशा मारणारे आम्ही नामर्द पहारेकरी जातों पळून इकडं ( जाऊं लागतो ) आतां संभाळा तो वाघोबा—पहा आला—

**नेमाजीः**—अबूबू—मेलों ! अहो मल्हारराव, ( त्याचा पदर धरतो ) तुम्हाला मी शरण आहें. मला असा व्याघ्रमुखांत टाकून जाऊं नका हो ! तो मला फाडफाडून कच्चाच खाईल हो !

**मल्हारीः**—मग त्याला शिजवून खायला सांगा !

**नेमाजीः**—नको—नको—मल्हारराव, ( पाय धरून ) मी तुमचे चरण—धरले आहेत मला मरण देऊं नका.

**मल्हारीः**—कां—आतां करशीऽ का कधीं बढाई ?

**नेमाजीः**—( तोंडांत मारून घेऊन ) नाहीं—नाहीं चुकलों—

**मल्हारीः**—पूर्वीची ओळख विसरला होतास काय ?

**नेमाजीः**—( हात जोडून ) नाहीं—नाहीं—

**मल्हारीः**—रहा तर असा पुढें उभा. आणि मी विचारतों त्या प्रश्नांचीं सरळ उत्तरें दे. आणि कपट करशील तर त्या पलीकडच्या वाघाच्या गुहेपुढं झाडाला बांधून ठेवून मी चालता होईन.

**नेमाजीः**—नका—नका ! तुम्हीं विचाराल तें मी सर्व खरं सांगतों. पण मला ह्या भयंकर जंगलांत एकटे टाकून जाऊं नका. घरीं माझीं गरीब बिचारीं बायको—मुलें उघडीं पडतील त्यांची करूणा येऊं द्या तुम्हांला.

**मल्हारीः**—हात जोड आणि खरं सांगेन अशी महाराजांच्या पवित्र चरणाची शपथ वहा.

**नेमाजीः**—( हात जोडून ) महाराजांच्या पवित्र चरणाची शपथ घेऊन सांगतों, मी खरं सांगेन.

**मल्हारीः**—महाराज, मोहीम करण्यांत गुंतले असतां येथें तुझ्या त्या चांडाळ धन्यानं—दुष्ट कविराजानं काय काय कारस्थानं रचून ठेवलीं आहेत ?

**नेमाजीः**—मला त्याची काडीइतकी देखील माहिती नाहीं. महाराज जंजिऱ्याहून परत येऊन विजापुरच्या स्वारीला निघाले तेव्हांच मी कविराजाची नोकरी सोडली.

**मल्हारीः**—मग आतां कविराजाबरोबर ह्या महाराजांच्या शिकारस्वारींत कसा आलास ? कपट करतोस काय ?

**नेमाजीः**—नाहीं—मी मुळींच कपट करीत नाहीं. माझं प्रथम सर्व ऐकून तर घ्या.

**मल्हारीः**—सांग—सांग. काय खरी हकीकत आहे ती मला लवकर कळूं दे.

**नेमाजीः**—मी कविराजाची नोकरी सोडून सूर्याजी पिसाळ नाइकांकडे नोकरी धरली आहे. त्यांच्याकडे कांहीं महिन्यांपूर्वी मोंगलाचा भोलानाथ नांवाचा गुप्त हेर आला होता. त्याला आमच्या नाइकसाहेबांनीं गडाचा गुप्त भेद सांगितला नाहीं. परंतु नेम काय सांगावा ? द्रव्याच्या राशीकडे पाहून, नाहीं तर बादशाहानं देऊं केलेल्या वाईच्या देशमुखीला भुलून आमचे नाइक-साहेब खाल्ल्या घरचे वासे मोजायला तयारहि व्हायचे.

**मल्हारीः**—पण त्या तुझ्या निमकहराम नाइकानं भेद दिला नसेल कशावरून ?

**नेमाजीः**—त्याविषयीं तुम्हीं काळजी करूं नका. आमच्या बाईसाहेब डोळ्यांत तेल घालून नवऱ्यावर पाळत ठेवीत आहेत. गडाचा गुप्त भेद काढ-ण्याकरितां गुप्त हेर आपल्या घरीं आला आहे, असें कळतांच बाईसाहेब माझ्याकडे येऊन तो गुप्त हेर परत जातांना त्याला ठार मारण्याची कामगिरी त्यांनीं मला सांगितली. पण—

**मल्हारीः**—तुम्हीं पडलांत मर्द वीर ! असेंच ना ? ( त्याची मान धरून ) काय ?

**नेमाजीः**—होय—होय—

**मल्हारीः**—नामर्द आहेस झालं ! कशाला मराठ्यांच्या जन्माला आलास ? तुझ्या सारखे षंढ आणि तुझ्या धन्यासारखे हमामखोर ह्या महाराष्ट्रभूमीला केवळ भार आहेत.

( राजकुंवर पुरुष वेषांत येते. )

**राजकुंवरः**—मित्रा, असा भार सहन करण्याची आर्यभूला आतां संवयच झाली आहे.

**मल्हारीः**—होय. महाराष्ट्रीयांच्या दुर्दैवानं असं झालं आहे खरं ! आपल्या महाराष्ट्र भूमातेच्या कुशींत जन्म घेऊन तिच्या अन्नाला विसरलेले असे कांहीं कुपुत्र हल्लीं शत्रूच्या भाकरीला लालचावले आहेत खरे !

**राजकुंवरः**—मित्रा, माझ्या दुःखावर असा डाग कां देतोस ?

**मल्हारीः**—( आश्चर्यानें ) कां बरं ? तुम्हाला कां वाईट वाटलं ? शत्रूच्या भाकरीला तुम्ही मिंधे आहांत कीं काय ?

**राजकुंवरः**—कोण मी ? अशी स्वप्नांतही शंका घेऊं नकोस.

**मल्हारीः**—मग तुम्हांला कां वाईट वाटलं ?

**राजकुंवरः**—( दीर्घ श्वास सोडून ) मित्रा, ती हकीगत फार मोठी आहे. आणि ती तुला केव्हां तरी सहज कळून येईल.

**नेमाजीः**—बरं मग मी आतां जातों. ( जाऊं लागतो. )

**मल्हारीः**—चाललास कुठं ? अद्यापि तुला मला पुष्कळ विचारावयाचं आहे. तूं आज शिकारस्वारींत कां आला होतास, तें नाहीं सांगितलंस ?

**नेमाजीः**—होय. तें राहिलं खरं ! मी आलों होतों गणोजी शिर्क्यांना पहायला—

**राजकुंवरः**—( आश्चर्यानें ) ते इकडे आले आहेत कीं काय ?

**नेमाजीः**—अशी मला बातमी लागली आहे.

**राजकुंवरः**—त्यांना भेटण्याचं कारण ?

**नेमाजीः**—कारण ! कारण—कांहीं नाहीं.

**मल्हारीः**—( एकदम ओरडून ) नेमाजी—

**नेमाजीः**—( हात जोडून ) सांगतों—सांगतों ! गणोजीरावांना महाराजांची माहिती देण्याचं मी वचन दिलं आहे. आणि त्याबद्दल—त्याबद्दल—

**मल्हारीः**—त्याबद्दल काय ? बोल पुढें !

**नेमाजीः**—ते मला भलं मोठं बक्षीस देणार आहेत.

**मल्हारीः**—अरे हरामखोरा, तुला बक्षिस पाहिजे काय? हें—घे. ( मारतो )

**नेमाजीः**—नको—नको—

**राजकुंवरः**—किती नीच मनुष्य आहेस तूं? आपल्या घरचा भेद शत्रूला देऊन तूं बक्षीस मिळवणार काय? शिव! शिव! थोरल्या महाराजांच्या वेळची ही महाराष्ट्रभूमि इतक्या लवकर कशी हीनकस झाली? आम्हां मराठ्यांत हें हरामखोरीचं पीक असंच सर्व महाराष्ट्रभर पिकलं असेल काय? ( तलवार पुढें करून रागानें ) हे हरामखोर नीचा, ही तलवार मराठ्याकरतां नाहीं म्हणून सुटलास. पण आतां ह्याच शस्त्राची शपथ वहा—असा स्वामिद्रोह पुनः करणार नाहीं अशी शपथ वहा.

**नेमाजीः**—( तलवारीवर हात ठेऊन ) असा स्वामिद्रोह यापुढें केव्हांहि करणार नाहीं आणि तो गुप्त हेर पुनः आला किंवा गणोजी शिर्के येथें आले तर धांवत येऊन प्रथम तुम्हाला वर्दी देईन.

**राजकुंवरः**—जा—आपल्या राजाची इमानं इतबारं नोकरी करून मिळणाऱ्या मीठभाकरीवर संतुष्ट रहा जा.—( ढकलून देतो. )

**नेमाजीः**—( मुजरा करून स्वगत ) आतां मात्र खरोखरच ह्या दोन मनुष्य रूपी वाघांच्या जबड्यांतून सुटलों. ( जातो ).

**राजकुंवरः**—मित्रा, आज इतकीं वर्षे मी ज्या गोष्टीच्या शोधांत कित्येक शहरें, गांवें, अरण्यें, पहाड आणि दऱ्याखोऱ्या पालथ्या घातल्या ती गोष्ट अचानक रीतीनं मला ह्या मनुष्याकडून कळली. योगायोग म्हणतात तो हा! आतां आपणाला कळलेल्या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तेव्हां एका गोष्टीकडे म्हणजे गणोजीराव शिर्क्यांकडे मी लक्ष पुरवतों आणि तूं सूर्याजी पिसाळावर नजर ठेव.

**मल्हारीः**—शिवाय या हरामखोर मनुष्याकडे डोळेझांक करून चालायचं नाहीं. कारण ह्या मनुष्यानं जरी आतां शपथ घेतली आहे तरी हा घात करण्यास कधीं प्रवृत्त होईल तें कळणार नाहीं.

**राजकुंवरः**—पण कायरे मित्रा, तुला तुझ्या तारेचा कांहीं शोधसमाचार कळला आहे का?

**मल्हारीः**—नाहीं. प्रथम जेव्हां महाराज दादजी देशपांड्याच्या बायकोला

सिध्याच्या हातून सोडविण्याकरितां तेथे चाल करून गेले त्यावेळीं निघतांना तारेला भेटावं अशी माझी इच्छा होती. परंतु प्रतिज्ञेमुळं तिला भेटण्यास माझं मन तयार होईना. पुढं पोर्तुगीझ लोकांची पुरी खोड मोडून महाराज भडोच शहरावर स्वारी करण्यास निघाले तेव्हां मीं पुनः तारेची चौकशी केली. परंतु सरनाइकांचा एकनिष्ठ सेवक म्हातारा शिलेदार मेल्यामुळं शेतवाडीची अव्यवस्था होऊं लागली म्हणून तारा आपल्या धाकट्या भावाला घेऊन इथंच पन्हाळाच्या स्वतःच्या शेतावर येऊन राहिली असं कळलं पुढं विजापुरास बादशाहा येऊन राहिल्यामुळं महाराजांच्या स्वारीला बिलकूल इकडे तिकडे होतां आलं नाहीं. परंतु विजापूर पडतांच, डफळे, माने, घाडगे, निंबाळकर हे सरदार बादशहानं काढून टाकल्यामुळं महाराजांना मिळाले. तेव्हां महाराजांनीं खानदेशावर स्वारी करून बऱ्हाणपूर काबीज केलं. या स्वारींत आम्ही सातमाता डोंगराच्या पायथ्यापर्यंत सतरा शहरें लुटलीं आणि पुढं—

**राजकुंवरः**—एकूण गेलीं सहा सात वर्षें महाराजांचं क्षात्रतेज विशेष चमकलं म्हणायचं !

**मल्हारीः**—महाराजांच्या क्षात्रतेजाबद्दल कोण शंका घेणार ? बादशहानं गोवळकोंड्याचीं राज्यें जिंकून महाराजांना सर्व बाजूंनीं घेरण्याचा विचार केला आहे; पण असा एकहि मोंगल सरदार पुढें होण्यास धजत नाहीं ! महाराजांनीं तर बादशाहाची पांचावर धारण बसविली आहे.

**राजकुंवरः**—मित्रा, या सर्व प्रसंगांत तुला महाराजांच्या सान्निध्यांत राहून त्यांची सेवा करण्याची संधि मिळाली.

**मल्हारीः**—पण अद्यापि त्यांचा प्रसाद मिळाला नाहीं आणि म्हणूनच तारेची भेट घेण्यास माझं मन माघार घेतं !

**राजकुंवरः**—पण तुझं मन तुला काय सांगतं ?

**मल्हारीः**—आज सहा वर्षें झालीं तिला एकदां भेटावं असं फार वाटतं पण प्रतिज्ञेमुळं मी अडलों आहे, वास्तविक आज महाराजांचा तळ तिच्या शेतवाडीजवळच पडला आहे. येथून मला तिची भेट घेण्याकरतां फार दूरहि जावयास नको. पण काय करणार ?

**राजकुंवरः**—( त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ) असा हताश होऊं नकोस. तुला तुझ्या मनाप्रमाणें लवकरच प्रभुंचा प्रसाद मिळेल. आणि तुझी इच्छा पूर्ण होईल. बरें मित्रा, आतां मी जातों शिवाय ती पहा महाराजांची स्वारी

शिकारीहून परत येत आहे. तूं आतां जा. ( दोघें रामराम करून जातात. शिकारीच्या वेषांत संभाजी, कलुषा आणि नेमाजी प्रवेश करतात. )

**संभाजीः**—आजची शिकार तर फार फार नामी झाली. कविराज, आतां थोडा वेळ आराम केला पाहिजे.

**कलुषाः**—महाराजांच्या आरामाची व्यवस्था इथं जवळच केली आहे.

**संभाजीः**—कविराज, हा आजूबाजूचा प्रदेश अत्यंत रमणीय दिसत आहे. इथं आपण उभे आहोंत या ठिकाणीं ह्या वृक्षांची छायाहि सुंदर पडली असून वाराहि मनोहर वहात आहे. याच ठिकाणीं थोडा वेळ आराम करावा अशी माझी इच्छा आहे.

**कलुषाः**—ठीक आहे. महाराजांची जशी इच्छा ! ( शाल आंथरतो. )

**संभाजीः**—( बसतो ) कवीराज, तो मुलगा कुठं आहे ? त्या मुलानं मोठ्या प्रयासानं मिळविलेली शिकार मी मध्येंच पुढें होऊन मारल्यामुळं त्याला मोठा राग आला. त्याची आतां समजूत केली पाहिजे. जा—त्याचा शोध करून त्याला इकडे घेऊन या. पण कविराज, मी कोण आहे हें मात्र त्याला कळूं देऊं नका. जा—

**कलुषाः**—( दूरवर पाहून ) महाराज, तो पहा मुलगा इथंच येत आहे. त्याच्या चालण्याच्या रोखांवरून तो रागांतच आहे असं वाटतं.

**संभाजीः**—मुलगा मोठा बाणेदार आहे. वाघावर त्याचं शरसांधन होण्यापूर्वींच मी त्या प्राण्याला एका फटक्यांत जमिनदोस्त केलं, त्यामुळं रागानं त्या मुलानं माझ्यावर वाघासारखीच उडी टाकली. त्यावेळची त्याची शिकारीची स्फूर्ति आणि त्याचा रागाचा आवेश पाहून मला त्याचं कौतुक वाटलं. त्या मुलाला सरकारी नोकरींत एखादी असामी देण्याचा मी विचार केला आहे.

( हातांत धनुष्य घेतलेला मानाजी प्रवेश करतो. )

**मानाजीः**—कुठं आहेत तुझे ते ऐत्या पिठावर रेघा ओढणारे बहाद्दर शिकारी ?

**कलुषाः**—कां बरं ? त्यांना काय विचारणार आहेस ?

**मानाजीः**—सकाळपासून मी जमविलेली शिकार बिघडविल्याबद्दल त्या राजेश्रीना जाब विचारणार !

**कलुषाः**—हँ !

**संभाजी:**—अरे मीच तो ! मी तर तुझी शिकार बिघडविली. आतां उत्तम मार्ग म्हणजे तूं ही फिर्याद घेऊन तुमच्या संभाजीमहाराजांजवळ जा.

**मानाजी:**—कशाला ? अशी क्षुल्लक गोष्ट महाराजांजवळ नेण्याची जरूरी काय ? अशा गोष्टींत मन घालायला आमचे महाराज रिकामे नाहींत समजलास ?

**संभाजी:**—मग अशा कोणत्या कामांत तुझे महाराज गुंतले आहेत ?

**मानाजी:**—आमचे महाराज कोणत्या पवित्र कामांत गुंतले आहेत त्याची कल्पना तुमच्यासारख्या दुसऱ्यांच्या श्रमावर श्रीमंति भोगणाऱ्या राजश्रींना काय होणार ?

**संभाजी:**—असं का ? पण आतां असं समज कीं, तूं तुझ्या महाराजां-पुढेंच उभा आहेस. तर मग तुला भीति नाहींका वाटणार ?

**मानाजी:**—भीति ! खऱ्याला भीति मुळींच नाहीं !

**संभाजी:**—पण तूं त्यांना विचारणार काय ?

**मानाजी:**—विचारायचं काय ? न्याय मागणार !

**संभाजी:**—मग कल्पना कर कीं, तुझी शिकार घेणारा तो मी अन्यायी संभाजी महाराजच आहें तेव्हां तूं माझ्यापुढं—तुझ्या संभाजी महाराजापुढं असाच धिटाईनं वागशील काय ?

**मानाजी:**—हो ! माझा पक्ष खरा आहे. तुम्हीच जर संभाजी महाराज असाल, तर आमचे महाराज म्हणून तुम्हाला मी प्रथम वंदन करीन आणि मग तुम्ही अन्यायी म्हणून तुमच्याच जवळ न्याय मागेन.

**संभाजी:**—शाबास ! ( त्याचा हात धरून ) तूं खरा मराठा आहेस. मुला, तुझ्यासारख्या खऱ्या मराठ्याला जवळ बसवून घेण्यांत ह्या संभाजीला नेहमीं भूषणच वाटतं ( त्याला जवळ बसवून ) कविराज या मुलाला आज-पासून तनखा सुरू करून याला चांगली असामी द्या.

**मानाजी:**—( उठून वंदन करितो ) महाराजांचा नकळत मजकडून उपमर्द झाला.

**संभाजी:**—आणि तोच माझ्या कृपेला कारण झाला. ( सेवकाकडे पाहून ) ह्या मुलाला त्याच्या घरीं सुरक्षित घेऊन जा. ( मानाजी वंदन करतो. )

**कलुषा:**—महाराजांना आज शिकारीचे विशेष श्रम झाले आहेत. यावेळीं तृषा शमनार्थ थोडं पेय—देवीचा प्रसाद घ्यावा अशी माझी विनंति आहे. ( नेमाजी मद्य पात्र पुढें करतो. )

**संभाजीः**—कविराज, हा तुमच्या देवीचा प्रसाद म्हणून मला त्याचा अनादर करतां येत नाहीं. शिवाय हें पेय पुढं आल्यावर त्याचा मोहहि मला सुटत नाहीं.

**कलुषाः**—हें पेय श्रम परिहार करण्यास फार चांगलं आहे. ( नेमाजीला खूण करतो तो मानाजीला घेऊन जातो. )

**संभाजीः**—म्हणूनच मी त्याचा स्वीकार करतों. ( पितो. )

**कलुषाः**—( हात जोडून क्षणभरानें ) महाराजांनीं आतां कांहीं वेळ ह्या मोहिमी बंद ठेऊन विश्राति घ्यावी. महाराजांना आतां विश्रांतीची फार आवश्यकता आहे.

**संभाजीः**—छेः ! कविराज, विश्रांति घेण्यासारखं माझ्या हातून असं अद्यापि एक तरी महत्त्वाचं कार्य झालं आहे का ?

**कलुषाः**—असं कां म्हणतां महाराज ? महत्त्वाचीं अशीं पुष्कळ कार्यें महाराजांच्या हातून घडलीं आहेत. महाराजांनीं स्वतः मोहीम करतांच प्रथम गोव्यांकडील मुलूख जाळून लुटून फस्त केला. भडोच शहर—

**संभाजीः**—त्यांत कसलं मी कार्य केलं ? नाहीं म्हणायला त्यांत मला समाधान झालं खरं ! ( पितो ) कारण आबासाहेब विजापुरकरांशीं युद्धांत गुंतले असतां इकडे पोर्तुगिझ लोकांनीं त्यांना जो त्रास दिला, त्याचं त्य पहिल्या मोहिमेंत मी सव्याज उसनं फेडून मात्र घेतलं. कविराज, रामसेजच्य संग्रामाची तुम्हाला कल्पना नाहीं ? ( पितो ) या संभाजीनं या संग्रामांत मोंगलांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं ! मुअज्जमच्या फौजेंत एकच आकांत उडवून त्याची अगदीं दुर्दशा करून सोडली.—मी बादशहाचा किती मुलूख जाळून पोळून बेचीराख करून टाकला असेल याची कल्पना आहे.

**कलुषाः**—महाराजांच्या शौर्याबद्दल आम्ही काय बोलायचं !

**संभाजीः**—हा औरंगजेब जातीनं आबासाहेबांच्या केव्हांच सपाट्यांत आला नव्हता. नाहीं तर महाराजांनीं त्याचं केव्हांच चंदन केलं असतं. पण आबासाहेबांचा हेतु हा संभाजी पुरा करणार. ( पितो ) मला ह्या पन्हाळ्यांत कोंडून धरण्याचा बादशहाचा विचार आहे. पण हें कपट मी चांगलं ओळखून आहें—बादशहा, तुझ्याबरोबरच तुझ्या बादशाहीचा उध्वंस करून हा संभाजी आसेतुहिमाचलपर्यंत एकछत्री मराठेशाही करणार. ( पितो. ) कविराज, हा तुमच्या देवीचा प्रसाद फार मधुर आहे—कविराज, आतां शिकार बस्स—झाली !—सेवकांना विश्रांति द्या—कविराज—( पितो )

**कलुषाः**—महाराजांनींहि आतां विश्रांति घ्यावी.

**संभाजीः**—आम्हीं आतां विश्रांति घे-णा-र (पडतो. कलुषा आणि नेमाजी यांच्या कानगोष्टी होतात.)

**कलुषाः**—महाराजांजवळ एक विनंति आहे. अशा जंगलांत उघड्यावर विश्रांति घेत पडण्यापेक्षां येथें जवळच एक झोंपडी आहे. त्या झोंपडींत एक वनसुंदरी आहे.

**संभाजीः**—वनसुंदरी आहे ? (चटकन् उठून बसतो.)

**कलुषाः**—आहेना नेमाजी ?

**नेमाजीः**—(हात जोडून) होय सरकार. आणि मघांचा तो मुलगा त्या वनसुंदरीचा भाऊच आहे.

**संभाजीः**—तो भाऊ आहे ? आणि ती वनसुंदरी आहे ?

**कलुषाः**—होय. तेथें गेल्यास त्या वनसुंदरीच्या सहवासांत महाराजांना पूर्ण आराम मिळेल.

**संभाजीः**—पूर्ण आराम मिळेल ? (एकदम उठतो) कुठं आहे ती वनसुंदरी ? कविराज-कुठें-कुठें-आहे-ती—

**कलुषाः**—येथं जवळच आहे महाराज.

**संभाजीः**—मला दाखवा—कविराज, सुंदरी दाखवा—वनसुंदरी—दाखवा—

**कलुषाः**—आज्ञा महाराज, चला दाखवितों. [जातात.]

---

## प्रवेश दुसरा

**स्थळः**—झोंपडीचा रस्ता.

(मानाजी प्रवेश करतो.)

**मानाजीः**—किती जलद मी आलों ! (मागें वळून पहात) अद्याप सरकारस्वारी बरीच मागें आहे. पण ही ताई कुठं दिसत नाहीं ती ? ताई—ए—ताई—ही ताई गेली तरी कुठं ? ताई-ताई—? आतां काय करावं ?—महाराज, इतक्यांत येतील. आणि ताई घरांत नाहीं ! आतां महाराजांच्या स्वागताची तयारी कशी होईल ? ताई-ए-ताई—

**तारा:**—( प्रवेश करून ) अरे काय ? मानाजी, अरे तूं सकाळपासून आहेस कुठं ?

**मानाजी:**—हा मी तुझ्या पुढं उभा आहे. पण ताई, तूं प्रथम तयारी कर.

**तारा:**—कसली ?

**मानाजी:**—स्वागताची.

**तारा:**—कोणाच्या ?

**मानाजी:**—महाराजांच्या.

**तारा:**—काय ? महाराजांच्या ?

**मानाजी:**—होय. महाराज आपल्याकडे येत आहेत. त्यांच्या स्वागताची तयारी कर. ताई—

**तारा:**— आश्चर्यानें ) महाराज—आपले महाराज येत आहेत ? मानाजी, तूं हें स्वप्नांत तर नाहीं ना बरळत !

**मानाजी:**—खरेंच सांगतों ताई—आपले महाराज खरोखरच इकडे येत आहेत ताई—

**तारा:**—( आनंदानें ) हें मी काय ऐकतें ? महाराज—आमचे महाराज —आमचे महाराष्ट्र प्रभु इकडे येत आहेत ? मानाजी खरंच कारे आपल्य प्रभूचे पवित्र चरण आपल्या झोंपडीला लागणार आहेत ?

**मानाजी:**—ताई, मी खोटें सांगेन असं का तुला वाटतं ?

**तारा:**—अहाहा ! मानाजी, आजचा हा किती भाग्याचा दिवस ! आज आपणाला आपल्या प्रभूचं दर्शन होईल. त्यांच्या पुण्यचरणस्पर्शानं आपली ही झोंपडी पुनित होईल, हा किती भाग्याचा दिवस ? मानाजी—

**मानाजी:**—ताई, तूं अशा रीतीनं बोलण्यांत वेळ घालविणार कीं काय ? तूं आंत चल. त्यांच्या स्वागताच्या तयारीला लागूं. ते आतां इतक्यांत येतील. चल—मग आंत तुला सर्व कांहीं सांगतों. चल—( जातात. नेमाजी प्रवेश करतो. )

**नेमाजी:**—याला म्हणतात नेमाजीचा नेम ! सूड उगवायला देखील अचुक नेम पाहिजे. ह्या मल्हारीचा आणि तारेचा नाजूक संबंध आहे, ही गोष्ट मला थोडया वेळापूर्वी त्या दोघांच्या भाषणावरून कळली. आणि त्याच वेळीं मला ही सूडाची कल्पना सुचली. महाराजांना ही शिकार तर दाखवून दिली ! आतां हा संभाजी दारूच्या निशेंत तिच्यावर हात टाकणार हें तर ठरलंच ! ती

एकदां भ्रष्ट झाली म्हणजे मल्हारीचा मी सूड उगविला! मला नामर्द म्हटलंस काय? ठीक आहे. मी जर नामर्द आहें तर मग आतां तुझ्या प्रेमपात्रावर संभाजीसारख्या मर्दाकडूनच घाला घालवितों आणि तुझ्या प्रेमाचा खून पाडतों!

( कलुषा प्रवेश करितो. )

**कलुषाः**—नेमाजी, कुठं आहे तें झोंपडं?

**नेमाजीः**—( बोट दाखवून ) हें काय तें झोंपडं.

**कलुषाः**—मग चल. महाराजांना प्रथम घेऊन येऊं ( जातात. )

---

## प्रवेश तिसरा

**स्थळः**—झोंपडी.

( तारा प्रवेश करते. )

**ताराः**—माझं चित्त अगदीं बावरून गेलं आहे. मघांपासून मी काय करतें तेंच माझं मला समजत नाहीं. मी वेडी तर झालें नाहीं ना? आतां महाराज येतील, त्यांचं कसं स्वागत करावयाचं तेंच मला अजून सुचत नाहीं,—महाराजांचें स्वागत मी कसं करूं? राजे लोकांचं स्वागत कसं करतात हें मला तरी काय माहीत?—आमचे महाराज आतां येतील. आमचे प्रभु आतां येतील. खरंच—खरंच आजचा दिवस खरोखरीच भाग्याचा आहे! ज्यांना आपल्या राजाचं — आपल्या प्रभूचं दर्शन होत असेल तीं सर्व माणसं भाग्याचीं खरीं! राजा म्हणजे साक्षात् विष्णूचा अवतार! त्याचं दर्शन घडायला पदरीं पुण्य असलं पाहिजे — पण आमचे प्रभु आल्यावर ते बसतील कशावर? वेडे तारे, तूं अशी भांबावून काय गेलीस?—महाराज आल्यावर त्यांना तूं उभं ठेवणार काय?—पण हे राजे लोक कशावर बरं बसत असतील?—मी त्यांना बसण्याकरितां काय बरं आंथरूं? ( एक दोन वस्त्रें उचलून लुगडें आंथरते. ) अरे! पण मी हें काय केलं? किती मी भ्रमिष्ट झालें आहें आज! ( आंतून गादी आणते व आंथरते. ) आमचे महाराष्ट्र प्रभु आतां या गादीवर बसतील. महाराजांच्या मंगल स्पर्शानं ही गादी आज पवित्र होणार. अहाहा! — पण महाराज अशा गादीवर बसतील काय? मघां मानाजीनं महाराजांना न ओळखतां त्यांचा उपमर्द केला म्हणून ते रागांत तर नसतीलना? नाहीं—नाहीं.

आमचे महाराज आपल्या लेंकरांवर रागावतील हें संभवतच नाहीं. ते आमचे प्रभु आहेत. ते आमचे राजे आहेत. पण ते आल्यावर मी त्यांच्याबरोबर काय बरं बोलूं ? मला त्यांच्या पुढं उभं रहाण्याचं धैर्य तरी होईल काय ? कां होणार नाहीं ? महाराज आमचे आहेत— ( संभाजी येतो. )

**संभाजीः**—होय. हा संभाजी तुझाच आहे. ( तारा दचकते व अधोवदन उभी राहते. ) ( स्वगत ) वनांत उगवलेलं हें एक फुल आहे. वनसुंदरी हें नांव हिला किती साजेसं आहे. ( उघड ) किती वेळ मला तिष्ठत उभं ठेवणार ? ( स्वगत ) ही सुंदरी मला पाहून भ्याली असेल काय ? ( उघड ) मला पाहून तुला भीति वाटली असं दिसतं.

**ताराः**—भीतीपासून आमचं रक्षण करणारे आपण ! तेव्हां महाराज आपली मला कशी भीति वाटेल ?

**संभाजीः**—मग तूं अशी स्तब्ध कां ?

**ताराः**—महाराजांच्या प्रत्यक्ष दर्शनानं माझं मन आनंदातिशयानं प्रथम गांगरून गेलं होतं. त्यांतून महाराज, आम्हीं रानांवनांत रहाणारीं जंगली माणसं ! आम्हांला महाराजांचं स्वागत कसं करायचं हें कोठून कळणार ? आम्ही जंगलांतलीं वेडीं माणसं !

**संभाजीः**—तूं वेडी नाहींस. दुसऱ्याला वेड लावणारी मात्र आहेस ! ( स्वगत ) हिचा हा मंजूळ स्वर, हिचं हें सौंदर्य मला आतां खास वेडच लावील !

**ताराः**—महाराजांनीं या गादीवर बसावं; म्हणजे महाराजांच्या पवित्र चरणांची थोडा वेळ सेवा करून ही तारा स्वतःला पुनित करून घेईल.

**संभाजीः**—तारे, तुझा जन्म सेवा करण्याकरितां नसून सेवा करून घेण्याकरितां आहे. ( बसतो ) तारे, तूं माझी सेवा करूं इच्छितेस काय ? बैस, तारे बैस ! तुझ्याकडून सेवा करून घेण्याकरितांच मी आलों आहें.

**ताराः**—आम्ही भाग्यवान् म्हणून महाराजांचं असं अकल्पित आगमन होऊन प्रत्यक्ष दर्शन घडलं आणि महाराजांच्या पवित्र चरणधूलीनं हें आमचं जंगलांतलं खोपटं आज पुनित झालं !

**संभाजीः**—तारे, बैस. तूं अशी दूर उभी राहून माझी काय सेवा करणार ? बैस— ( तारा बसते ) तूं भिऊं नकोस.

**ताराः**—ह्या निबिड जंगलांत एकटं रहाण्यांत आम्हाला कधीं भीति

वाटली नाहीं; मग आतां तर प्रत्यक्ष सर्व संकटांपासून—सर्व भीतीपासून रक्षण करणारे महाराज जवळ असतांना मला भीतीचा स्पर्श तरी होईल का ? ( संभाजी तिच्याकडे पहात राहातो. )

**संभाजीः**— तारे, तूं आतां माझी सेवा करणार काय ?

**ताराः**—( हात जोडून ) महाराजांच्या पवित्र चरणांची सेवा घडावी अशी ह्या दीन मुलीची इच्छा आहे.

**संभाजीः**—मला ह्या एकांत प्रसंगीं तुझ्याकडून कोणती सेवा पाहिजे आहे, त्याची तुला कल्पना करून दिल्याशिवाय तुझ्या अनभिज्ञ मनाला काय कळणार ?

**ताराः**—( पाय चेपूं लागते. संभाजी तिचा हात धरून तिच्याकडे पहात रहातो. ) महाराज, मी वेडी आहें हें सांगितलं ना ? आपणाला कोणती सेवा पाहिजे तें मला सांगा. मी मोठ्या आनंदानं करीन. महाराज, आज शिकारींत विशेष त्रास झाला काय ? महाराजांच्या कपाळावर हा किती घाम आला आहे ? ( पदरानें घाम पुसते. )

**संभाजीः**—तारे—( तिला जवळ ओढतो. )

**ताराः**—महाराजांना फार श्रम झाले आहेत. महाराजांनीं आतां थोडा वेळ आराम करावा.

**संभाजीः**—तारे ! हे सुंदर तारे ! तुझ्या समागमाशिवाय मला आराम कसा मिळेल ?

**ताराः**—मी आपल्या जवळच आहें. आपण सुखानं आराम करावा.

**संभाजीः**—तारे ! सुंदरी ! तुझ्या अनभ्यस्त मनाला एकांतांतील समागमाची कल्पना मी करून देतों. ( हात पुढें करतो. )

**ताराः**—महाराज, आपण कशाला व्यर्थ श्रम घेतां ? मला सांगा, मी आपण सांगाल तसं करून आपले श्रम परिहार करतें. महाराज, आपलें मी कपाळ चेपूं का ?

**संभाजीः**—नको. सुंदरी रतिसुखाची कल्पना करून देणारं तुझ्या—गुलाबी गालाचं मला प्रथम चुंबन घेऊं दे.

**ताराः**—( भीतीनें चटकन् उठून उभी राहते ) महाराज, आपण हें काय भाषण करतां ?

**संभाजीः**—सुंदरी, अशी दूर होऊं नकोस ! ह्या वनांत तूं व्यर्थ कोमेजून

जाण्यापेक्षां तुझ्या यौवनकुसुमाचा ह्या संभाजीला स्वाद घेऊं दे. तूं इतक्यांत माझे श्रम परिहार करण्यास—मला आराम देण्यास तयार होतीस ना?

**तारा:**—महाराज, तुम्हीं माझ्याकडे कोणत्या दृष्टीनं पहातां?

**संभाजी:**—सुंदरी, ह्या एकांतसमयीं मी तुझ्या ह्या सौंदर्याला भुलून दुसऱ्या कोणत्या दृष्टीनं पाहणार? आणि तूं इतका वेळ माझ्याबरोबर जो लडीवाळपणा केलास तो तरी कोणत्या दृष्टीनं?

**तारा:**—आपली कन्या या दृष्टीनं!

**संभाजी:**—( दचकून एकदम उठून ) काय — कन्या—?!

**तारा:**—महाराज, प्रजेबरोबर असलेलं तुमचं नातं तुम्हीं विसरलांत काय? तुमची सर्व प्रजा तुम्हाला पित्याच्या ठिकाणीं मानीत नाहीं काय? ( संभाजी कानावर हात ठेवतो. ) तुम्हीं गोब्राह्मणप्रतिपालक, अनाथांचे नाथ, आणि सर्व प्रजेला पित्याच्या ठायीं आहांत. इतका वेळ मी तुमच्या अंगावर खेळलें, ती केवळ अपत्यप्रेमानं खेळलें. पित्याच्या अंगावर लडीवाळपणें खेळण्यास कन्येला केव्हां तरी शंका वाटेल का?

**संभाजी:**—( अधोवदन करून ) तारे, इतका वेळ तूं निःशंकपणें माझ्या अंगावर खेळलीस; परन्तु कविराजानें दिलेल्या मदिरेनं माझी मति भ्रष्ट झाली होती. मला आतां माझ्या वर्तनाचा पश्चात्ताप होत आहे.

**तारा:**—महाराज हा मदिरेचा मोह आपण सोडून द्या. आपल्या पवित्र मुखांतून अनीतिमूलक शब्द बाहेर निघण्यास ही मदिराच कारण आहे. आपल्या हातून अत्याचार घडण्यास ही मदिराच कारण आहे. आणि यापुढं मदिरेचा आपण त्याग केला नाहीं तर ही मदिराच आपल्या बरोबर आपल्या मराठी साम्राज्याचा नाश करण्यास कारण होईल.

**संभाजी:**—तारे, तुझा प्रत्येक शब्द खरा आहे. तुझ्याकडे आतां वर मान करून पहाण्यास मला धैर्य नाहीं. तारे, मला क्षमा केली म्हणून म्हण.

**तारा:**—महाराज, अशी उपरोधिक भाषा करून ह्या आपल्या अनाथ मुलीला कां लाजवतां?

**संभाजी:**—तारे, हे पवित्र कन्ये! तुझं मन हें किती थोर आहे? मला तुझा जन्मभर विसर पडणार नाहीं. हे पवित्र तारे, ह्या तुझ्या अपवित्र पित्याला भेटून त्याचा देह आणि मन पवित्र कर. ( हात पुढें करतो. तारा त्याच्या बाहूंत जाते. मानाजी प्रवेश करतो. ) तारे! माझ्या धर्मकन्ये! आजपासून

तुझ्याकडे माझी दृष्टि राहीलच. तथापि हा तुझा भाऊ, हा निःस्पृह बच्चा, वाटेल त्या संकटांतून तुझं रक्षण करण्यास समर्थ आहे. मी त्याला असामी दिली आहे. आजपासून तुम्हांला कांहींच काळजी करण्याचं कारण नाहीं. मी आतां जातों. ( मानाजी मुजरा करतो. संभाजी जातो. )

**मानाजीः**— ताई, मी महाराजांना पोंचवून येतों. ( जातो. )

**ताराः**—( सचिंत ) ह्या थोर पुरुषावर मदिरेनं आपला पगडा बसविल्यामुळं त्याची ही कोण दुर्दशा झाली आहे ? शिव ! शिव ! ही मदिरा, आपल्या मोहानं आमच्या महाराजांना मोह पाडून आमच्या सर्वांच्या नाशाला कारण होणार काय ?—किती—किती—भयंकर हा मोह ! माझ्या कर्तव्यजागृतिपर एका शब्दानं आमच्या महाराजांना ह्या दुष्ट मदिरेचा पडलेला मोह झटकन् दूर होऊन त्यांना स्वतःची ओळख पटली. त्यांचं उच्च शील पुनः प्रकट झालं, आणि मुळांत आमचे महाराज कसे आहेत तें मला पहावयास मिळालं. आई अंबे ! आमच्या ह्या थोर महाराजांना मदिरेपासून दूर ठेव, इतकंच तुझ्या-जवळ माझं मागणं आहे. ( सचिंत आंत जाते. )

( राजकुंवर पुरुष वेषांत प्रवेश करते )

**राजकुंवरः**—खरी अकृत्रिम आणि निरपेक्ष अशी राजनिष्ठा जर कोणाला पहावयाची असेल तर ती त्याला त्या झोंपडींत दिसेल. पाहिजे तशीं दुःखं, अनंत भयंकर अशा यातना, अतिशय कष्टप्रद अशा हालअपेष्टा निमुटपणं— आनंदानं सहन करून आपलं दृढ व्रत—आपली निष्ठा—आपलं ब्रीद यांपासून यत्किंचितहि च्युत न होतां जी प्रेमाच्या भावी आशेवर या निर्जन वनांत, हिंस्र-श्वापदांच्या सहवासांत आपलं यौवन कंठीत आहे ती तारा साध्वी धन्य आहे !—इतक्या वर्षांनीं इतक्या जवळ येऊन मल्हारी केवळ कर्तव्या-साठीं अशा स्त्रीरत्नाची भेट न घेतां गेला, याबद्दल त्यालाहि धन्यवादच दिले पाहिजेत ! ( क्षणभरानें ) जगांत सोन्यांच्या आणि रत्नांच्या खाणी पुष्कळ आहेत. अशा खाणी एकसारखं खणीत बसलं तर पाहिजे तितकं सोनं, हिरे, माणकं किंवा दुसरीं मौल्यवान् रत्नं सांपडतील. पण तारा—मल्हारीसारखीं नररत्नें देशाच्या खाणींत पैदा व्हायला त्या देशाला परमेश्वरी प्रसादाची देण-गीच असावी लागते. अशी ही परमेश्वरी प्रसादाची देणगी आमच्या ह्या महाराष्ट्राला आहे. अखिल मनुष्यजातीला ललामभूत होणारीं नररत्नें आमच्या ह्या आर्यभूमींत किती तरी पैदा झालीं आहेत. असले स्त्रीपुरुष प्रथम बहुधा

जगाच्या कोठल्या तरी अप्रसिद्ध, दुष्ट जनांनीं आपल्या संसर्गानें भ्रष्ट केलेल्या जागेपासून फार दूर व निरामय अशाच ठिकाणीं वास करीत असतात. त्यांच्या अस्तित्वाची जगाला कल्पना सुद्धां नसते. परंतु असल्या अपूर्व गुणांनीं मंडित असलेल्या नरश्रेष्ठांना स्वर्गलोक व तेथील चिरकालिक सौख्य अगदीं जवळ असतें. ( पाहून ) अरे, पण ती झोंपडीच्या दरवाजाजवळ कोण उभी आहे? ताराच ती! पण ती अशी उद्विग्न कां दिसते? आपल्या प्रियकराच्या विरहानं ती झुरत असेल काय? पण नको. अशा शंका कुशंका काढण्यापेक्षां पुढें होऊन तिलाच विचारावं! ( पुढें होते. ) ( तारा प्रवेश करते. )

**तारा:**—आपणाला कोण पाहिजे? महाराजांना शोधण्याकरतां जर आपण इथं आलां असाल, तर महाराज इथं नाहींत.

**राजकुंवर:**—( स्वगत ) मला हिनं ओळखलं नाहीं असं दिसतं. तर आपणहि हिला इतक्यांत ओळख न देतां, दादा इकडे कशाकरतां आला होता तें विचारून घेऊं. ( उघड ) महाराज, इथं कशाकरतां आले होते?

**तारा:**—विश्रांति घेण्याकरितां. पण आपण कशाकरतां आलां आहांत?

**राजकुंवर:**—मीहि विश्रांति घेण्याकरितांच आलों आहें.

**तारा:**—ही कांहीं धर्मशाळा नाहीं.

**राजकुंवर:**—ही धर्मशाळा नाहीं हें मी जाणून आहें. पण जातिवंत मराठ्याला जातिवंत मराठ्याच्या घरीं विश्रांतीला जागा मिळूं नये हें आश्चर्य आहे. —

**तारा:**—यांत आश्चर्य मानण्याचं कांहीं कारण नाहीं. जातिवंत मराठे व्यसनाधीन होऊन कसं पशुतुल्य वर्तन करतात त्याचा मला नुकताच अनुभव आला आहे. पण त्या गोष्टी बोलण्यांत आतां अर्थ काय? मी आपल्याला पहिल्यानंच सांगितलं कीं, इथं तुम्हांला विश्रांतीला जागा मिळणार नाहीं. तुम्ही येथून जा—( जाऊं लागते. )

**राजकुंवर:**—( पुढें होऊन ) तारे—थांब. मजकडे जरा निरखून पहा. अद्यापि तुला माझी ओळख नाहीं का पटत? पहा—सहा वर्षांपूर्वीं तुला भेटलेल्या ह्या तुझ्यासारख्याच समदुःखी भगिनीला तूं विसरलीस काय?

**तारा:**—( निरखून पहात ) ओ–ळ–खलें–पण नांव—

**राजकुंवर:**—मी तुला नांवच सांगितलं नव्हतं. पण तारे! महाराजांनीं इथं येऊन कोणतं पशुतुल्य वर्तन केलं?

**तारा**ः—महाराजांनीं मदिरेच्या निशेंत माझ्या कौमार्याचा भंग करण्याचा विचार केला होता.

**राजकुंवर**ः—शिव ! शिव ! महाराजांना अशी दुर्बुद्धि कशी सुचली ?

**तारा**ः—मदिरेच्या मोहामुळं ! भगिनी ! आतां आपलं पुढं कसं होईल ? इतके दिवस आपणास स्वतःचं, कुलाचं आणि शीलाचं परकीयांपासून रक्षण करण्यास स्वकीयांचा आणि आपल्या राजाचा मोठा आधार होता. पण आतां सर्वत्र उलटं झालं आहे. प्रत्यक्ष राजा व्यसनाधीन होऊन पुत्रवत् प्रजेकडे पापी नजरेनं पाहूं लागला. आतां आपल्यासारख्या दुःखी—कष्टी—दुर्दैवी अबलांची काय स्थिति होणार ? ( तिच्या खांद्यावर डोकें ठेवते. ती समजूत करते. ) ( मल्हारी प्रवेश करतो. )

**मल्हारी**ः—आज सहा वर्षांनीं मला माझ्या आराध्य देवतेचं—माझ्या प्रिय तारेचं दर्शन होणार ! प्रतिज्ञेमुळं मी जरी अडलों आहें, तथापि मला पाहून मी प्रतिज्ञापूर्तीकरतां अहर्निश झटत आहें, हें पाहून माझ्या तारेला आनंदच होईल. माझी प्रतिज्ञा पूर्ण होऊन महाराजांचा मला प्रसाद मिळेपर्यंत मी तारेला भेटणारच नव्हतों. परंतु इतक्या वर्षांनीं इतकं जवळ येऊन मी भेटल्याशिवाय गेलों असं जर कळलं तर तिला वाईट वाटेल, हा विचार मनांत येऊन माझे पाय मला पुढें नेईनात. आतां मला पाहून माझ्या प्रिय तारेला किती तरी आनंद होईल. ह्या स्वगत विचारांत मी तारेच्या अगदीं झोंपडीजवळ आलों. माझी तारा आतां काय करीत असेल ? ( पुढें पाहतो आणि दचकतो. ) हें मी काय पहातों ? तारा—माझी तारा—त्या तरुणाच्या स्कंधावर मान टाकून विलासांत मग्न ! ( त्वेषानें पुढें होऊन ) चांडाळणी ! तूं इतकी कुलटा असशील अशी मला कल्पनाहि नव्हती. दुष्टे, केवळ तुझ्या प्रेमाकरतां प्रतिज्ञा करून आज अर्धें तप मी खडतर प्रसंग अनुभवित आहें, आणि तूं जारिणी ह्या दुष्ट तरुणाबरोबर विलाससुख अनुभवीत आहेस काय ? धिःकार असो तुला आणि तुझ्या प्रेमाला !

**राजकुंवर**ः—तारे, हा समजुतीचा घोंटाळा आहे. मी तुझ्या मल्हारीची शंका निरसन करतें.

**तारा**ः—थांब, मलाच प्रथम थोडं बोलूं दे. ( पुढें होऊन मल्हारीपुढें उभी रहाते. )

**मल्हारी**ः—( अधिक रागानें ) कुलटे ! माझ्या समोर येऊन उभें रहा-

ण्याला तुला लाज नाहीं वाटत ? इतकी तूं बेताल—स्वैरवर्तनी आणि दुराचारी असशील अशी मला कल्पना नव्हती.

**तारा**:—( शांतपणें ) कल्पना नव्हती हेंच ठीक झालं ! आणि तुम्हाला माझ्याविषयीं कल्पना होणेंच शक्य नाहीं. तुमच्या दृष्टीनं जरी मी दुराचारी, स्वैरवर्तनी आणि बेताल ठरलें तरी मी स्वतः कशी आहें, हें तुमच्यापेक्षां मलाच चांगलं माहीत आहे. सहा वर्षांपूर्वी तुम्हाला माझं प्रेम जसं शुद्ध निर्मल आणि पवित्र दिसत होतं, तसंच तें आतांहि आहे. परंतु आतां तुम्हांला जो देखावा इथं दिसला त्याचं कारण तुमची प्रतिज्ञा पूर्ण होण्यापूर्वी तुम्हीं इथं आलांत हें होय. तुमच्या मनाला शिक्षा लावण्याकरतांच हा देखावा होता. परंतु तेच तुम्ही आपली प्रतिज्ञा पूर्ण करून ह्या तारेला भेटायला आलां असतां तर ही तारा पूर्वीप्रमाणंच आपणाला शुद्ध आणि निर्मल दिसली असती.

**मल्हारी**:—( रागानें ) जारिणी, माझ्या प्रतिज्ञेविषयीं उच्चार करण्यास तुझी भ्रष्ट जिव्हा कशी उलटली ?

**राजकुंवर**:—मल्हारी, ह्या साध्वीविषयीं बोलतांना मघांपासून तूं सभ्यपणा सोडून अविचारानं तोंडाला येईल तें बोलत आहेस, हें तुला शोभत नाहीं.

**मल्हारी**:—( तरवार उपसून ) नीचा त्या कुलटेच्या वतीनं तरफदारी करण्याकरतां एक शब्द जास्त उच्चारशील तर प्रथम तुझी जिव्हा छाटून टाकीन. इतकीं वर्षे तुला मी निरपेक्ष बुद्धीनं माझं कल्याण चिंतणारा मित्र समजत होतों. परंतु तुझं खरं स्वरूप आतां मला दिसलं. तूं जार आहेस आणि ती जारिणी आहे. मघां परस्परांना आलिंगन देतांना तुमचीं एकत्र झालेलीं तीं भ्रष्ट शिरं एका घावांत मी तुमच्या धडापासून वेगळीं केलीं असतीं, परंतु माझी ही पवित्र तरवार तुमच्या भ्रष्ट रक्ताकरतां नाहीं म्हणूनच सुटलांत ! जा—असेंच पापकर्मांत लोळत राहून शेवटीं नरकाचे वांटेकरी व्हा—अरेरे ! इतकीं वर्षं मी एका साध्वीवर अनुरक्त झालों आहें असं समजत होतों. पण आजच्या काळांत खऱ्या साध्वी आहेत, अशी कल्पना करणेंहि धाडसाचं होईल. धिःक्कार असो या स्त्रीजातीला !

**राजकुंवर**:—तारे ! आतां मल्हारीचा अंत पाहणं चांगलं नाहीं. त्याचा क्रोध आतां विकोपाला गेला आहे. मी कोण आहें हें आतां त्याला कळूं दे—सांग—

**तारा**:—महाराज, शांत व्हा. मी ह्या पुरुषाच्या गळ्यांत गळा घातला हें

पाहून माझ्या पवित्र प्रेमाबद्दल आणि पवित्र मनाबद्दल तुम्हीं भलतीच खात्री करून घेतली आहे. परंतु महाराज, हा पुरुष नसून स्त्री ही आहे.

**मल्हारीः**—( आश्चर्यानें ) काय—स्त्री आहे ?

**ताराः**—होय, स्त्री आहे. आणि ही स्त्री आपल्या कर्तव्यभ्रष्ट पतीला ताळ्यावर आणण्याची प्रतिज्ञा करून ह्या पुरुषवेषानं त्याच्या शोधांत आज इतकीं वर्षें भटकत आहे.

**राजकुंवरः**—मल्हारी, असा विस्मयचकित होऊं नकोस. मी स्त्री आहें, हें तुझ्या तारेला माहीत आहे. परंतु मी कोणती स्त्री आहें हें मात्र तिला माहीत नाहीं. आणि तुला तर आतांपर्यंत माहीत नव्हतें. पण आतां मी माझं खरं स्वरूप प्रगट करतें म्हणजे तुमच्या सर्व शंका निरसन होतील. ( फेटा व वेष काढून टाकते. )

**तारा व मल्हारीः**—( आश्चर्यानें ) कोण ? राजकुंवर !

**राजकुंवरः**—होय. तुमच्या महाराष्ट्र प्रभूची ही आवडती भगिनी राजकुंवर आहे.

**तारा व मल्हारीः**—( हात जोडून ) ताईसाहेब, आम्हीं मर्यादा सोडून वागलों, क्षमा करा.

**राजकुंवरः**—उठा.

---

# अंक पांचवा

## प्रवेश पहिला

**स्थळ**:—विशाळगडावरील जंगल प्रदेश.

( गणोजी शिर्के प्रवेश करतो. )

**गणोजी**:—शेवटीं संभाजीच्या निवांतस्थानाचा शोध मला अचुक लागला ! आतां माझी प्रतिज्ञा खात्रीनं पूर्ण होणार. आज इतकीं वर्षं त्या कपटी कलुषाच्या नादाला लागून मी दिवस मात्र व्यर्थ गमाविले. तो बेरड मला संभाजीचा भेद देईल या आशेवर त्या लुच्चाला बादशहाकडून जहागिरी, मानमरातब आणि विपुल द्रव्य देवविण्याची मी अनेकदां लालूच दाखविली; पण तो कसला हरामखोर छट !—शेवटीं मलाच हें काम हातीं घ्यावं लागलं ! —अहारे नीचा संभ्या ! इतकीं वर्षं मोहिमा करून चाऱ्ही बाजूंनीं कोंडल्यावर आतां संगमेश्वरीं विश्रांति घेत पडला आहेस काय ? घे. विश्रांति घे. ही तुझी विश्रांति अखेरचीच आहे. शिरकाणाच्या सुडाबद्दल हा गणोजीराव तुला आतां अखेरचीच विश्रांति देणार. ( थोडा वेळ थांबून ) ह्या माझ्या प्रतिज्ञेमुळं बादशहा माझा वाटेल तसा उपयोग करून घेत आहे. शिर्क्यांनीं स्वप्नांतसुद्धां जीं कृत्यें केलीं नव्हतीं तीं मला आज प्रत्यक्ष करावीं लागत आहेत. चांडाळा संभ्या ! त्या पुण्यश्लोक महापुरुषाच्या नांवाला कलंक लावण्यास आणि आम्हांकडून लावविण्यास तूंच सर्वस्वी कारण आहेस. ह्या अल्प अवधींत तूं थोरल्या महाराजांप्रमाणं आपलं अलोट शौर्य दाखविलंस; अनेकदां बादशहासारख्या अजस्र शत्रूला आपल्या धाडसी पराक्रमानं विस्मयचकित करून सोडलंस तथापि जग तुला सूर्यापोटीं शनिश्चर म्हणूनच ओळखतील—तुझा तिरस्कार करतील—

( राजकुंवर पुरुषवेषांत प्रवेश करते. )

**राजकुंवर**:—समजून उमजून दुष्कृत्यं केल्यावर जगानें तिरस्कार केल्यास तो दोष कोणाचा ?

**गणोजी**:—( आश्चर्यानें ) कोण राजकुंवर ?—तूं हा पुरुषवेष केव्हां

टाकणार ? सहा वर्षांपूर्वी तूं मला विंझईच्या जंगलांत भेटली होतीस, तेव्हां-पासून ह्याच वेषांत तूं अशीच रानोमाळ भटकतेस काय ?

**राजकुंवरः**—माझ्या पतिराजाला मोंगलांच्या गुलामगिरीच्या मगर-मिठींतून सोडविण्याची मी प्रतिज्ञा करून इतकीं वर्षे पतिदेवाच्या शोधार्थ दऱ्याखोऱ्यांतून, पहाड जंगलांतून, दिवस-रात्र, पाऊस-थंडी-वारा यांस न जुमानतां सारखी वणवण फिरत आहें. आज अकल्पित रीतीनं आपलं दर्शन झालं. पतिराज ! माझा हा खडतर वनवास आपण केव्हां पूर्ण करणार ? सांगा ! आपल्या अर्धांगी रजपुतानीच्या प्रतिज्ञेकरितां कित्येक शूरवीर रजपूत आपलं नांव इतिहासांत अमर करून गेले. मग माझी प्रतिज्ञा तुम्ही नाहीं का पूर्ण करणार ?

**गणोजीः**—पण माझी प्रतिज्ञा पहिली आहे. आणि तुझं पत्नीकर्तव्य म्हटलं म्हणजे माझी प्रतिज्ञा पूर्ण करण्यास मदत करणं हेंच आहे. माझी प्रतिज्ञा !—शिर्क्यांनं केलेली प्रतिज्ञा ! ! आज इतकीं वर्षें अपूर्ण राहिलेली माझी प्रतिज्ञा ! ! ! राजकुंवर, तुला या गोष्टीचं लांछन नाहीं काय ? तुझ्या भावानें त्या घातकी संभ्यानं राजदंड हातीं येतांच शिरक्यांच्या शिरावर शस्त्र ठेवून त्यांचा शिरकाण केला, त्या अमानुष कृत्याची आठवण होतांच माझं सर्वांग तप्त होऊन मी देहभान विसरून जातों. तो चांडाळ दृष्टीस पडतांच त्याच्या नरडीला नख लावून मी माझी प्रतिज्ञा केव्हां पूर्ण करीन असं मला झालं आहे.—आला—तो काळ अगदीं जवळ आला, माझी प्रतिज्ञा पूर्ण होण्याचीं चिन्हं आतां स्पष्ट दिसूं लागलीं.

**राजकुंवरः**—( हात जोडून ) महाराज, महाराष्ट्रसाम्राज्याचा नायनाट करण्याचा हा हेका सोडून द्या. आपण क्रोधाच्या आवेशांत केलेली ही प्रतिज्ञा अन्यायाची आहे. ही आपली प्रतिज्ञा महाराष्ट्राला धाय धाय रडायला लावील ! प्राणनाथ मी माझ्या बंधूप्राणाची भिक्षा मागत आहे; आपल्या भगिनीच्या पतिप्राणाची भिक्षा मागत आहे.—सर्व महाराष्ट्राच्या जनकप्राणाची भिक्षा मागत आहे—माझ्या विनंतीचा अनादर करूं नका. मी आपणापुढें हा पदर पसरला आहे.

**गणोजीः**—राजकुंवर, तूं मला ही भुरळ घालूं पहात आहेस काय ? पण तें जाऊं दे—राजकुंवर तूं माझी पत्नी ना ? पतीला सावलीप्रमाणं चिकटून राहणं हें तुझं कर्तव्य खरं ना ?—मग चल—आतां मजबरोबर चल—

थोड्याच दिवसांत मी तुला एका बलाढ्य राष्ट्राची स्वामिनी करतों. तुझ्या पतीची प्रतिज्ञा पूर्ण होतांच रिकाम्या पडणाऱ्या रायगडाच्या सिंहासनावर महाराणी म्हणून मी तुझी स्थापना करतों. चल—

**राजकुंवरः**—हं—दूर व्हा. यवनाला कुर्निसात करणाऱ्या त्या विटाळलेल्या हातानें गोब्राह्मणप्रतिपालकाच्या कन्येस भ्रष्टविण्याचा पापी प्रयत्न करूं नका—हाय हाय ! पतिदेवा, सूर्याप्रमाणें तेजस्वी अशा शिर्केकुलाला खग्रास ग्रहण लावणाऱ्या यवनांच्या ताबेदारीचा आपणास कसा हो मोह पडला ?

**गणोजीः**—हा मोह तुझ्या दादानं मला पाडला. राजकुंवर, ह्या मोहाकरितां माझा तूं विटाळ मानतेस ?—अशी विकारवश होऊं नकोस. पतीला झिडकारून नरकाचं द्वार खुलं करून घेऊं नकोस.

**राजकुंवरः**—पतीला पुरुषार्थाच्या मार्गावर आणण्यास मी स्वीकारलेला हा मार्ग मला स्वर्गद्वारच उघडं करून देईल. महाराज, अर्थ आणि कामाबरोबर धर्माचाहि मार्ग जोडीनं जाण्याकरितां देव-ब्राह्मणांनीं आपणांस सात पावलं चालविलं ना ? पण त्या सात पावलांच्या प्रवासांची दिशा आपण सोडली आणि आतां आडरानांत शिरलां आहांत.

**गणोजीः**—राजकुंवर, माझी कृति तुला इतकी अमानुष दिसते आणि तुझ्या त्या लाडक्या दादानं शिर्क्यांच्या सर्व बायका कुंकुमरहित करून विधवा केल्या, त्यांच्या सर्वस्वसुखाचा नाश केला, त्यांना रडतां भुई थोडी केली, त्यांचं दुःख तुला दिसत नाहीं काय ? त्यांची तुला कींव येत नाहीं काय ? सांग, मी माझी प्रतिज्ञा का मागें घ्यावी ?—तुझ्या दादाचं प्रत्येक कृत्य सत्कृत्यच असेल नाहीं ? ज्यानं आपल्या सापत्न मातेला—गोब्राह्मणप्रतिपालकाच्या भार्येला—प्रत्यक्ष तुझ्या आईला हालहाल करून भिंतींत चिणून ठार मारलं—निरपराधी भावाच्या पायांत बिड्या ठोकल्या—स्वामिभक्त अष्टप्रधानांचे धिंडवडे केले—राजनिष्ठांचीं डोकीं मारलीं—स्वामिभक्तांचा कडेलोट केला—बाळाजी आवजीसारख्या दृढनिश्चयी आणि एकनिष्ठ सेवकाला पुत्रासह हत्तीच्या पायीं दिलं—अण्णाजी दत्तोसारख्या मुत्सद्याच्या रक्तानें हात विटाळविले आणि मोरोपंत पिंगळ्यांसारख्या महाराष्ट्राच्या मुख्य आधारस्तंभाला गडाच्या अंधारकोठडींत कुजत टाकून मारलं, ह्या सर्व तुझ्या दादाच्या एकापेक्षां एक वरचढ कृति तुला अक्षम्य वाटतात काय ?—चल, मजबरोबर चल. त्या नरपशूंचीं आंतडीं जिवंतपणीं कोल्ह्याकुत्र्यांच्या पुढं टाकण्यास मला

मदत करण्यास चल. त्या कर्मचांडाळाचे डोळे तापलेल्या सांडसानं बाहेर काढण्यास मजबरोबर ये—अशी मुग्ध कां ? त्या नरव्याघ्राचीं हीं भयंकर कृत्यं ऐकून भ्यालीस काय !—पण तुला भिण्याचं कांहींच कारण नाहीं. त्या नरव्याघ्राला योग्य शिक्षा लावण्याकरितां ती पहा ( बोट दाखवून ) माझ्या मागं बादशहाची अफाट सेना माझ्या हुकुमाची वाट पहात उभी आहे. आतां थोड्याच काळांत रायगड जमीनदोस्त करून तुझा पति—हा गणोजीराव शिर्के आपली प्रतिज्ञा पूर्ण करणार ! चल. राजकुंवर, तूं माझ्या व्रताच्या उद्यापनाकरितां आतां बरोबर चल.

**राजकुंवरः**—( रागातिशयानें ) मी येऊं ? घरबुडव्या ! मला तूं कोठं नेणार ? वैऱ्यांना आंत घेऊन, स्वकीयांचा घात करणाऱ्या घरबुडव्या पातक्या जा—

**गणोजीः**—तूं माझी पत्नी ! तुला आतां बरोबर नेल्याशिवाय मी कुठं जाणार ?

**राजकुंवरः**—आतां रणांगणावर गांठ पडल्यानंतर पुढं कुठं जावयाचं तो मार्ग मी तुम्हाला दाखवीन. अद्यापि मी तुमची पूर्ण पत्नी झालें नाहीं समजलांत ?—विवाहांत अपुरी राहिलेली सप्तपदी रणभूमीला प्रदक्षिणा घालून पूर्ण करण्यास रणांगणावर चला. व्हा पुढं. तिथंच रणकुंडांतील रसरसलेल्या अग्नीवर आपला अपुरा राहिलेला लजाहोम पूर्ण करण्याकरितां ही मी आपल्यापुढें आलेंच म्हणून समजा. ( झपाट्यानें निघून जाते. )

**गणोजीः**—अरे, ही तर वाऱ्यासारखी निघून गेली !—हां हां म्हणतां दिसेनाशी सुद्धां झाली. किती भयंकर ही बिजलीसारखी गति ! राजकुंवर, तूं हा व्यर्थ अट्टाहास करून आपलं सुख गमावीत आहेस. आपल्या दुष्ट दादाची तूं एवढी तरफदारी करीत आहेस पण तो असं तुझं कोणतं सुख पहात आहे ? उलट हा खडतर वनवासच तुझ्या मागं लागला आहे ना ?—पण त्या गोष्टीचा आतां विचार कशाला ? चला, आपण पुढल्या उद्योगाला लागूं या. राजकुंवर या रस्त्यानं रायगडच्या रस्त्याला लागली. आपण सैन्या-सह संगमेश्वरीं मोर्चा वळवूं. ( जातो. )

## प्रवेश दुसरा

**स्थळः**—संगमेश्वर. सरदेसाईंच्या वाड्यांतील पटांगण.

( पेटलेल्या होमाजवळ कलुषा बसला आहे. )

**कलुषाः**—ॐ ह्रीं ह्रां रीं रां विष्णुशक्तये नमः। आंजपर्यंत केलेलीं कारस्थानं, रचलेले व्यूह आणि लढविलेले डावपेंच या सर्वांचा मला मोबदला मिळणार ! माझ्या होमाची सर्व सिद्धता झाली. आतां देवीच्या अष्टदिशा जाग्या करून या धडाडणाऱ्या होमकुंडांत मी राजबळी देणार !—अहाहा ! आजपर्यंत या भरतखंडांत हजारों शाक्त उपासक होऊन गेले असतील; त्यांनीं भगवती देवीला प्रसन्न करून घेण्याकरितां शेकडों महिषबली दिले असतील, कदाचित् नरबली सुद्धां दिले असतील. परंतु माझ्यासारख्या ( बोट दाखवून ) ह्या चंडमुंडनाशिनी भगवती महाकाली देवीला राजबली देणारा दैवाचा पुतळा मीच एक असेन ! मला ह्या महादेवीची ही अशी उत्तमोत्तम सेवा करतां येईल असं कधीं स्वप्न तरी पडलं होतं काय ! पण हा सर्व देवीच्या कृपेचाच खेळ आहे. आतां हा राजबळी देऊन शत्रुनाशिनीदेवी आपल्या आक्राळ विक्राळ स्वरूपांत मला प्रसन्न झाल्यावर ब्रह्मांडांतील यच्चावत् सर्व सुखं माझ्या पुढं दत्त म्हणून हात जोडून उभीं राहतील. मग माझ्यासारखा भाग्यवान् ह्या अखिल भूमंडळावर मीच एक ! या अनिर्वाच्य सुखांत गढलेलं माझं मन बादशहानं देऊं केलेल्या अळवावरील पाण्यासारख्या जहागिरीला थोडेंच भाळणार आहे ? तसंच तो मूर्ख गणोजी शिर्के, आपल्या प्रतिज्ञेच्या पूर्तीकरितां संभाजीला मी त्याच्या स्वाधीन करावा म्हणून माझ्या मागं सारखा लाळ घोटीत आहे. परंतु माझा राजबळी हातचा सोडून देण्याइतका मी मूर्ख थोडाच आहें. एकदां हा राजबळी देऊन देवी प्रसन्न होतांच प्रथम मी बादशाही उलथून पाडीन आणि मग दिल्लीच्या तख्तावर सर्व सुखांनिशीं राजाधिराज म्हणून पाय देईन !—आतां ठरविल्याप्रमाणं संभाजी इथं येईल. त्याला देवीच्या पुढें ह्या होमांत समर्पण करीपर्यंत संशय येऊं नये म्हणून मदिरेच्या निशेंत बेहोष करण्याचं काम मी नेमाजीला सांगितलं आहे, तो अद्यापि कसा आला नाहीं ? ( दूरवर पाहून ) हा कोण बरं येत आहे ?—दादजी ! हा आजच कुठं गडावरून इथं आला ? याचा माझ्या मागें व्यर्थ ससेमिरा लागला आहे.

आतां आपली ही होमाची पूर्तता होईपर्यंत याला इथं जवळपास राहूं देतां उपयोगी नाहीं. नाहीं तर तो मध्येंच घोंटाळा करावयाचा !

[ दादजी प्रवेश करितो. ]

**दादजीः**—पंडितराव, आपण कोणालाहि न कळवितां महाराजांना इकडे घेऊन आलांत; परंतु राजधानींत कोण हाहाःकार उडाला आहे. खजिना रिकामा पडला आहे म्हणून तेथें सारखी ओरड पडली आहे. लष्करांतील प्रत्येक गडी तनख्याकरितां बिथरला आहे. देशमुख, देशपांडे, पाटील, कुळकर्णी नवीन बसविलेल्या साऱ्यामुळं हवालदिल झाले आहेत. अशावेळीं महाराजांनीं जातीनं तिथं हजर राहून स्वतः त्यांची समजुत घातली नाहीं तर सर्व प्रजेंत असंतोष उत्पन्न होऊन मोठा कठीण प्रसंग येण्याचा संभव आहे. शिवाय शत्रुसैन्य जवळ जवळ येत चाललं अशी अलीकडे उठलेली अफवा ऐकून प्रजा अगदीं चिंताक्रांत झालेली दिसत आहे.

**कलुषाः**—त्याला मी काय करणार ? महाराजांच्या सुखाबरोबर सर्व प्रजेचं सुख पहाण्याचं काम निरपेक्ष बुद्धीनं मी चालविलंच आहे. हें पहा—धुरानं चाऱ्ही दिशा धुंद करून टाकणारा हा होम मी त्या करितांच पेटविला आहे. आतां अष्टमा—सिद्धिप्रयोग करून पंचभैरवकृपेनं सर्व कांहीं यथास्थित होईल. आतां महाराज येण्याचाच काय तो अवकाश; पण ते पहा, महाराज आलेच !

( संभाजी प्रवेश करतो. )

**संभाजीः**—कोण दादजी ! तुम्ही गडावरून आलां काय ? काय खबर आहे गडावर ?

**कलुषाः**—महाराज, तो काय खबर सांगणार ? आपल्या मूर्ख प्रधान मंडळानें त्याला जें शिकविलं असेल, तेंच पोपटासारखं तो आपणांस आतां सांगणार. महाराज राजधानींत नाहींत म्हणून सर्वत्र हाहाःकार उडाला आहे, असं तो सांगतो. खजिन्यांत शिल्लक नाहीं, म्हणून प्रधान मंडळ ओरड करते. गनीम जवळ येत चालला अशा अफवा उठल्या आहेत. अशा एक ना दोन ? शेकडों बातम्या घेऊन तो रायगडावरून आला आहे. पण मी म्हणतों, ह्या संगमेश्वरासारख्या रम्य व एकांतस्थळीं महाराज मुद्दाम विश्रांतीकरितां आले आहेत, म्हणून प्रजेला हताश होण्याचं कारण काय ? महाराजांनीं प्रजेच्या सुखाकरितां आज इतकीं वर्षे शत्रुशीं लढून रक्ताचं पाणी केलं आणि आतां

थोडा वेळ विश्रांतींत घालविला म्हणून प्रजेला एवढा अट्टाहास करण्याचं कारण काय ?

**संभाजीः**—कविराज, तुमचं म्हणणं अगदीं बरोबर आहे. मी आतां कांहीं काल इथेंच विश्रांति घेणार. औरंगजेबाच्या छातीवर पाय देऊन त्याची मी बहुतेक रग तर जिरविली. काबूल तें कन्याकुमारीपर्यंत आपला हिरवा झेंडा नाचविण्याची त्यानें धरलेली भयंकर हाव मी हाणून पाडिली. आबासाहेबांच्या वेळीं त्यानं न अनुभवलेलीं मराठ्यांच्या मर्दुमकीचीं कृत्यें 'बापसे बेटा सवाई' होऊन मी त्या दाढी मीशीच्या बादशाहाला पटविलीं आणि अजून काय झालं आहे ? हा संभाजी शहाजाद्या अकबराला पाठीशीं घालून दिल्लीपद हिरावून घेण्यास कधींहि मागें घेणार नाहीं !—कविराज, खजिन्यांत शिल्लक नाहीं म्हणून कोण ओरड करीत आहे ? त्या मूर्ख प्रधान मंडळाला खजिन्याची भरपाई करण्याची अक्कलच नाहीं. शिल्लक नाहीं—शिल्लक नाहीं, म्हणून ओरड केल्यानं खजिना थोडाच भरणार आहे ? द्या, झाडून सारे परगणे मक्त्यानं द्या. मग पहातों खजिना कसा भरत नाहीं तो !

**कलुषाः**—महाराज, मी देखील आतां आपणांस तेंच सुचविणार होतों. ह्या वेळीं गांवच्या गांव मक्त्यानं दिल्याशिवाय पैसा हातीं येणं शक्य नाहीं. पण महाराज, आपण हा असा मनःसंताप कां करून घेतां ? मी आज बारा रेडे मारले आहेत. आणि त्यांच्या ह्या ओल्या कचकचीत कातड्यावर बसून आतां देवीच्या अनुष्ठानाला मी सुरुवात करणार आहे. यंत्र मंत्र करून अष्टमा-सिद्धि—यक्षिणी—प्रयोग साध्य होतांच महाराजांना कशाचं भय आहे ? हां हां म्हणतांच सर्व खजिना मोहरा पुतळ्यांनीं भरून काढीन.

**दादजीः**—( हात जोडून ) तें सर्व आपण करूं शकाल. परंतु बादशाहा स्वतः महाराजांच्या मागें आला आहे. त्यानें दक्षिणोत्तर चौफेर अफाट सैन्याचं जाळं पसरलं आहे. शिवाय मुकर्बखान नांवाचा एक भारी सरदार जवळपास महाराजांच्या पाळतीवर दबा धरून बसला आहे, त्याची काय वाट ?

**संभाजीः**—दादजी, ह्या सर्व बाजारगप्पा आहेत. आणि त्यांना तूं कान देतोस तेव्हां तुझ्यासारख्या शूराला काय म्हणावं ?

**कलुषाः**—आणि कदाचित् ह्या बाजारगप्पा नसून सर्व खऱ्या असल्या तरी त्यांत भिण्याचं काय कारण आहे ? शत्रु येत आहे, तो केवळ ह्या होमाला बळी पडण्याकरितांच येत आहे. आतां ह्या धडाडणाऱ्या होमकुंडांत मी माझ्या

मंत्रसामर्थ्यानं शत्रूला इथं खेंचून आणून देवीपुढं बळी देणार. आज असंख्य यवन बळी घेतल्याशिवाय हा होम शांत होणारच नाहीं. महाराज, आपण स्वस्थ असा. आणि माझ्या मंत्रसामर्थ्यानं कशा अतर्क्य गोष्टी घडतात, त्या शांत चित्तानं अवलोकन करा. आतां थोड्याच वेळांत देवीची प्राणप्रतिष्ठा होऊन तिची साक्षात् मूर्ति मी आपणासमोर उभी करतों. महाराज, आपले परमपूज्य वडील छत्रपति शिवाजी महाराज यांनीं सुद्धां भवानी देवीच्या कृपाप्रसादावर स्वराज्याचा पाया रचिला आणि त्याच कृपाप्रसादानं आतां आपल्या हितशत्रूंचा उच्छेद होऊन मराठी साम्राज्याला कोणताहि धोका रहाणार नाहीं.

**संभाजीः**—मग आणखी काय पाहिजे ? मला आपल्या देवीचा कृपाप्रसाद मिळाला म्हणजे शत्रूंची माझ्या मागें लागलेली ही कटकट अक्षयींची मिटेल ना ?

**कलुषाः**—यांत काय संशय महाराज ? देवीची कृति किती जाज्वल्य आहे याची प्रचीति मी महाराजांना इतक्यांतच आणून देतों.

**संभाजीः**—माझा तुमच्यावर पूर्ण भरंवसा आहे. पंडितराव, तुमची मला भेट झाली हें मी माझं भाग्य समजतों. नाहींतर ह्या संभाजीची धडगत नव्हती.

**कलुषाः**—सरकार ही ह्या सेवकाची स्तुति अवास्तव आहे. मी अधिक तें काय करतों ! मला ज्या पायांचा आश्रय मिळाला त्या पायांच्या कल्याणाकरितां तन मन धन खर्च करणं हें या नम्र सेवकाचं कर्तव्य आहे. सरकार, आतां मी जपाच्या अनुष्ठानाला बसतों.

**संभाजीः**—ठीक आहे. तुमचं अनुष्ठान चालूं द्या, पण मला देवीच्या पवित्र तीर्थाचं अधिष्ठान बनूं द्या; त्या शिवाय मला इथं चैन पडावयाचं नाहीं.

**कलुषाः**—त्याची सिद्धता मी पूर्वींच करून ठेविली आहे. दादजी, जा आणि वाड्यांत नेमाजी पहाऱ्यावर आहे त्याला देवीचं तीर्थ घेऊन इथं पाठवून दे. आणि थोडा वेळ पहाऱ्याचं काम तूं सांभाळ. माझ्या अनुष्ठानाला कोणाचाहि व्यत्यय येतां उपयोगीं नाहीं. जा. ( दादजी जातो. ) महाराजांनीं होमाजवळ ह्या सुखासनावर बसावं ( संभाजी बसतो. नेमाजी मदिरापात्र घेऊन येतो. कलुषा होमाजवळ बसतो. )

**नेमाजीः**—( स्वगत ) ही आकावया आज माझ्या हातीं आली. आतां महाराजांना घुटक्यावर घुटके पाजण्याचं काम पंडितरावांनीं ह्या बहाद्दराकडे

सोपविलं आहे. आणि ह्या कामाबद्दल ते मला बक्षिसहि बहादूर देणार आहेत. ( पुढें होऊन मुजरा करितो ) ( कलुषा त्याच्या हातांतील मदिरापात्र घेऊन थोडी दारू होमांत टाकतो. )

**कलुषाः**—( पात्र हातांत धरून ) **ॐ ऱ्हीं ऱ्हां रीं रां विष्णुशक्तये नमः** ( पात्र पुढें करून ) हं—महाराज घ्या आतां हें तीर्थ. ( मंत्राला पुनः सुरवात करतो. ) **ॐ नमो भगवति विष्णुशक्ति ह्येनं ॐ हर हर नय नय पच पच मथ मथ उत्सादयोत्सादय द्रूरं कुरु कुरु स्वाहा ॥ हिमवन्त गच्छजीव सः सः सः चन्द्रमंडलगतोऽसि स्वाहा ॥**

( नेमाजीला खूण करतो. तो पात्र भरून संभाजीला देतो. )

**ॐ ऱ्हां ऱ्हीं ऱ्हं ॐ महामारी शत्रुनाशिनि चण्डमुण्डविनाशिनी भगवति महाकालीश्वरशक्ति तुभ्यं नमोऽमुं भञ्जय भञ्जय मारय मारयोच्चाटयोच्चाटय जहि जहि पच पच हुं फट् स्वाहा ॥ ॐ ऱ्हीं क्लीं श्रीं विघ्नापहेऽमु बलिं गृहाण रक्ष रक्ष कुरु कुरु स्वाहा ॥**

( कलुषा खुणावतो, तोंडानें मंत्र चालू असतो; नेमाजी पात्रावर पात्रें भरून देतो. अखेरीस संभाजी आसनावर कलंडतो. )

**संभाजीः**—( शोचनीय स्थितींत अडखळत ) कवी—कविराज, देवी—काय—म्हणते ? कुठें आहे—देवी—अहाहा—किती गोड हा प्रसाद !—

**कलुषाः**—( नेमाजीला खूण करतो. व एकदम पात्रच पुढें करतो. ) महाराज हा सर्व प्रसाद घ्या.

**संभाजीः**—सर्व प्रसाद ! सर्व प्रसाद—वाहवाः ! ( पात्रच तोंडाला लावतो, तें अर्धें सांडतें आणि बेशुद्ध होऊन अस्ताव्यस्त पडतो. तोंच रक्तानें कपडे लाल झाले आहेत, हातांत तरवार आहे, असा मल्हारी एकदम प्रवेश करितो. )

**मल्हारीः**—घात झाला, सरकार घात झाला ! गनिमांनीं वाड्याला चौफेर वेढा दिला—पण हें काय ?—सरकार, अरेरे ! कोण ही शोचनीय स्थिति ! काय करूं ! दुर्दैवानं अखेर साधली ! मराठी राज्याचा आधारस्तंभ डळमळूं लागला. हाय हाय ! या प्रसंगीं महाराज शुद्धीवर असते तर या नरकेसरीनं आपल्या तीक्ष्ण पंजानं सर्व श्वानांचा चक्काचूर उडविला असता ! पण—काय करूं ? एका धटकेंत—एका क्षणांत मोंगल दरवाजा फोडून

आंत येतील. आणि—आणि आमच्या प्रभूला—आमच्या राजाला—नको नको ती अभद्र कल्पना !—हाय ! हाय ! ती कल्पना मनांत येतांच हृदयाला चरका बसतो—हृदयाचं चलन बंद होतं ! काय करावं ?—या प्रसंगाला कारण—कारण हा दुष्ट कबजी ( त्याला लाथ मारतो ) राज्यघातक्या, नीचा, स्वार्थासाठीं उच्च ध्येयावर लाथ मारणाऱ्या कुत्र्या ! ह्या होमांतच प्रथम तुझी आहुती देऊन छत्रपति महाराजांच्या भवानी मातेला संतुष्ट केलं असतं. पण तूं ब्राह्मण ! ( कलुषा कांपत कांपत मागें होतो ) महाराज, उठा ! छे—

( दादजी प्रवेश करतो. )

**दादजीः**—( घाबऱ्या घाबऱ्या ) कविराज, स्वस्थ काय राहिलां ? शत्रू आंत घुसला ! महाराज, अरेरे !

**मल्हारीः**—दादजी, तुम्ही सरदार ! छातीचा कोट करून शत्रू बाहेर अडवून ठेवायचा, ते तुम्ही आंत कां आलां ? ह्या नीच कलुषाला काय विचारतां ? तुमची महत्त्वाकांक्षा—अष्टप्रधानांत एका जागीं अधिष्ठित होण्याची तुमची महत्त्वाकांक्षा ह्या स्वार्थाकरितां शेंपूट हालविणाऱ्या कुत्र्याकडून पुरी होईल असं तुम्हाला अद्यापि वाटतं काय ? सोडा—सोडा तो नाद ! अष्ट प्रधानांचा प्रधान—हा आपला राजा; यांच्या अभावीं प्रधानकीचीं वस्त्रें मिळविण्याचा हा भ्रम सोडा—आणि महाराजांच्या संरक्षणाच्या उद्योगाला लागा. दादजी, पहातां काय ? तुमच्या अंगांतील रक्त गोठलं काय ? स्वतःचा जीव धोक्यांत घालून जंजिऱ्याच्या वेढ्यांत तुमच्या कुटुंबाची अब्रू रक्षण करणारा हा आपला प्रभु पहा ह्या नीचानं कसा बेशुद्ध करून ठेविला आहे—व्हा पुढें—ते पहा शत्रु आंत शिरले—उचला—उचला महाराजांना. ( उचलूं लागतात तों संभाजी हालत नाहीं असें पाहून ) दादजी, हा प्रयत्न व्यर्थ आहे. हा मी येथें उभा राहिलों. हा माझ्या छातीचा कोट महाराजांचं रक्षण करील. ( मुकर्रबखान सैन्यासह येतो. लढाई होते. मल्हारी मारला जाऊन संभाजीच्या पायाशीं पडतो. दादजी जखमी होऊन पडतो, पडदा पडतो. ) ( व पुन्हा तोच देखावा. संभाजी पडलेला आहे. पायाशीं मल्हारी पडलेला आहे. मागें दोन हत्त्यारबंद मुसलमान शिपाई आहेत. कलुषाला शृंखलाबद्ध करून उभा केला आहे. गणोजी व मुकर्रबखान उभे आहेत. )

**गणोजीः**—( त्वेषानें ) संभाजी, हा गणोजी शिरकाणाचा सूड घेण्याकरितां आला आहे पहा.

**संभाजीः**—( उठण्याचा प्रयत्न करीत ) काय गडबड आहे—? मल्हारी—कोणीच दिसत नाहीं. मल्हारी—माझी तरवार—

**गणोजीः**—मल्हारी हरीच्या द्वारीं तुझी वाट पहात आहे. ऊठ—संभाजी उठ.

**संभाजीः**—कोण ?—गणोजी शिर्के ? ( ताडकन् उठून उभा रहातो. )

**गणोजीः**—होय. शिर्काणाच्या सुडाकरितां तुझ्या रक्ताला हापापलेला हा गणोजी शिर्का.

**संभाजीः**—अविंधाचा मिंधा ! मेलेल्या मांसाला लालचावलेला गणोजी शिर्का !

**गणोजीः**—वटवट बंद कर ( तरवार उगारून ) ही तरवार आतां तुझं मस्तक—

**मुकर्रबः**—( एकदम पुढें होऊन ) खबरदार गणोजी, पीछे हटो ! राजा संभाजीके बालकोभी धक्का न लगाना इस लिए शहान्शहाका ए हुक्म देखो. ( हुकूमाचा कागद त्याच्यापुढें धरतो. )

**गणोजीः**—पण माझी प्रतिज्ञा पूर्ण झालीच पाहिजे. ( संभाजीच्या अंगा-वर धांवून जाऊं लागतो. )

**मुकर्रबः**—( त्याला अडवून रागानें ) हरामखोर ! हट पीछे. खुद अपने मालिकसे तुम निमकहरामी किया और फिर हमारे बादशाहाका हुक्म मानता नहीं ? बदमाश !

**गणोजीः**—मी निमकहराम ?—अरेरे !—अविंधाचा मिंधा खरा !

**मुकर्रबः**—राजा संभाजी, तुम हमारे कैदी हो.

**संभाजीः**—( सभोंवार पाहून क्षणभरानें ) मी कैदी ?—चोंहों बाजूंनीं सांपडलों खरा ! संभाजी, तुझा अवतार संपला. हे हतभाग्या ! तुझ्या नशिबीं वीरोचित मरणच नाहीं. अरेरे ! संभाजी, भागूबाईच्या हातांनीं रचलेल्या अपमानाच्या चितेंत तुझ्या सत्त्वाची आतां राखरांगोळी होणारना ? काय ही तुझी दशा !—ज्या शौर्यानं आतांपर्यंत तूं शत्रूला पाय चाटायला लावलेस—ज्या बलानं तूं प्रत्यक्ष वाघाला लाजविलंस—ज्या तरवारीनं शत्रूंचीं शिरकमलं तोडून मराठी साम्राज्याच्या विराट् स्वरूपी नारायणावर तूं लाखोली वाहि-लीस—ज्या धैर्यानं प्रत्यक्ष कृतांताशीं तूं टक्कर दिलीस, त्या धैर्यानं—त्या तरवारीनं—त्या बलानं—त्या शौर्यानं, तुझा आज त्याग करावाना ? पण

त्याला कारण—कारण एकच ! दर्शनी क्षुल्लक पण परिणामी घोर असं ह्या चांडाळानं मला लावलेलं दारूचं व्यसन ! माझ्या सर्वस्व नाशाला कारण होणारं हें दारूचं व्यसन !—माझ्या मराठे वीरानों ! या व्यसनानं तुमच्या राजाची—राजाची कसली ? तुमच्या जीवांचे बळी देऊन राज्य भोगणाऱ्या आपमतलबी प्राण्याची—तुमच्या आधारावर राज्य-सिंहासनाच्या पायऱ्या चढणाऱ्या या पांगळ्याची होणारी दैना पाहून दारूच्या थेंबाला न शिवण्याची प्रतिज्ञा करा !—दारूच्या निशेंत बेहोष असतां बाद-शाहानं मला कैद केल्यामुळं हा शेवटचा प्रसंग जनतेच्या डोळ्यापुढें कायमचा राहील. अरेरे ! ह्या प्रसंगामुळं जग मला व्यसनाचा पुतळा म्हणून पुढं म्हणेल. माझा तिरस्कार करील. परंतु ह्या वरवरच्या देखाव्यावरून आपला ग्रह कायम करून घेणाराला माझा जन्म फुकट वाटला, तरी माझ्या चरित्राचं मननपूर्वक निरक्षण करणाराला तो सफलच वाटेल. राज्यसूत्रें हातीं आल्यावर अंगावर पडलेल्या जबाबदारीमुळं माझ्या हातून अन्याय झाले आहेत परंतु त्या कृत्यांच्या मुळाशीं व्यक्तिविषयक द्वेष मात्र नव्हता.—बा महाराष्ट्रा ! माझ्या परमपूज्य पित्याच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा मी यथाशक्ति पुऱ्या करण्याच्या केलेल्या प्रयत्नांकडे पाहून माझे अनंत अपराध पोटांत घाल. मराठी साम्राज्याच्या विस्ताराला जरी नाहीं तरी त्याच्या शत्रूला पादाक्रांत करण्यांत माझ्या कारकीर्दीचा अंत झाला त्याकडे लक्ष देऊन तूं आपल्या नुकसानीकडे डोळेझांक कर.—राजारामा ! ही आपल्या वडील भावाची शोचनीय स्थिति पहा. त्याला कृतअपराधांची क्षमा कर आणि आबासाहेबांच्या उच्च ध्येयाकडे नजर देऊन महाराष्ट्राचे पांग फेडतांना ह्या आपल्या हतभागी बंधूचा विचार देखील मनांत आणूं नकोस.—येसू ! तुला मी कोणत्या मुखानं हाक मारूं ? तुझा हा चाण्डाळ पति आज आपल्या कृतकर्मानं यवनांचा कैदी झाला आहे. हा कर्तव्यच्युत झाला, पण तूं अद्यापि कर्तव्यानं बांधलेली आहेस. मातुश्री जिजाबाईप्रमाणं महाराष्ट्राचं ऋण तुला अद्यापि आपल्या छोट्या शाहूकडून फेडायचं आहे. त्याच्यापुढं थोरल्या महाराजांचा कित्ता ठेव. आणि ह्या संभाजीला तुम्ही सर्वजण विसरून जा.—बा स्वतंत्र महाराष्ट्रा ! हा परतंत्र झालेला संभाजी तुला अखेरचं नमन करतो. ( नमन करतो. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश तिसरा

**स्थळ**:—सरदेसाईच्या वाड्याचा रस्ता.

( गणोजी प्रवेश करतो. )

**गणोजीः**—शिर्के कुलांतील लहान मूल सुद्धां वचनानं धड म्हणून आमचा लौकिक, त्याच कुळांतील शूर पुरुषासंबंधानं औरंगजेबाच्या मनांत संशय यावा काय ? बादशाहाच्या दृष्टीनं मी अविश्वासी ठरावें ना ? पण यांत त्याचा तरी काय दोष ! ज्यांना आमच्या अंगांत खेळणाऱ्या रक्ताचा रंग माहीत नाहीं, आमच्या मनावर झालेल्या संस्काराची ज्यांना ओळख नाहीं, आमच्या संस्कृतीची ज्यांना कल्पना नाहीं अशा परधर्मांच्या लोकांनीं आमच्या-बद्दल अविश्वास दाखवावा यांत नवल तें काय ? ज्याला त्याला स्वतःच्या रक्ताचा अभिमान असायचाच. मग मोंगलांच्या दृष्टीनं मी अविश्वासी ठरलों तर त्यांत त्यांना मी काय म्हणून नांवं ठेवावीं ? मराठ्यांच्या दरबारीं प्रत्येकजण माझा दर्जा—माझी किंमत जाणत होता. पण सुडाच्या भरीला पडून—त्यांच्या गळयावर सुरी ठेवायला जर मी तयार झालों तर मग बादशहानं मला निमक-हराम कां म्हणूं नये. इतकं वांकडं पाऊल टाकून सुद्धां माझ्या प्रतिज्ञेची पूर्ति झाली नाहीं ! सुडाची आग शांत झाली नाहीं. राजकुंवर, तुझा प्रत्येक शब्द आतां मला आठवूं लागला. मी हें काय केलं ?—पण माझी प्रतिज्ञा ! गणोजी शिर्क्यांची प्रतिज्ञा ! त्या चांडाळ संभ्याला बादशहा आतां ठार मारील.

**नेमाजीः**—( प्रवेश करून ) मारला !

**गणोजीः**—काय मारला ?

**नेमाजीः**—होय मारला. बादशहानें भर दरबारांत संभाजी महाराजांचा वध केला.

**गणोजीः**—अगदीं माझ्या मनासारखं झालं ! आतां रायगडावर जाऊन तिथं असलेलं तें येसूचं पोर ह्या तरवारीच्या धारेखालीं धरून संभाजीचा निर्वंश करण्याकरितां मला तिकडेच गेलं पाहिजे. ( जातो. )

**नेमाजीः**—अहो थांबा ! सरदारसाहेब, अहो राजद्रोही सरदारसाहेब, थांबा—गेले !—जा—पण हे राजद्रोह्या, तूं गडावर जाऊन काय करणार ! हा आतां नखशिखान्त राजनिष्ठ बनलेला नेमाजी तूं गडावर जाऊन पोंचण्या-पूर्वीं गडावर जाऊन तुझी प्रतिज्ञा फोल ठरविणार ! ( जातो. )

## प्रवेश चौथा

**स्थळः**— रायगडावरील रण मैदान.

( राजकुंवर सचिंत प्रवेश करते. )

**राजकुंवरः**—दुर्दैवी महाराष्ट्रा ! आतां तुझं पुढं कसं होणार ? तुझ्या पायांत परवशतेची बिडी येऊन पडणार काय ? ही गडाभोंवतीं चाललेली धुमश्चक्री काय सुचवीत आहे ! असल्या बेईमानी माणसांच्या नामनिर्देशानं तुझ्या इतिहासाचीं पानं विटाळलीं जाणार काय !—आबासाहेबांच्या अविश्रांत श्रमानं पालावलेल्या या स्वराज्य वृक्षावर घरभेदीपणाची—अभिमानशून्यतेची वीज पडून तो आतां डळमळून पडण्याच्या बेतांत यावा काय ! अरेरे ! आई भवानी माते, तूं हा काय प्रसंग आणला आहेस ?—या परचक्राच्या धारेवर फिरतां फिरतां या मराठी साम्राज्याचे तुकडे तुकडे न होवोत म्हणजे झालं ?

( येसूबाई प्रवेश करते. )

**येसू०**—ताईसाहेब, हे तुमच्या तोंडून निघत असलेले निराशेचे उद्गार ऐकून मला आश्चर्य वाटत आहे. तिकडच्या स्वभावांत क्रांति घडवून आणण्याच्या कामीं निराश झालेल्या माझ्या मनांत आशेचं जीवन तुम्हींच शिंपडलं ना ? मग तुम्हीच निराशेनं हात पाय टाळावेत ! आतां आबासाहेबांचा—तुमच्या पूज्य वडिलांचा—माझ्या मामंजीचा संदेश सांगून मराठे वीरांच्या अंगांत विरश्रीचा संचार दुसरं कोण उत्पन्न करील ?

**राजकुंवरः**—वहिनी, अशावेळीं इतका पोक्तपणा तुझ्या अंगीं कसा आला ? इतका भयंकर प्रसंग—प्रत्यक्ष पतीचा मोंगलांकडून अशा अमानुष रीतीनं अंत झाला असतां तुझ्या अंगीं ही इतकी शांत वृत्ति बाणली तरी कशी ? दादाच्या निधनानं माझं मन अस्वस्थ आणि अस्थीर झालं आहे; दुःखाचे उमाळे क्षणोक्षणीं येऊन मनसोक्त अश्रु गाळावे असं मला झालं आहे. पण वहिनी, तूं अशी शांत कशी ?

**येसू०**—ताईसाहेब, माझ्या डोळ्यांतून एकहि अश्रु का येत नाहीं ? मला दुःखाचा एकहि हुंदका का आला नाहीं ? माझ्या मनाची शांतता का नष्ट झाली नाहीं ? हें मी काय सांगूं ? ज्यांच्या अंगावर प्रजेच्या कल्याणाची, महाराज्ञीच्या पदावर आरूढ झाल्यावर जी जबाबदारी पडते त्यांनाच तें ठाऊक ! स्वतःचं सुखदुःख बाजूला ठेऊन, स्वतःच्या मनाचा कोंडमारा करून आपल्या

प्रिय बालकासमान प्रजाजनासह आतांच्या प्रसंगांतून पार पडण्याचा मार्ग शोधून काढणं मला आतां भाग आहे. माझ्या स्वतःचा विचार करण्यास मला वेळच नाहीं. आतां मराठीराज्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या दुःखाचा विचार करतां करतांच माझं आयुष्य संपून जाईल कीं काय अशी मला भीति पडली आहे. स्वतःच्या शिराची तमा न बाळगणाऱ्या, धर्माकरितां आत्मयज्ञ करणाऱ्या वीरमणीची—धर्मवीराची मी पत्नी आहें. तो पहा ( पडदा उघडतो. रायगडाचा भाग दिसूं लागतो. बुरुजावर तारा रक्तानें भिजलेल्या हातांत तरवार घेऊन उभी आहे. एका बाजूनें मानाजीचें प्रेत घेऊन दादजी प्रवेश करतो. ) मराठ्यांच्या कच्याबच्यांनीं चालविलेला आत्मयज्ञ !

**दादजीः**—( मानाजीचें प्रेत खालीं ठेवून ) राणीसाहेब, हा बालवीर पहा—

**ताराः**—( पुढें होऊन ) मानाजी, धन्य तुझी स्वामिभक्ति ! तुझा हा आत्मयज्ञ पाहून स्वर्गांतून आपले पूज्य बाबा तुला धन्यवाद देतील. राणीसाहेब, बहुतेक गड मोंगलांच्या सैन्यानं घेतला आहे. आतां पुढं काय करायचं ?

**येसू०**:—दादजी, तारा, ताईसाहेब आतां हा आत्मयज्ञ बंद करावा असं मला वाटतं. राहिलेल्या मराठ्यांच्या माना मोंगलांच्या तरवारीला बळी देण्यापेक्षां आपण स्वाधीन होऊन त्यांच्या मानेवर पुढील कर्तव्याचं ओझं द्यावं असं मला वाटतं.—तारे ! या आत्मयज्ञांत तूं आपल्या धाकट्या भावाला गमावून बसलीस. त्याच प्रमाणं तिकडच्या संरक्षणाकरितां केलेल्या—आत्मयज्ञांत आपल्या मल्हारीला मुकून सुखाला मात्र आंचवलीस !

**ताराः**—काय ?—मल्हारीनं—माझ्या भावी पतीनं आपली प्रतिज्ञा पूर्ण केली काय ?

**राजकुं०**—होय. महाराजांकडून त्यानं शाबासकी मिळविली. दादानं त्याच्या नांवाचा गौरव केला !

**ताराः**—मग माझं इहलोकीचं कार्य संपलं !—राणीसाहेब, मला आतां रजा द्या. ते पहा, कर्तव्यानं स्वर्गसुखावर आरूढ झालेले मल्हारराव, माझी वाट पहात आहेत.—मल्हारराव, ही पहा तारा—आपली तारा आली !—( पडते. तिचें देहावसान होतें. )

**येसू०**—धन्य तारे ! तुझी धन्य आहे !

**राजकुंवरः**—वहिनी हें काय ?

**येसू०**—ताईसाहेब, जाज्वल्य कर्तव्यानं प्राप्त झालेलं हें इच्छामरण पहा.

**दादजीः**—राणीसरकार, आतां पुढं काय करायचं ?

**येसू०ः**—आतां काय करायचं तें मी सांगते. तुम्हीं, ताईसाहेब, आणि भाऊजी आपल्या निवडक मंडळीसह हिरकणीवरून आतां जिंजीच्या रस्त्याला लागा. माझी भवितव्यता माझ्यापुढं उभी आहे. तुम्ही मात्र आतां इथं क्षणभरहि राहूं नका. जा. दादजी, हुकूमाप्रमाणं उद्योगाला लागा.

**राजकुं०**—वहिनी, इथून जायला माझं पाऊलच उचलत नाहीं त्याला मी काय करूं ? चोहोंकडून पेटलेल्या वणव्यांत तुला एकटीला आणि भोंसले कुलाच्या—माझ्या दादाच्या कुलदीपकाला टाकून इथून जायला माझं मन कसं तयार होईल ? वहिनी, तूं आणि मी इथं लढतां लढतां मरूं—

**येसू०**—ताईसाहेब, माझी गोष्ट निराळी आणि तुमची गोष्ट निराळी ? मला आतां या जगांत जगून करायचं आहे काय ? माझ्या बाळाकरितां जगायचं खरं परंतु माझ्या जागीं त्याच्या पूण्यश्लोक पुर्वजांची पुण्याई मातेच्या ममतेनं त्याच्या पाठीशीं उभी आहे. तीच त्याचं रक्षण करील. परंतु तुम्हाला अद्यापि किती आणि केवढं काम करावयाचं आहे, याचा विचार करा. मामंजीच्या इच्छेप्रमाणं सर्व हिंदुस्थान मराठी सत्तेनं व्यापून टाकणं हें तुमचं कर्तव्य आहे. अद्यापि भाऊजीकडून हें पवित्र काम व्हायचं आहे. शिवाय ज्या धर्मवीराचा मोंगलांनीं अमानुषपणें खून केला त्याचा सूड उगविण्याकरितां तुम्हाला आणि भाऊजींना प्रत्येक मराठे वीराच्या अंगांत चैतन्य उत्पन्न करावयाचं आहे. शिवाय बेइमान मराठयांच्या अधमपणामुळं ओढवलेल्या ह्या प्रसंगानं मराठी साम्राज्याचं काडीचंहि नुकसान झालं नाहीं आणि पुढं होणार नाहीं, हें त्या अधमांच्या निदर्शनास आणून त्यांच्या नीचतेची त्यांना साक्ष पटवून त्यांना देहान्त शिक्षा कोण करील ?

**राजकुं०**—वहिनी, तुझं म्हणणं अक्षरशः खरं आहे. ही पहा मी तुझ्या आज्ञेप्रमाणं निघालें, चला—दादजी चला—वहिनी—( एकमेकींना आलिंगन देतात. दादजी व राजकुंवर जातात. )

**नेमाजीः**—( प्रवेश करून ) राणीसाहेब, चला ! एक क्षणहि गमावूं नका. तुमचे बंधू गणोजीराव शिर्के धाकटया महाराजांना ठार मारण्याकरितां इकडे येत आहेत. चला—धाकटया महाराजांना घेऊन चला—पळा—

**येसू०ः**—भिवूं नकोस ! असा गांगरून जाऊं नकोस. माझा दादा इथं येत आहे काय ? येऊं दे. त्याची प्रतिज्ञा केव्हांहि पूर्ण होणार नाहीं. पण

तूं मात्र येथून जा—ताईसाहेब हिरकणीवरून जिंजीला जात आहेत, त्यांच्याबरोबर जा. जा—( नेमाजी मुजरा करून हळू हळू जातो ) अरेरे ! काय ही आमच्या राजनिष्ठ मराठ्यांची हवालदील स्थिति ! ताईसाहेबांनीं निराशेच्या भरांत रेखाटलेलं महाराष्ट्राच्या भवितव्यतेचं चित्र मला आतां डोळ्यापुढं स्पष्ट दिसूं लागलं. मामंजीच्या अतुल पराक्रमाचा दर्शक हा रायगड फंदफितुरीनं आतां जमिनदोस्त होणार काय ?

( गणोजी प्रवेश करतो. )

**गणोजीः**—यांत काय शंका !—येसू, मुकाट्यानं स्वाधीन हो.

**येसू०**—तुझ्या पाठीवर जन्म घेतलेली ही तुझी धाकटी बहीण तुझ्या स्वाधीन आहे. आतां नव्यानं काय तुझ्या स्वाधीन व्हावयाचं आहे ? एका मातेच्या उदरांतून निघणारीं मुलं एकाच रक्ताच्या स्वाधीन नसतात काय ?

**गणोजीः**—येसू, हा शब्दछल पुरे कर. कुठं आहे तुझा तो कार्टा ? त्याला माझ्यापुढं आणून उभा कर.

**येसू०**—भोंसल्यांचा नायनाट तुझ्या हातून होण्याइतकी भोंसले कुळांतील पुण्यश्लोक पुरुषांची तपश्चर्या क्षुद्र नाहीं, समजलास ?

**गणोजीः**—असं काय ?—पहातों. तूं माझ्या स्वाधीन होतेस कीं नाहीं बोल ?

**येसू०**—तुझ्या स्वाधीन होऊन तूं मला नेणार कुठं ? मला तूं यवनांच्या घरांत घालणार काय ? अहारे दिवट्या, आपल्या आयाबहिणी यवनांच्या घरांत नेवून घालणाऱ्या षंढा !

**गणोजीः**—ही वटवट बंद कर. संभाजीचा निर्वंश करण्याची माझी प्रतिज्ञा आहे. तुझा कार्टा—

**येसू०**—तुझ्यासारख्या नामर्दांची प्रतिज्ञा केव्हांहि फोलच ठरणार ! भोंसल्यांचा निर्वंश करण्यापूर्वी माझ्या पतीचा वध करण्याची तुझी प्रतिज्ञा फोल ठरलीच. आतां कशाला आपल्या प्रतिज्ञेची घमेंड मारतोस ? यवनाच्या तरवारीला बळी पडण्यापेक्षां तुझ्या तरवारीनं तिकडचा वध होता तर त्यांत मला माझ्या माहेरच्या कुळाबद्दल अभिमानच वाटला असता. पण बोलून चालून तूं नाम[illegible] तुझ्याकडून व्हावयाचं आहे काय ? पहा हीं तुझ्या पायाशीं पडलेलीं स्वामिनिष्ठ नेकजात मराठ्यांच्या मुलांचीं, बायकांचीं दिव्य शरीरें पहा —याचा तुला काय बोध होत आहे ?

**गणोजीः**—माझी प्रतिज्ञा पूर्ण होणार हेंच सुचवित आहेत.

**येसू०**—तूं भ्रमांत आहेस. तुझी प्रतिज्ञा केव्हांहि सफल होणार नाहीं. पहा पुन्हां पहा—गडाच्या सभोंवतीं असंख्य मराठ्यांच्या रक्तांचे पाट वहात आहेत. ह्या रक्तांच्या पाटानं आबासाहेबांनीं लावलेल्या स्वराज्य रोप्याला सिंचन होत आहे. हा रोपा तुझ्यासारख्या नामर्दाच्या शापानं करपून जाणार नाहीं, तुटून पडणार नाहीं किंवा तुझ्या फोल प्रतिज्ञेनं त्याचा निर्वंश होणार नाहीं. उलट तो ज्यास्त फोंफावतच जाणार.—हा मराठ्यांचा आत्मयज्ञ—आपल्या राजाकरितां नेकजात मराठयांनीं केलेला हा आत्मयज्ञ आहे. पहा—नीट पहा—ह्या आत्मयज्ञापुढं तुझ्या क्षुल्लक प्रतिज्ञेची मातब्बरी ती काय ?

**गणोजीः**—( सभोंवार पहात हताश होऊन ) आत्मयज्ञ !—गणोजी, तुझी प्रतिज्ञा खरोखरीच फोल आहे ! तरवार टाकून देतो. ) येसू ! ताई हा मराठयांचा आत्मयज्ञ काय ?

**येसू०**—होय. हा **मराठ्यांचा आत्मयज्ञ !**

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथ शाखा.
अ. क्र. ९१५४ सं.
वि. ७१८६

समाप्त

IRBK-0101854

IRBK-0101854